
जोड अंक १६ ऑक्टो. ते १५ नोव्हें. २०२२
किंमत ५० रु. (एकूण पृष्ठे १०२)

# परिवर्तनाचा वाटसरू



## One Stop Turnkey Solution for

Civil, Interior, MEP & Conventional /Modular Interior Projects




GOVERNMENT




CORPORATE




HEALTHCARE



INDUSTRIAL



EDUCATION



AUDITORIUM



SPECIALISED

*Trust us for the simple reason.... We deliver*

**SHANDAR**

**INTERIOR PVT. LTD.**

Reg Office : 64, Anuradha Apt, LBS Road, Navi Peth, Pune 30

Plant : Hicliff Indl. Est, Kesnand, Wagholi Rahu Road, Pune.

Mumbai Office : 703, Bharat Co -op. Hsg Soc, Nesbit Road, Mazgaon, Mumbai 400010

---------------------------------------------------------------- ----

Website: www.siplprojects.in

Email : info@siplprojects.in

Tel No. 020-24533431 /3493 / 29950594 / 9923551671

# परिवर्तनाचा वाटसरू

वर्ष २१वे / जोड अंक १२ व १३ वा / किं. ५० रु. / १६ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर २०२२



**संस्थापक संपादक**

अभय कांता*

**संपादक**

प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

**कार्यकारी संपादक**

देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

**संपादक मंडळ**

प्रज्वला तट्टे । वीरा राठोड । कलीम अजीम । राही श्रु. ग. । वृषाली मगदूम

**व्यवस्थापक**

प्रकाश वाघमारे



**संपर्क पत्ता**

५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११

भ्र. ९७६३२०६२१२ इमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com



**वर्गणीचे दर** : वार्षिक : ६०० रु., त्रैवार्षिक : १,६०० रु., दशवार्षिक : ५,००० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक २०० रु., सॉफ्ट + छापील ७०० रु. वरील पत्त्यावर ई मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील

बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे । बचत खाते : Pariwartanacha Vatsaru

बचत खाते क्र. : 051410110013969 । आयएफएससी क्र. : BKID0000514 । एमआयसीआर क्र. : 411013014

Google Pay साठीचा मोबाईल नंबर : 8888708963 । युपीआय पेमेंटसाठी वर बारकोड दिला आहे.

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

ISSN: 2250-3145

युजीसी केअर ग्रुप 1मध्ये 'परिवर्तनाचा वाटसरू' पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.

प्रकाशन दिनांक : १९ ऑक्टोबर २०२२

# अनुक्रम


**कादंबरी अंश**

**ते पन्नास दिवस / ६**
पवन भगत

**अनुवादित कथा**

**व्यभिचारी स्त्री / १२**
अल्बेर कामू अनु. सिद्राम पाटील

**रबरधूळ / २७**
सारा थँकम म्यॅथ्युज् अनु. अजित मगदूम

**कथा**

**बाबा हरवलेल्या मुलीची गोष्ट / ३३**
छाया कोरेगावकर

**धुऱ्याचा धाक / ४६**
माधव जाधव

**अनुवादित कविता**

**शरद बिल्लौरे यांच्या ८ कविता / ५४**
विकास पालवे

**हुबनाथ / ५७**
रमेश नागेश सावंत

**विशेष**

**विज्ञानवाटा**

**सिद्धान्त व व्यवहार**

**वैज्ञानिक दृष्टिकोन**
सुधीर बेडेकर
७०

**सुधीर बेडेकरकृत मांडणीचे महत्त्व**
अनंत फडके
८४

**...आणि विज्ञानाचा 'भारतीय' व्यवहार**
विजय कुंजीर
९३

**कविता**

● मलिका अमर शेख / **५८** ● विजय चोरमारे / **५८** ● पद्मरेखा धनकर / **५९**
● राजश्री देशपांडे / **६०** ● अरुणचंद्र गवळी / **६०** ● स्वाती राजन / **६१**
● गीतेश गजानन शिंदे / **६१** ● देविदास सौदागर / **६२** ● हेमंत दिनकर सावळे / **६२**
● मारोती कसाब / **६२** ● भगवान निळे / **६३** ● गिरीश नारायणराव सपाटे / **६३**
● मंदाकिनी पाटील / **६४** ● जितेंद्र परशराम कुवर / **६४** ● शशिकांत हिंगोणेकर / **६५**
● अंजली ढमाळ / **६६** ● सतीश लोथे / **६७** ● प्रशांत असनारे / **६८**
● प्रज्ञा दया पवार / **६९**



अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.





प्रकाशन दिनांक : १९ ऑक्टोबर २०२२

# सं पा द की य

'परिवर्तनाचा वाटसरू'चा प्रस्तुत पंचविसावा दिवाळी अंक आपल्यासमोर ठेवताना आमच्या मनात काहीशा संमिश्र भावना आहेत. अलीकडच्या कोरोना काळातील काही छोटेखानी अंकानंतरचा हा जोडअंक आपणास खचितच भावेल असा विश्वास आहे.

या वर्षी महाराष्ट्रातील मार्क्सवादी चळवळीतील दोन अत्यंत खंदे शिलेदार हरपले. वर्षाच्या सुरुवातीला मार्चमध्ये मार्क्सवादी विचारवंत व लेखक तसेच 'मागोवा', 'तात्पर्य' आणि 'समाज विज्ञान अकादमी'चे प्रणेते सुधीर बेडेकर आणि अगदी अलीकडे २ ऑक्टोबर रोजी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ कार्यकर्ते आणि कृतिशील विचारवंत कॉ. कुमार शिराळकर यांचे निधन झाले. या दोघांनी मिळून महाराष्ट्रातील मार्क्सवादी चळवळीच्या दोन सारख्याच महत्त्वाच्या बाजू - सिद्धान्तन आणि शोषितांच्या चळवळीची उभारणी, आयुष्याच्या अखेरपर्यंत जवळजवळ एकहाती सांभाळल्या. 'वाटसरू'चा प्रस्तुत अंक हा या दोघांच्या स्मृतींना वैचारिक आदरांजलीच्या रूपात अर्पण करीत आहोत.


या अंकातील एक महत्त्वपूर्ण विशेष म्हणजे सुधीर बेडेकर यांचा 'वैज्ञानिक दृष्टिकोन' हा अप्रकाशित लेख. बेडेकर यांचा 'वाटसरू'त प्रसिद्ध होणारा हा पहिलाच लेख आहे. गेल्या बारा-पंधरा वर्षांत अनेकदा त्यांनी 'वाटसरू'मध्ये लिहिण्याचा मनोदय व्यक्त केला होता परंतु तसे घडले नाही. अर्थात् या काळात त्यांचे लेखन अन्यत्रही प्रकाशित झालेले नाही. त्यांचा हा अपूर्ण लेख 'वाटसरू'ला मिळवून देणारे मित्र डॉ. अनंत फडके यांचे आम्ही ऋणी आहोत. त्यांनी या लेखाच्या निमित्ताने लिहिलेले एक टिपण प्रकाशित करीत आहोत. याशिवाय 'वाटसरू'मधील 'पेच लोकशाहीचा' या सदराचे लेखक आणि 'वाटसरू'चे माजी संपादक विजय कुंजीर यांनी सुधीर बेडेकर यांच्या लेखाच्या निमित्ताने समकालीन भारतातील वैज्ञानिक व्यवहाराचा घेतलेला चिकित्सक धांडोळा हा लेखही या अंकाचा विशेष म्हणता येईल.

अशा दणकट वैचारिक मजकुरासोबतच फ्रेंच अस्तित्ववादी लेखक अल्बेर कामू यांच्या 'द ॲडल्टरस वुमन' आणि मल्याळी - अमेरिकी सारा थँकम म्यॅथ्युज यांच्या 'रबरडस्ट' या दोन कथांचा अनुक्रमे सिद्राम पाटील आणि अजित मगदूम यांनी केलेला अनुवाद, छाया कोरेगावकर आणि माधव जाधव यांच्या कथा आणि महाराष्ट्रभरातील कवी-कवयित्रींच्या दर्जेदार कवितांचा सशक्त विभाग यासारख्या भक्कम ऐवजामुळे हा अंक वैशिष्ट्यपूर्ण झाला आहे.

आमच्या तमाम वाचकांना, लेखकांना, हितचिंतकांना दिवाळी आणि नववर्षाच्या हार्दिक सदिच्छा!

**अभय कांता**

मुखपृष्ठावरील चित्र : द ॲडल्टरस वुमन, पियर बॉनकम्पेन (https://i.pinimg.com/originals/bd/37/7b/bd377b331be5a57a22f5023a915b23d9.jpg)


ते पन्नास दिवस
पवन
भगत
pb358000@gmail.com

मि श्राजींच्या पोटात अन्नाचा एक कणही नव्हता. आरिफचीही अवस्था काही वेगळी नव्हती. हळूहळू सूर्य मावळायला लागला होता. घाट, रान, निसर्ग संध्याकाळी वेगळंच रूप घेतात. दिवसभर ऐकायला येत आलेले पक्षांचे आवाज आता हळूहळू कमी व्हायला लागले होते. एक टिटवी टिव् टिव् करत सतत सायरनसारखा इशारा देत होती. एका उंच दरीतून थोडासा प्रकाश अजूनही येत होता. सूर्यास्त होताना उजेडाचा काही वेळ लपंडाव चालू असतो तसा प्रकार होता हा. कसारा घाटात स्मशान शांतता पसरली होती. त्यांचा आवाज त्यांनाच फिरून ऐकायला येत होता. दूर दऱ्या-खोऱ्यातून कोल्हे कुई...कुई...करत जोरात ओरडत असल्याचे विचित्र आवाज ऐकू येत होते. एक एक कोल्हा आळीपाळीनं ओरडत असल्याचा तो आवाज भीतीदायक होता. रानकुत्र्यांच्या भुंकण्याचे आवाज यायला लागले होते. रानकुत्री आणि कोल्ह्यांच्यात भुंकण्याची जणू स्पर्धाच सुरू झालीय असं वाटत होतं. आता पुढचा प्रवास करता येणं शक्यच नव्हतं.

म्हाताऱ्या मजूर काकांचं प्रेत बेवारसपणे सोडून जाणं योग्य वाटत नव्हतं. चार्जिंग संपल्यामुळं सगळ्यांचेच मोबाईल एक एक करत आता बंद पडू लागले होते. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आता तात्पुरता जरी मिटला असला तरी भुकेचा प्रश्न जास्त मोठा झाला होता. पोटात भुकेचा आगडोंब उसळला होता. आता खायचं काय, असा प्रश्न आरिफ आणि पंडित मिश्राजींना पडला होता. सर्वांची तीच गत होती. कुणी मुरमुरे खाऊन झोपण्याच्या तयारीत होतं, तर कुणी रात्रीचा प्रवास करून दिवसा आराम करू म्हणत गटा-गटानं पुढं जात होते. मध्य प्रदेशातल्या त्या मेलेल्या म्हातारबाबांचे सोबती दुःखी होऊन हताशपणे फक्त रडत होते. एकमेकांना विचारत होते की, पुढचं आता कसं आणि काय करायचं...? त्यांच्या घरी कशी बातमी द्यायची?

पोलीस, हॉस्पिटल किंवा प्रशासनाला माहिती द्यायची होती पण ती कशी? आणि कोण देणार? दिली तर नवी झंझट पण पाठीशी लागण्याची भीती असं सगळं होतं. सगळ्या मजुरांचा, विस्थापितांचा जगापासून संपर्कच तुटला होता.

हळूहळू रात्र व्हायला लागली होती. घनदाट जंगल, खोल दऱ्या आणि त्या सपाटशा खोऱ्यातल्या भटक्या रानटी कुत्र्यांचा आवाज परत परत मोठमोठ्यानं आणि जवळून ऐकू यायला लागला होता. कोल्हेकुई जोरात सुरू झाली होती. प्रेताला इथेच पुरून किंवा जाळून पुढे निघून जाऊयात, असा सगळ्यांचा विचार ठरला. प्रेताला पुरण्यासाठी लागणारे टिकास, फावडे, सब्बल या पैकी काहीच साधनं त्यांच्या जवळ नसल्यानं आता रानातून लाकडं जमा करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. वादळात तुटून पडलेली, काही वाळलेली झाडं तिथे आजूबाजूला पडली होती. पण ती

"आरिफची संपूर्ण दाढी पंडितजींनी आपल्या हातांनी सफाचट केली. आपल्या जवळची भगवी झोळी आरिफच्या खांद्यावर दिली आणि आरिफला जोरात आलिंगन देऊन त्याचा हात घट्ट पकडला. तेव्हा बाकी काफिला इंदौर पार करून पुढे निघाला होता."

तोडायला त्यांच्याजवळ कुऱ्हाड नव्हती. मागं रस्त्याकडेच्या एका टपरीवरून बिडी-बंडल, माचीस पुडा घेतला होता म्हणून त्यांच्याकडं आग पेटवायला माचिस तेवढी होती.

रामस्वरूप प्रेतामागं अजिबात वेळ दवडायला तयार नव्हता. रामस्वरूपनं पंडितजी आणि आरिफला वेगळं केलं. आपण या प्रेताच्या मागं राहिलो तर आपल्याला नाशिकला पोहचायला उशीर होईल आणि एकदा का ट्रान्सपोर्टवाल्या एजंटला भेटण्याची संधी हुकली तर आपल्याला पुन्हा तेराशे किलोमीटरचा प्रवास पायी करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. जर असं झालं तर पुढचं प्रेत आपल्यापैकी कुणाचंही असू शकतं - आपल्यापैकी कुणीही असं रस्त्यावर मरून पडलेलं दिसेल. त्यावर आरिफ म्हणाला, 'प्रेताला अग्नी लावून आपण निघून जाऊ.' पंडितजी पण अंतिम संस्कार करूनच पुढं जायला पाह्यजे याबद्दल आग्रही होते. दोघंही आपलं ऐकत नाहीत म्हटल्यावर रामस्वरूप चिडून जोरात ओरडायला लागला. 'अरे भाई! रास्ते मे हर मोड पर, रोड पर, जंगल में, पूल के नीचे, नदी किनारे, खेत मे ऐसे कई काका दिखेगे. किसींको जंगली कुत्ते नोचते हुए दिखेगे, कोई पूल के नीचे हड्डी का कंकाल रहकर सडते दिखेंगे तो कोई नदी में दिखेंगे. सालो! आप लोग तो मरोगे ही मुझे भी मारोगे..!' असं ओरडतच तोही रागारागाने वाळलेल्या काड्या-काटक्या जमा करायला निघाला. मोठ्या मुश्कीलीनं थोड्याफार वाळलेल्या काड्या काटक्या जमा झाल्या परंतु मोठी लाकडं नव्हती म्हणून काकाच्या प्रेताला तुटलेल्या वाळक्या झाडाजवळ न्यायचं की, कसं? यावर सर्वच विचार करू लागले.

आरिफनं पाला-पाचोळा जमा करून विस्तव पेटवला. एका ठिकाणी वाळलेलं झाड पडलं होतं. तिथं त्यांनी आग लावली. वाळलेलं झाड अर्धवट पेटल्यावर एका दुसऱ्या काडीनं जळत्या लाकडाचे तुकडे केले. धूर निघतानाच लाकडं रचली आणि त्यावर म्हाताऱ्या मजूरकाकाचं प्रेत ठेवलं. वारा सह्याद्रीच्या दिशेनं हळूहळू वाहत होता. लवकरच आगीनं पेट घेणं सुरू केलं आणि कुठलेही दाहसंस्कार न केलेली ती चिता एकदाची जळायला लागली. मध्यप्रदेशातले मजूर जोरजोरात रडायला लागले. पण कुणाच्याही डोळ्यातून आसवं निघत नव्हती. फक्त आवाज येत होता. त्यातला वीस एक वर्षांचा एक मुलगा जोरजोरात रडत सारखा काका... काका... म्हणत होता. काड्या, कचरा, पाला-पाचोळा जमा करत होता, प्रेतावर टाकत होता. सगळे थकले होते. तो मात्र एकटाच प्रेताची काळजी घेत होता. कुठल्या भागासाठी कुठे लाकूड कमी पडतंय ते लक्ष देऊन पाहत होता. तिथं काड्या टाकत होता. प्रेताचा एक एक भाग नीट जळावा म्हणून तो प्रयत्नात होता.

तिघंही विषण्ण नजरेनं आणि जड मनांनी चितेपासून दूर अंतरावर उभे राहिले.

रामस्वरूपनं आपल्या पोटलीतलं सुकं मटण काढलं आणि खाऊ लागला. त्यानं सुकं मटण आणि एक-एक गूळपोळी पंडितजी आणि आरिफला दिली. 'आता तुम्हाला जगायचं असेल तर हे खावंच लागेल. तुमचे धर्म बाजूला ठेवा. आता आपला भूक हा एकच धर्म आणि हे खाणं हा एकच देव आहे. 'माणसं जगली तरच तुमचा-सुरक्षित जगातला धर्म जगेल. माणसं मेली तर धर्माला काही किंमत नाही. माणसंच धर्म निर्माण करतात. धर्म माणसाला निर्माण करत नाही...' असं म्हणत रामस्वरूप एका मोठ्या दगडावर उडी मारून बसला आणि काकाच्या जळत्या चितेकडे पाहत राहिला. वाळलेलं लाकूड असल्यानं चिता धडधडून पेट घेत होती. काळसर धूर आकाशात वर जात होता. त्या लाकडाचा आणि जळक्या प्रेताचा


वेगळाच असा वास येत होता. रामस्वरूपला तो वास त्याच्या घराची याद देत होता. त्याच्या वस्तीजवळच गावाचं स्मशान होतं. पावसाळ्यात रात्री वाऱ्याची दिशा फिरायची आणि नेमकं वस्तीतल्या जेवणवक्ताला प्रेत जळल्याचा वास वस्तीत यायचा. बऱ्याचदा वस्तीत वर्गणी काढून बकरा किंवा एखाद्या प्राण्याची मुंडी भाजायचे तेव्हा असाच वास यायचा. म्हातारबाबाचं प्रेत जळू लागलं आणि आपल्याला भुकेची, जेवणाची याद आली हे लक्षात येऊन तो दचकला!

--

चितेजवळ असलेला तरुण काड्या, पाला-पाचोळा टाकत होता. जसे शेकोटीजवळ बसतात तसे दोन पाय मुडपून तो हळूहळू वाळलेल्या काड्या टाकत होता आणि रडत होता. त्याला मदत करायला म्हणून रामस्वरूप त्याच्या जवळ गेला. जवळ गेला खरा मात्र त्याच्या मनात एकाएकी काय आलं कुणास ठाऊक..! रामस्वरूपनं एक वाळलेलं दांडक्यासारखं लाकूड हातात घेतलं आणि त्या मुलाच्या मागं जाऊन त्याच्या पाठीवर जोरात मारलं. तो मुलगा चितेच्या एका बाजूला पडला, जोरजोरात रडू लागला. त्याचं पोट पाठीला लागलं होतं. तीन दिवसांपासून त्यानं काहीच खाल्लं नव्हतं. सारे लोकं जमा झाले. कुणालाही काहीच कळत नव्हतं. नंतर त्या तरुणाला का मारलं..? असं एकानंही रामस्वरूपला विचारलं नाही. लगीच रामस्वरूपनं त्या रडत असलेल्या मुलाला आपल्या जवळ ओढून घेतलं आणि जवळ असलेल्या दोन वाळलेल्या गूळ पोळ्या खायला दिल्या. तरुण पोरगा हातात पोळ्या घेऊन पुन्हा जोरजोरात रडायला लागला. रामस्वरूपला सुद्धा राहवलं नाही आणि तो रडतच ओरडायला लागला आणि त्यानं दुष्यंत कुमारचं गाणं गायला सुरुवात केली.

*अब नई तहजीब के पेशे -ए नजर हम...*
*आदमी को भुन कर खाने लगे...*
*ना जाने कैसे कैसे मंजर सामने आने लगे..*
*लोग गाते -गाते चिल्लाने लगे.*

पंडितजी, आरिफ एका मोठ्या दगडावर बसून रामस्वरूपनं दिलेल्या पोळ्या आणि दोन वाळलेल्या मटणाच्या खांडऱ्या घेऊन खायला लागले. मुलगाही आता रडून शांत झाला होता. त्याने रामस्वरूपने दिलेल्या पोळ्या आणि मटणाच्या वाळक्या खांडऱ्या खाल्या आणि पाणी पिऊन एका झाडाखाली जाऊन शांत बसून राहिला.



म्हाताऱ्या मजूर काकाचं प्रेत जळून खाक झालं होतं. फक्त वाऱ्यावर उडणारे लखलखीत लाल भडक निखारे आणि काही पूर्ण जळलेल्या लाकडाची उडणारी पांढरी राख काय ती शिल्लक राहिली होती. चितेतून धूर निघत होता. बाकी काहीच शिल्लक राहिलं नव्हतं. सगळे जिथं जागा मिळेल तिथं झोपल्यानं साऱ्यांचाच थकवा थोडा कमी झाला होता.

दुसऱ्या दिवशी अगदी पहाटे चार वाजता पंडितजी, आरिफ भाई आणि रामस्वरूप इगतपुरीच्या दिशेनं निघाले. अजूनही घाटाचा बराच भाग त्यांना सर करायचा होता. कधी घाट चढाई करावी लागायची तर कधी घाट उतरणी करावी लागायची म्हणून ते एकमेकांना सांभाळून घेत होते. तिघंही

एकमेकांत मिळून-मिसळून गेल्यानं पंडितजी आरिफला मुसरडा किंवा कटवा किंवा एकेरी भाषेत फक्त आरिफ असं काही म्हणत नव्हते. त्याला ते भाई, कधी भाईजान, तर कधी आरिफभाई म्हणायचे. आरिफच्या मनात आधी मिश्राजींना त्यांच्या शेंडीकडे बघत अँटिना म्हणून चिडवायची हुक्की येई. संधी मिळाली की, तो त्यांची टांगही खेचायचा. आता मात्र तो असल्या गोष्टी टाळत होता. दोघंही रामस्वरूपला धर्मद्रोही, नास्तिक समजत असावेत. आतापर्यंतच्या या कठीण प्रवासातल्या वेळेत कधी एकदाही रामस्वरूपच्या तोंडात देव, ईश्वर, भगवान, अल्ला मला वाचव, असे शब्द आल्याचं या दोघांनी पाहिलं-ऐकलं नव्हतं. उलट रस्त्यावरची कैक मोकाट मंदिरं, दर्गे, कबरी यापैकी काहीही दिसलं की, पंडित कधी जवळ जाऊन तर कधी दुरूनच हात जोडून घ्यायचा. भगवान सब ठीक करेंगा, अल्लाह की, मर्जी है, वो सब देखता है, असले शब्द त्या दोघांच्या मुखात सारखेच येत असायचे. त्यांची दोस्ती व्हायच्या पूर्वी भगवान, हे ईश्वर, हे राम असं म्हणत असताना आरिफ थोडा जरी जवळपास समोर आला की, पंडितजींच्या तोंडातून शिव्या निघायच्या आणि मग दहा वीस वेळा तरी राम...राम...राम..!, अनर्थ, पापी, घोर अनर्थ असे शब्द बाहेर पडायचे. रस्त्यावर चालताना आरिफनं चादर अंथरली की, मिश्राजींच्या तळपायाची आग मस्तकात जायची. अर्धा एक किलोमीटर अंतर पाय आपटत ते जोरजोरात चालायचे. पाय आपटत जोरजोरात चालताना ते मागं वळून पाह्यचे. आरिफ आपली चादर उचलून घडी करून, नमाज अदा करून येईपर्यंत मिश्राजींच्या तोंडावर झाकण नसायचं. तोंडाचा पट्टा सतत सुरू असायचा आणि शिव्या हे त्यांचे श्लोक. आरिफही कमी नव्हता. मंदिराच्या जवळच नेमकी त्याला नमाज अदा करायची इच्छा व्हायची. पंडितजींचं स्तोत्र पठण सुरू झालं की, तो आयता पढायचा.

त्या दोघांना आवरताना रामस्वरूप घायकुतीला यायचा. पण तो भूतकाळ झाला होता. आताशा ना पंडितजींना वाटेतली मंदिरं दिसत होती, ना आरिफला आयता आठवत होत्या. आता त्यांच्यात बरंच काही बदलत चाललं होतं. ते एकमेकांत मिसळत चालले होते. एकमेकांच्या पिशव्यांना एकमेकांचे स्पर्श चालत होते, ते हातात हात घेत चालायचे. एकदा 'भाईजान, यह संभालो' म्हणत खांद्यावर असलेली भगवी झोळी चक्क आरिफभाईकडे देत पंडित मिश्राजी एका नाल्याच्या कडेला शौचाला गेले. आश्चर्याने थक्क होऊन रामस्वरूप त्या दोघांकडे पाहतच राहिला.

----

*लगेगी आग तो आएंगे घर कई जद मे...*
*यहां पे सिर्फ हमारा मकान थोडी है...*

मध्य प्रदेशातल्या एका मोठ्या नेत्यानं पक्षांतर केलं होतं. राज्यातलं सरकार इंदौरमधल्या एका बड्या नेत्याच्या मदतीनं उलथून टाकल्यामुळं राजकीय वातावरण तंग झालं होतं. शहराचं सांप्रदायिक वातावरण तापलं होतं. महामारीवर मात करण्यासाठी आपणच केलेले नियम धाब्यावर बसवून सत्ताधारी सर्रास सभा, रॅली काढत होते. कोव्हिड गाईडलाईन, प्रोटोकॉल वगैरे फक्त मजुरांसाठी, गोरगरिबांसाठी, हातावर आणून पानावर खाणाऱ्या श्रमिकांसाठीच होतं. सगळे राजकीय पक्ष, त्यांची नेतेमंडळी, त्यांचे कार्यकर्ते नावाचे बगलबच्चे लोक सभा, रॅल्या घेत होते. कोव्हिडचे सगळे नियम तुडवत फिरत बिनधास्त होते. विशिष्ट धार्मिक, उत्तेजक घोषणा दिल्या जात होत्या. समाजात ध्रुवीकरण केलं जात होतं. आपले लोक आणि ते लोक अशी भाषा कुजबूज यंत्रणेकडून

सुरू झाली होती. रामाच्या, महाकालेश्वराच्या, कुराणाच्या शपथा दिल्या घेतल्या जात होत्या. जात, समाज आणि पंथांची गणितं नव्यानं मांडली जात होती. मोर्चे निघत होते. अफिम, गांजा, दारूची बरसात होत होती. राज्यात आपल्याच पक्षाची सत्ता कशी आणता येईल यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा होत होती. एकूणच वातावरण धार्मिक आणि जातीय द्वेषाचं करण्यात आलं होतं. इतकंच पुरलं नाही म्हणून ज्या महामारीच्या नावानं मजुरांना हुसकावून लावलं होतं त्या हुसकावण्याला, महामारीलाही केसरिया आणि हिरवा रंग दिला जात होता. 'देशात आलेली ही महामारी एका धार्मिक समूहानं देश नष्ट करण्यासाठी आणली आहे' असं सांगण्याची मोहिम अथकपणे राबवली जात होती. देशातल्या सबसे तेज आणि एक कदम आगे असलेली वेगवेगळी गोदी मीडिया हाऊसेस या षडयंत्रात सामील झाली होती. नागपूर अन् दिल्लीकडं नजर लावून बसलेली ती मीडिया हाऊस 'देशाचा आवाज' बनली होती. 'आम्ही सांगतोय ते असत्य हे असत्य नसून तेच सत्य आहे, महासत्य आहे' असं तारस्वरात किंचाळून ऐकवलं जात होतं.

इंदौर हे राणी अहिल्याबाई ह्या लोकांसाठी राज्य करणाऱ्या राणीचं संस्थान. मजुरांना कसारा घाटात पाणी प्यायला जी विहीर गवसली होती ती याच अहिल्याबाईनं बांधलेली. शहाऐंशीच्या हिंदू-शीख दंग्यात अहिल्याबाईंच्या वारसाच्या रिचर्ड होळकरांच्या ताब्यातला प्रसिद्ध सात मजली होळकरवाडा जाळला होता. तेव्हापासूनच एरवी शांत खुशमिजास असलेलं इंदौर हिंदू-शीख दंग्यात सतत निखाऱ्यावर चालत होतं. आणि याचा रामजन्मभूमी आंदोलन, मंडल-कमंडल वादावेळी इंदौरमध्येही दंगली भडकल्या होत्या. आता तर इंदौर क्लीन सिटी करायचे मनसुबे जाहीर झाले आहेत.

याच दिवसात दिल्लीत तबलीगी जमातीनं निजामुद्दिन मरकजमधे पंधरा-वीस हजार देश-परदेशातल्या जमातवाल्यांचा एक मोठा मेळावा भरवला. महामारीआधीच मेळाव्याला रितसर सरकारी परवानगी मिळाली होती. अमेरिका, ब्रिटन, बांगला देश, सौदी अरेबिया, मलेशिया असे वेगवेगळ्या देशातले जवळजवळ दोन-तीन हजार तबलीगी मेळाव्यात सामिल झाले होते. मेळावा संपला आणि मग मरकजवर धाड पडली. पोलिसांनी अनेकांना अटक केली. मेळावा भरवणारा तब्लीगचा मौलाना साद फरार झाला होता. तो लपून बसला होता आणि तपास यंत्रणा त्याला पकडू शकत नव्हती. मात्र फरार होण्याआधी त्याला एन.एस.ए.चा प्रमुख भेटला होता अशा बातम्याही होत्या.

परदेशी तबलीगी भारतात मेळाव्यासाठी येत असल्याचं गृहमंत्रालयाला माहिती होतं. तबलीगी जमात रितसर परवानगी काढूनच भरवली होती. मौलाना न सापडणं, मात्र त्यानं नागपूर-दिल्लीच्या मांडीवर बसलेल्या मीडियाला फरार असतानाच स्टेटमेंट देणं हे सगळंच संशयास्पद होतं. पोलिसांनी मरकज खाली केली आणि लगेचच सत्तेपुढं लोटांगण घालणारी मीडिया 'ही महामारी फैलण्यासाठी दिल्लीतील 'मरकज' हीच कारणीभूत आहे' अशी स्पेशल, ब्रेकिंग न्यूज, बडी खबर सत्तेपुढे किंचाळून देऊ लागली. धार्मिक नेते, सत्ताधारी पक्षाचे समर्पित कार्यकर्ते, राजकीय पक्षाचे कॅमेराग्रस्त प्रवक्ते बेंबीच्या देठापासून ओरडून गळा सुकेपर्यंत 'त्यांच्या'मुळंच महामारी पसरलीय असं ओरडून सांगू लागले. 'मरकज' हे सुसाईड बॉम्ब आहेत आणि मुसलमान हे सुसाईड बॉम्बर्स आहेत, अशा बातम्या पसरू लागल्या. हे मुसलमान कोरोनाचे विषाणू घेऊन देशभर फिरतायत असा

**(पान क्र. ५३वर)**

खिडक्या बंद होत्या तरी एक माशी गेली काही मिनिटे बसमध्ये चकरा मारत होती. ते एक विलक्षण दृश्य होते. ती थकलेल्या पंखावर शांतपणे मागे आणि पुढे उडत होती. जानीनच्या नजरेतून ती निसटली. नंतर तिच्या नवऱ्याच्या स्थिर हातावर ती बसत असताना तिने तिला पाहिले. हवा थंड होती. खिडक्यांवर आपटणाऱ्या प्रत्येक वालुकामय वाऱ्याच्या झोताबरोबर ती माशी थरथरत होती. हिवाळ्यातील सकाळच्या अंधुक प्रकाशात, धातूचा पत्रा आणि गाडीचे आस यांच्यातील जोराच्या भांडणांत, गडगडत, हेलकावे खात गाडी महत्प्रयासाने अंतर तोडत होती. जानीनने तिच्या नवऱ्याकडे पाहिले. त्याच्या अरुंद कपाळाच्या खाली वाढत असलेला भुऱ्या रंगाचा केसाचा पुंजका, त्याचे पसरट नाक आणि थुलथुलीत तोंडामुळे, मार्सेल दुर्मुखलेल्या प्राण्यासारखा दिसत होता. रस्त्यावरील प्रत्येक खळग्यात तो तिला धक्का देत असल्याचे तिला जाणवत होते. अशा धक्क्यानंतर त्याचे अवजड धूड स्थिरावयाचे त्याच्या पसरलेल्या पायांवर, आणि तो व्हायचा परत अचेतन आणि शून्य मनस्क – शून्य नजरेने पाहत. शर्टच्या कफच्या खाली, मनगट झाकणाऱ्या लोकरीच्या मऊ अंतर्वस्त्रामुळे अधिकच आखूड दिसत असलेल्या त्याच्या केसविरहित जाड हाताशिवाय, त्याच्यात काहीच क्रियाशील नाही असे दिसत होते. त्याचे हात त्याच्या गुडघ्यांच्या मध्ये ठेवलेल्या एक लहान सूटकेसाला एवढे गच्च धरून होते की, त्यांना माशीचे थबकत थबकत फिरणे जाणवलेले नाही असे दिसत होते.

अचानक वाऱ्याचा घोंघावण्याचा आवाज स्पष्टपणे ऐकू आला नि बसच्या सभोवतालचे दाट रवाळ धुके अधिकच दाट झाले. आता वाळू लहान लहान गठ्ठ्यात, अदृष्ट हातांनी फेकल्यासारखे खिडक्यांवर आदळू लागली. त्या माशीने तिचे गारठलेले पंख जोरात हलविले, पाय ताणले आणि ती उडून गेली. बसची गती कमी झाली आणि ती थांबणार असे वाटले. परंतु सकृद्दर्शनी वारा थांबला, धुके किंचित विरले आणि गाडी फिरून गती घेऊ लागली. धुळीत बुडालेल्या दृश्यात प्रकाशाच्या फटी दिसू लागल्या. पत्रा कापून तयार केली आहेत असे वाटणारे दोन किंवा तीन किडकिडीत पांढरट ताडांची झाडे एकाएकी खिडकीत दृष्टीस आली पुढच्या क्षणी अदृश्य होण्याकरिता.


'कसला हा भूप्रदेश?' मार्सेल म्हणाला.

"हॉटेलसमोरच्या रस्त्यावर ती वाट पाहात उभी होती. पांढरी वस्त्रे परिधान केलेल्यांची गर्दी वाढत होती. एकही स्त्री दिसत नव्हती आणि जानीनला वाटले की, तिने एवढे पुरुष कधीही पाहिले नाहीत. तरीही त्यांच्यातल्या एकानेही तिच्याकडे पाहिले नाही. त्यांच्यातले काही जण तिला पाहात आहेत असे न दाखविता सावकाश तिच्याकडे मान वळवीत होते, तेव्हा त्यांचे उन्हाने रापलेले कृश चेहरे तिला एक सारखेच दिसत होते; बसमधल्या फ्रेंच सैनिकाचा चेहरा आणि हातमोजे घातलेल्या अरबाचा चेहरा.."

# व्यभिचारी स्त्री

**अल्बेर कामू**

अनु.
**सिद्राम पाटील**
sidrampatil1@gmail.com



झोपल्याचे सोंग करणाऱ्या आणि आपापल्या बर्नोसेसमध्ये लपलेल्या अरबांनी बस भरली होती. काही जण सीटवर पाय मुडपून बसले होते आणि गाडीच्या गतीबरोबर ते इतरांपेक्षा अधिक हेलकावे खात होते. त्यांच्या चुप्पीचे आणि निर्विकारपणाचे दडपण जानीनवर येऊ लागले; तिला असे वाटले की, जणु ती कित्येक दिवस मुक्यांसोबती सोबत प्रवास करीत आहे. तथापि रेल्वेच्या शेवटच्या स्थानकापासून बस पहाटेच निघाली होती आणि सकाळच्या थंडीत, किमान सुरुवातीला तरी ज्याची हद्द सर्व दिशांनी तांबड्या क्षितीजापर्यंत विस्तारलेली होती त्या खडकाळ आणि उजाड पठारावरुन ती दोन तास धावत होती; पण नंतर वारा सुटला नि त्याने हळूहळू तो विस्तीर्ण विस्तार गिळून टाकला. त्या क्षणापासून, प्रवाशांनी अधिक काही पाहिले नव्हते, एकामागून एक त्यांनी बोलणे बंद केले आणि अधूनमधून गाडीत गाळून आलेल्या वाळूने चुरचरणारे त्यांचे ओठ नि डोळे पुसून घेत एक प्रकारच्या निद्राहीन रात्रीत ते शांतपणे पुढे जात राहिले.

'जानीन!' तिच्या नवऱ्याच्या हाकेने ती दचकली. परत एकदा तिने विचार केला की, तिच्यासारख्या उंच नि धडधाकट व्यक्तीसाठी हे नाव किती हास्यास्पद आहे. मार्सेल त्याची नमुन्याची पेटी कुठे आहे हे जाणून घेऊ इच्छीत होता. सीटच्या खालच्या रिकाम्या जागेत तिने तिच्या पायांनी शोध घेतला आणि एक वस्तू पायाला लागली. ती तीच आहे असा तिने निर्णय घेतला. काहीसा दम लागल्याशिवाय ती पुढे वाकू शकत नव्हती. तरी तिने शाळेत जिम्नॅस्टिकमध्ये पहिले बक्षीस मिळविले होते आणि दम लागणे काय आहे तिला माहीत नव्हते. त्याला खूप दिवस झाले का? पंचवीस वर्षे. पंचवीस वर्षे काहीच नाहीत. कारण तिला असे वाटते की, कालच तर ती स्वतंत्र आयुष्य आणि लग्न या दरम्यान घुटमळत होती. कालच तर ती भयाकुल होऊन विचार करीत होती त्या दिवसांचा जेव्हा ती वयस्कर एकटी होईल. ती एकटी नव्हती आणि तिच्यासोबत नेहमी राहू इच्छिणारा तो कायद्याचा विद्यार्थी आता तिच्या बाजूला होता. तो जरी तिच्यापेक्षा थोडा बुटका होता आणि तिला त्याचे उतावळे आणि चढ्या आवाजातील हसणे किंवा बाहेर आलेले त्याचे काळे डोळे फारसे आवडत नसले तरी शेवटी तिने त्याला स्वीकारले होते; जीवनाला सामोरे जाण्याचे त्याचे धारिष्ट्य- जे या देशातील सर्व फ्रेंच लोकांत होते- तिला आवडले होते. घटना किंवा माणसे त्याच्या अपेक्षेला उतरायची नाहीत तेव्हा त्याचा उतरलेला चेहराही तिला आवडायचा. सर्वांत महत्त्वाचे तिच्यावर प्रेम केलेले तिला आवडायचे आणि तो तिच्याकडे सतत लक्ष देत होता. ती त्याच्यासाठीच आहे याची खूप वेळा जाणीव करुन देऊन त्याने तिचे असणे एक वास्तव केले होते. नाही, ती एकटी नाही...

बस अनेकदा जोरात भोग्यांचे आवाज करत, न दिसणाऱ्या अडथळ्यांतून मार्ग काढीत होती. तथापि गाडीच्या आत कोणीही हलले नाही. जानीनला अचानक जाणवले की, कोणी तरी तिला न्याहाळत आहे आणि ती वळली मधल्या मार्गाच्या पलीकडच्या सीटकडे. तो अरब नव्हता. निघाल्यापासून त्याला पाहिले नाही याचे तिला आश्चर्य वाटले. त्याने फ्रेंच रेजिमेंट ऑफ सहाराचा गणवेश आणि त्याच्या कोल्ह्यासारख्या लांब आणि निमुळत्या, उन्हाने काळवंडलेल्या चेहऱ्यावर मळकट रंगाची तागाच्या कापडाची टोपी घातली होती. त्याचे भुरे डोळे स्थिरपणे टक लावून पाहात तिचे एक प्रकारच्या दुर्मखलेल्या नापसतीने निरीक्षण करीत होते. ती एकदम लाजली आणि तिच्या नवऱ्याकडे वळली. तो अजूनही सरळ समोर धुके आणि वारा

पाहात होता. ती तिचा कोट लपेटून बसली परंतु ती अजूनही पाहू शकत होती त्या उंच आणि लुकड्या फ्रेंच सैनिकाला. तो त्याच्या बेतशीर सदऱ्यात एवढा लुकडा दिसत होता की, त्याला शुष्क आणि ठिसूळ वस्तूंनी, वाळू आणि हाडाच्या मिश्रणाने बनविले आहे असे वाटत होते. मग तिने पाहिले तिच्या समोरच्या अरबांचे कृश हात आणि रापलेले चेहरे आणि तिच्या लक्षात आले की, त्याच्या अंगावर भरपूर कपडे असतानाही त्याच्याकडे भरपूर जागा आहे जेव्हा की, तशाच सीटवर ती आणि तिचा नवरा दामटून बसल्यासारखे वाटत होते. तिने आपला कोट स्वतःच्या गुडघ्यांभोवती ओढला. पण ती एवढी लठ्ठ नाही - उंच आणि काहीशी छान भरलेली, गुबगुबीत आणि तरीही हवी हवीशी वाटणारी आहे, जेव्हा पुरुष तिच्याकडे पाहात तेव्हा तिला ते चांगले माहीत होते. मोठ्या शरीराच्या तुलनेत तिचा काहीसा बालीश चेहरा, पाणीदार निष्पाप डोळे यामुळे ती ऊबदार आणि मोहक आहे याची तिला जाणीव होती.

नाही, तिने अपेक्षा केली होती त्याप्रमाणे काहीच घडले नाही. मार्सेल तिला त्याच्या दौऱ्यावर सोबत घेऊन जाऊ इच्छीत होता तेव्हा तिने विरोध केला होता. काही काळापासून तो या दौऱ्याचा विचार करीत होता. नक्की सांगायचे तर युद्ध संपल्यापासून, जेव्हा व्यवसायाची स्थिती सामान्य झाली होती. युद्धापूर्वी कायद्याचा अभ्यास सोडल्यानंतर त्याने त्याच्या आई-वडिलांकडून ताब्यात घेतलेला लहान कापडांचा व्यवसाय, त्यांच्या बऱ्यापैकी चांगल्या राहणीमानाची सोय करीत होता. समुद्र किनाऱ्यावर तारुण्याची वर्षे आनंदाची असू शकतात; परंतु त्याला शारीरिक श्रम आवडत नव्हते आणि लवकरच त्याने तिला समुद्रकिनारी घेऊन जाणे सोडून दिले होते. फक्त रविवारी दुपारच्या फेरफटक्यासाठी लहान कार त्यांना शहराबाहेर घेऊन जात होती. उर्वरित वेळी अर्ध-देशी, अर्ध-युरोपीयन वस्तीतील, कमानीच्या रस्त्याच्या सावलीतील त्याचे रंगीबेरंगी लहान कापडांनी भरलेले दुकान तो पसंत करायचा. ते दुकानाच्या वर, अरब पडदे आणि गॅलरी बार्बेसच्या फर्निचरने सजविलेल्या तीन खोल्यांत राहात होते. त्यांना मूलबाळ नव्हते. अर्धवट बंद दरवाजाच्या मागच्या अर्धवट अंधारात वर्षे निघून गेली. उन्हाळा, समुद्र किनारा, सहली, निव्वळ आकाशाचे दर्शन, या भूतकाळातील गोष्टी होत्या. मार्सेलला त्याच्या व्यवसायाव्यतिरिक्त इतर कशातही रस नव्हता असे दिसत होते. त्याची खरी नितांत आवड पैसा आहे, हे तिने शोधून काढले आहे असे तिला वाटले होते आणि खरंच का ते माहीत नसताना तिला ते आवडले नव्हते. काही झाले तरी ते तिच्या फायद्यासाठीच होते. तो कंजुष नव्हता, खूप उदार होता, खास करून तिच्या बाबतीत. ‘मला काही झाले’ तो म्हणायचा ‘तर तुझ्या उपजीविकेची व्यवस्था केलेली आहे.’ खरंच उपजीविकेची तजवीज करणे हे आवश्यक आहे. पण सर्व उर्वरितांसाठी जे सर्वांत प्राथमिक गरजेचे नाही, त्यासाठीची तजवीज कशी करावी? क्वचित वेळा मधून मधून तिला असे संदिग्धपणे वाटत होते. दरम्यान ती मार्सेलला त्याचे हिशोब ठेवण्यात मदत करायची आणि कधी कधी त्याच्याऐवजी ती दुकानात बसायची. उन्हाळा सगळ्यात कठीण काळ असायचा जेव्हा उष्णता कंटाळवाणेपणाची मधुर संवेदनादेखील गुदमरवून टाकायची.

उन्हाळ्यात घडले ते असे- अचानक युद्ध सुरू झाले, मार्सेलला लष्करी सेवेसाठी बोलविण्यात आले आणि तब्येतीच्या कारणाने नाकारण्यात आले, लहान कापडांचा तुटवडा झाला, व्यवसाय ठप्प झाला आणि रस्ते रिकामे आणि तापलेले. जर आता काही घडले तर तिच्या उपजीविकेसाठी

केलेली तरतूद नसणार. त्यामुळे लहान कापड बाजारात आल्या आल्या मार्सेलने विचार केला की, वरच्या पठारावरील आणि दक्षिणेकडील गावांना स्वत:च भेट द्यायची आणि मध्यस्थाशिवाय अरब व्यापाऱ्यांना थेट माल विकायचा. तो तिला सोबत घेऊन जाऊ इच्छीत होता. तिला माहीत होते की, प्रवास अवघड असणार. तिला श्वासाचा त्रास होता आणि तिने घरीच राहणे पसंत केले असते; परंतु तो हट्ट करीत होता आणि तिने ते मान्य केले. कारण ते नाकारण्यासाठी खूप शक्ती खर्ची घालावी लागली असती. आता ते इथे होते आणि तिने कल्पना केल्याप्रमाणे काहीच नव्हते. तिला उष्णता, माशांचे थवे, आणि ॲनिसिडच्या वासांनी भरलेली घाणेरडी हॉटेल्सची भीती वाटत होती. तिने विचार केला नव्हता थंडीचा, झोंबणाऱ्या वाऱ्याचा आणि हिमनदीने वाहून आणलेली आणि हिम वितळल्यानंतर मागे राहिलेल्या दगड, वाळूच्या पसाऱ्यानी भरलेल्या अर्ध-ध्रुवीय पठाराचा. तिने स्वप्नसुद्धा पाहिले होते ताडाच्या झाडांचे आणि मऊ वाळूचे. आता तिने पाहिले की, वाळवंट तसे मुळीच नव्हते. होते फक्त दगड, सगळीकडे दगड, दगडी धुळीने भरलेले कर्णकूट आवाज करणारे आणि थंड आकाश आणि जमिनीवर, जमिनीवर वाळलेल्या गवताशिवाय दगडांमध्ये काहीच उगवत नव्हते.

बस आकस्मिकरीत्या थांबली. अर्थबोध न होता जी भाषा ती आयुष्यभर ऐकत आली होती त्या भाषेत, ड्रायव्हर मोठ्याने काही म्हणाला. 'काय झाले?' मार्सेलनी विचारले. ड्रायव्हर या वेळी फ्रेंच भाषेत म्हणाला की, कार्बोरेटरमध्ये वाळू जमा झाली असणार आणि परत एकदा मार्सेलनी या देशाला शिवी दिली. ड्रायव्हर गमतीने हसला आणि ठामपणे म्हणाला की, हे काहीच नाही, तो कार्बोरेटर स्वच्छ करेल आणि ते परत निघतील. त्याने दरवाजा उघडला आणि त्या सर्वांच्या चेहऱ्यावर असंख्य वाळूच्या कणांनी फटकारे देत थंड वारा बसमध्ये शिरला. सर्व अरबांनी शांतपणे आपले नाक आपल्या बुर्नोसेसमधे खुपसले आणि आकसून बसले. 'दरवाजा बंद कर,' मार्सेल ओरडला. ड्रायव्हर हसत दरवाजाकडे परतला. त्याने घाई न करता डॅश बोर्डखालची काही अवजारे घेतली आणि मग तो दरवाजा बंद न करताच धुक्यात लहान होत परत पुढे दिसेनासा झाला. मार्सेलनी निःश्वास सोडला. 'त्याने आयुष्यात कधी मोटार पाहिली नाही याची खात्री बाळग' 'ओह, गप्प बस' जानीन म्हणाली. ती अचानक दचकली. रस्त्याच्या कडेला बसच्या जवळ कपड्यांत लपेटलेल्या काही आकृती स्थिर उभ्या होत्या. बुर्नोसच्या टोपीखाली आणि संरक्षक बुरख्यामागे त्यांचे फक्त डोळे दिसत होते. निःशब्द, अनपेक्षित आलेले ते प्रवाशांकडे टक लावून पाहात होते. 'मेंढपाळ' मार्सेल म्हणाला.

गाडीच्या आतमध्ये पूर्ण शांतता होती. सर्व प्रवासी मान खाली करून, अमर्याद पठारावर मोकाट वाहणाऱ्या वाऱ्याचा आवाज ऐकत आहेत असे वाटत होते. अचानक जानीनच्या लक्षात आले की, गाडीत प्रवाशांचे सामान जवळपास काहीच नाही. त्या शेवटच्या रेल्वे स्टेशनवर ड्रायव्हरने त्यांच्या पेट्या आणि काही गाठोडे गाडीच्या छतावर चढविले होते. गाडीतील सामान ठेवण्याच्या माळ्यावर गाठी असलेल्या काठ्या आणि बाजारहाटासाठीच्या टोपल्यांशिवाय काहीच दिसत नव्हते. हे सर्व दक्षिणेकडील लोक रिकाम्या हातांनी प्रवास करीत आहेत, असे सकृद्दर्शनी दिसत होते.

ड्रायव्हर, अजून उत्साही, परत येत होता. ज्या संरक्षक बुरख्यानी त्याने त्याचा स्वतःचा चेहरा झाकला होता, त्याच्यावर फक्त त्याचे डोळे हसत होते. तो म्हणाला की, ते लवकरच मार्गस्थ

होतील. त्याने दरवाजा बंद केला. वारा शांत झाला आणि आता खिडक्यांवरील वाळूच्या माऱ्याचा आवाज अधिक चांगला ऐकू येत होता. इंजिन चालू झाले आणि बंद पडले. खूप वेळ स्टार्टरनी प्रयत्न केल्यानंतर शेवटी ते सुरू झाले आणि ड्रायव्हरने एक्सेलेटर दाबून त्याची गती वाढविली. मोठी उचकी देऊन बस निघाली. अजून स्तब्ध उभ्या असलेल्या जीर्ण कपड्यातील मेंढपाळाच्या छोट्या समूहातून एक हात वर उठला नि त्यांच्या मागच्या धुक्यात हळूहळू दिसेनासा झाला. रस्ता अधिकच वाईट लागल्याने गाडी आता रस्त्यावर आदळू लागली. हादऱ्यांनी अरब सारखे डुलत होते. असे असले तरी जानीनला झोप आल्यासारखे वाटत होते. तेव्हा अचानक तिच्यासमोर औषधीवडी असलेली एक लहान पिवळी डबी आली. कोल्ह्यासारखा असलेला सैनिक तिला पाहून हसत होता. ती घुटमळली. तिने एक वडी घेतली आणि त्याचे आभार मानले. त्या कोल्ह्याने ती डबी खिशात घातली आणि त्याच वेळी त्याने स्वत:चे हसूही गिळले. आता तो त्याच्या सरळ समोर रस्त्याकडे पाहात होता. जानीन मार्सेलकडे वळली आणि तिला दिसली फक्त त्याची भरभक्कम मान. तो खिडकीतून, ठिसूळ खडकाच्या भरावातून उठणाऱ्या दाट धुक्याकडे पाहत होता.

ते खूप वेळ प्रवास करीत होते आणि थकव्याने बसमधला जिवंतपणा विझून गेला होता. मग एकाएकी बाहेर मोठा आरडाओरडा ऐकू आला. बुर्नोसेस घातलेली मुलं, भोवऱ्यासारखे गोल फिरत, उड्या मारत, टाळ्या वाजवीत बसच्या भोवती पळत होती. बस आता दोन्ही बाजूला बसकी घरे असणाऱ्या लांबलचक रस्त्यावरुन जात होती. ते ओएसिसमध्ये प्रवेश करीत होते. वारा अजून जोरात वाहात होता, परंतु पूर्वी ज्यामुळे प्रकाश येण्यात व्यत्यय येत होता त्या वाळूच्या कणांना आता भिंतीनी अडविले होते. तरीही आकाश अजून ढगाळ होते. मोठ्या आरडा ओरड्यात आणि ब्रेकचा कर्कश आवाज करीत मलिन खिडक्या असलेल्या हॉटेलच्या कच्च्या विटाच्या कमानी पथाच्या समोर बस थांबली. जानीन बाहेर पडली आणि रस्त्यावर आली तेव्हा ती लटपटली. घरांच्या वर एक बारीक पिवळा मिनार तिला दिसला. तिच्या डाव्या बाजूला ओएसिसची पहिली ताडांची झाडे उभी होती आणि त्यांच्याकडे जाणे तिला आवडले असते; परंतु जरी जवळपास दुपार झाली होती तरी खूप कडक थंडी होती. वाऱ्यामुळे तिला कापरे भरले होते. ती मार्सेलकडे वळली आणि तो सैनिक तिच्याकडे येताना तिने पाहिला. तो हसेल किंवा सलाम करेल, अशी तिची अपेक्षा होती. तो तिच्याकडे न पाहता तिच्या बाजूने गेला आणि दिसेनासा झाला. बसच्या छतावर ठेवलेली लहान कापडांची एक सैनिकी पेटी उतरवून घेण्यात मार्सेल व्यस्त होता. ते सोपे नव्हते. सामानाची काळजी घेणारा ड्रायव्हर एकटाच होता आणि तो एव्हाना छतावर उभा होता. बसच्या भोवती जमलेल्या बुर्नोसेसच्या वर्तुळाला थोपवून. हाडे आणि कातडीतून निर्माण केल्यासारख्या वाटणाऱ्या चेहऱ्यांच्या वेढ्यात आणि खोल कर्कश्श आरडा ओरड्याच्या घेऱ्यात जानीनला अचानक तिच्या थकव्याची जाणीव झाली. 'मी आत जात आहे.' ती मार्सेलला म्हणाली. तो अधीरतेने ड्रायव्हरवर ओरडत होता.

तिने हॉटेलमध्ये प्रवेश केला. एक सडपातळ मितभाषी फ्रेंच माणूस तिच्याकडे आला. तो व्यवस्थापक होता. त्याने तिला पुढे होऊन दुसऱ्या मजल्यावरील रस्त्याच्या बाजूच्या सज्ज्यात आणि एका खोलीत नेले. त्या खोलीत फक्त एक लोखंडी पलंग, एक पांढरी एनामल्ड खुर्ची, बिनपडद्याचे कपडे ठेवण्याचे कपाट आणि लव्हाळ्याच्या

पडद्याच्या मागे बारीक वाळूने आच्छादित वॉश बेसिन होते. व्यवस्थापकाने दरवाजा बंद केला, तेव्हा जानीनला पांढऱ्या उघड्या भिंतीतून थंडी येत आहे असे वाटले. बॅग कुठे ठेवावी आणि स्वत: कुठे बसावे हे तिला कळत नव्हते. तिला एक तर पलंगावर आडवे व्हावे लागेल किंवा उभे राहावे लागेल आणि दोन्ही प्रसगांत थंडीने कुडकुडत. ती बॅग धरून आणि छताच्या जवळ आकाशाकडे उघडणाऱ्या एक प्रकारच्या फटीच्या खिडकीकडे पाहात उभी राहिली. ती वाट पाहात होती परंतु तिला माहीत नव्हते कशाची. तिला फक्त जाणीव होती तिच्या एकाकीपणाची, ठाव घेणाऱ्या थंडीची आणि तिच्या हृदयावरच्या प्रचंड ओझ्याची. मार्सेलच्या संतापाने ओरडण्याच्या आवाजासह रस्त्यावरून येणाऱ्या आवाजाला जवळजवळ बहिरी तर दुसऱ्या बाजूला खिडकीच्या फटीतून, ताडाच्या झाडात वाहणाऱ्या वाऱ्यामुळे निर्माण झालेल्या नदीच्या आवाजाला अधिक सजग; ती खरं म्हणजे स्वप्न पाहात होती. तो आवाज आता अगदी जवळ आहे, असे तिला वाटत होते. मग वारा वाढत आहे असे वाटले आणि पाण्याच्या हळुवार लहरीच्या उसळणाऱ्या लाटा झाल्या. भिंतीच्या पलीकडे ताठ, लवचीक ताडाच्या झाडाचे समुद्र वादळात उलगडत आहे, अशी कल्पना तिने केली. तिने अपेक्षा केली होती त्यासारखे काहीच नव्हते परंतु त्या न दिसणाऱ्या लाटांनी तिच्या श्रांत डोळ्यांना ताजेतवाने केले. थंडी तिच्या जाड पायावर चढत गेली तशी लोंबकळणारे हात घेऊन, किंचित वाकलेली ती खिन्न उभी होती. ती स्वप्न पाहात होती ताठ आणि लवचीक ताडाच्या झाडांचे आणि त्या मुलीचे जी एके काळी ती होती.

* * * * * *

स्नान करून ते खाली भोजन कक्षात गेले. उघड्या भिंतीवर गुलाबी नि फिकट जांभळ्या रंगाच्या चिकट पार्श्वभागात बुडून गेलेले उंट आणि ताडांची झाडे रंगवली होती. बाहेरच्या कमानीमुळे खिडक्यातून खूप कमी प्रकाश आत येत होता. मार्सेलने व्यवस्थापकांकडे व्यापाऱ्यांविषयी विचारणा केली. नंतर सैन्याची पदके असलेल्या सदऱ्यातल्या एका वयस्कर अरब माणसाने जेवण वाढले. मार्सेलने विचारांत मग्न असल्याने ब्रेडचे लहान लहान तुकडे केले. त्याने त्याच्या बायकोला पाणी पिण्यापासून थांबवले. ‘ते पाणी उकळविलेले नाही, वाईन घे.’ तिला वाईन आवडत नव्हती. कारण तिने तिला झोप आल्यासारखी वाटायचे. शिवाय जेवणात डुकराचे मांस होते. ‘ते कुरआनामुळे हे खात नाहीत परंतु कुरआनाला माहीत नाही की, चांगले शिजविलेल्या डुकराच्या मांसाने आजार होत नाहीत. आपण फ्रेंच जाणतो कसं शिजवायचे ते. तू कशाचा विचार करीत आहेस?’ जानीन कशाचाही विचार करीत नव्हती किंवा कदाचित स्वयंपाक करणाऱ्यांचा प्रेषितावरील विजयाबाबत विचार करीत होती. परंतु तिला घाई करावी लागली. उद्या सकाळी ते अजून दक्षिणेकडे जाण्यासाठी निघणार होते. आज दुपारी त्यांना इथल्या सर्व महत्त्वाच्या व्यापाऱ्यांना भेटायचे होते. मार्सेलने त्या म्हाताऱ्या अरबाला कॉफी लवकर आणायला सांगितले. त्याने न हसता मान हलविली आणि बडबडत तो निघून गेला. ‘सकाळी मंद गतीने, दुपारी फार जलद नाही’ मार्सेल हसत म्हणाला. इतक्यात कॉफी आली. त्यांनी कॉफी पिण्यात नाममात्र वेळ घालविला आणि ते बाहेर पडले. धुळीने भरलेल्या थंड रस्त्यावर आले. मार्सेलने ट्रंक घेऊन जाण्यासाठी एका तरुण अरबाला बोलविले आणि मुद्दा तत्त्वाचा म्हणून त्याच्याशी पैशासाठी घासाघीस केली. त्याने अजून एकदा जानीनला विशद करून सांगितले की, ते नेहमी दुप्पट पैसे मागतात या आशेवर की,

त्याच्या एकचतुर्थांश रकमेवर तडजोड होईल. जानीन त्या ट्रंक घेऊन जाणाऱ्या दोघांमागे अस्वस्थपणे जात राहिली. तिने जाड कोटाच्या आत वूलनचा ड्रेस घातला होता आणि त्याने कमी जागा व्यापली असती तर ते तिला आवडले असते. डुकराचे मांस जरी चांगले शिजविलेले होते आणि तिने थोडीशीच वाईन घेतली होती तरी त्याचा तिला थोडा त्रास होत होता.

ते एका धुळीने माखलेली झाडे असलेल्या लहान सार्वजनिक बागेच्या बाजूने जात होते. त्यांच्यासमोरुन, बुर्नोसेसमध्ये स्वत:ला लपेटून घेत जे अरब आले ते त्यांना न पाहिल्यासारखे करीत त्यांच्या रस्त्यातून बाजूला झाले. जरी त्यांनी जीर्ण कपडे परिधान केले असले तरी तिला वाटले की, तिच्या शहरातील अरबांना माहीत नसलेली भारदस्त चालचलणूक त्यांच्यात आहे. जानीन ट्रंक घेऊन जाणाऱ्यांमागे जात राहिली. ते गर्दीतून तिला रस्ता करून देत होते. ते एका मातीच्या संरक्षक तटातील दरवाजातून आत गेले आणि तशीच धुळीने माखलेली झाडे असलेल्या एका लहान चौकात आले. तो चौक जिकडे विस्तीर्ण होता त्या पलीकडच्या बाजूला कडेने कमान-पथ आणि दुकाने होती. परंतु ते चौकातच तोफेच्या गोळ्याचा आकाराच्या, राखाडी निळ्या रंगाने रंगविलेल्या लहान इमारतीसमोर थांबले. आत दरवाज्यातून येणाऱ्या प्रकाशानेच उजळ झालेल्या एका खोलीत, पांढऱ्या मिशा असणारा एक वयस्कर अरब चमकदार तक्तपोशीच्या मागे उभा होता. तो चहाचे भांडे, तीन लहान रंगीबेरंगी पेल्यांच्या वर, वर-खाली करीत चहा देत होता. अंधारात दुसरे काही पाहण्यापूर्वी पुदिन्याच्या थंड सुवासाने दरवाज्यातच मार्सेल आणि जानीनचे स्वागत केले. उंबरठा ओलांडून, काशाची चहाची भांडी, कप आणि ट्रे यांचे अडथळे आणि पोस्टकार्डांचे मांडलेले प्रदर्शन कसेबसे टाळून मार्सेल काऊंटरपाशी पोहचला होता. जानीन दरवाज्यात थांबली. त्या वेळी तिच्या लक्षात आले की, दुकानाच्या मागच्या भागात खचाखच भरलेल्या पोत्यांवर बसलेले दोन अरब त्यांच्याकडे पाहून हसत आहेत. लाल आणि काळ्या रंगाचे कशिदा केलेले मफलर भिंतीवर टांगलेले होते, जमिनीवर पोती आणि सुगंधी बिया असलेल्या पेट्या अस्ताव्यस्त पसरलेल्या होत्या. काऊंटरवर ब्रासचे चमकदार तराजू आणि ज्यावरील आकडे पुसले गेले होते असे कापड मोजण्याचे गज आणि साखरेच्या पावाची रांग होती. त्यातले एक त्याच्या जाडेभरड्या निळ्या कागदातून बाहेर काढलेले होते आणि त्याचा वरचा भाग कापलेला होता. खोलीत चहाच्या सुवासाच्या पाठीमागे दडलेला लोकर आणि मसाल्याचा वास उघडा पडला. त्या वयस्कर व्यापाऱ्याने चहाची केटली खाली ठेवली आणि म्हणाला 'शुभदिन.'

मार्सेल शीघ्रतेने खालच्या आवाजात व्यापाराविषयी बोलला. नंतर त्याने ट्रंक उघडली आणि वुलन आणि सिल्कच्या वस्तू प्रदर्शित केल्या; त्याच्या विक्रीसाठीच्या वस्तू त्या वयस्कर व्यापाऱ्यासमोर उकलून पसरविण्यासाठी त्याने तराजू आणि गज मागे सरकविले. तो उत्तेजित झाला, आवाज वाढविला, उदासपणे हसला त्या स्त्रीप्रमाणे जी इतरांना प्रभावित करू इच्छिते आणि तिला स्वत:बद्दलची खात्री नाही. आता तो हात विस्तृत पसरवून खरेदी-विक्री व्यवहाराचे हातवारे करीत होता. त्या वयस्कर माणसाने मान हलविली आणि त्याच्या पाठीमागच्या दोन अरब माणसांकडे चहाचे तबक सरकविले आणि तो मोजके शब्द बोलला जे मार्सेलला नाउमेद करणारे आहेत असे वाटत होते. मार्सेलने त्याच्या वस्तू उचलल्या, त्या परत ट्रंकमध्ये भरल्या. त्यानंतर त्याने त्याच्या कपाळावरचा नसलेला घाम पुसला. त्या लहान हमालास

बोलविले आणि ते निघाले कमान पथाकडे. पहिल्या दुकानात, जरी व्यापाऱ्याने त्याच प्रकारे देवतुल्य असल्याचे दाखविण्यास सुरुवात केली असली तरी ते थोडे नशीबवान ठरले. 'त्यांना वाटते ते सर्वशक्तिमान देव आहेत.' मार्सेल म्हणाला 'परंतु तेदेखील व्यापार करतात! प्रत्येकासाठी जीवन कष्टाचे असते.'

जानीन प्रतिसाद न देता मागे मागे जात राहिली. वारा जवळजवळ थांबला होता. आकाश काही जागी स्वच्छ होत होते. ढगांच्या जाड थरात तयार झालेल्या खोल खळग्यातून थंड प्रखर प्रकाश येत होता. त्यांनी आता चौक सोडला होता आणि ते अरुंद रस्त्यातून, मातीच्या भिंतीच्या बाजूने जात होते. भिंतीवर कुजलेले जीर्ण गुलाब किंवा अधूनमधून वाळलेले आणि किडलेले डाळिंब लोंबकळत होते. या गल्लीत धूळ आणि कॉफीचा वास, जळणाऱ्या लाकडाचा धूर, आठल्यांचा आणि मेंढ्यांचा वास सर्वत्र भरून होता. भिंतीत काढलेली दुकाने एकमेकांपासून दूर अंतरावर होती; जानीनला तिचे पाय जड होत आहेत असे वाटले; परंतु तिचा नवरा हळूहळू अधिक उत्साहित होत होता. त्याच्या विक्रीला सुरुवात झाली होती आणि त्याला छान वाटत होते; तो जानीनला म्हणाला 'बेबी', दौरा वाया जाणार नाही.' 'निश्चितच' जानीन यांत्रिकपणे म्हणाली, 'थेट त्यांच्याशी व्यवहार करणे हे केव्हाही अधिक चांगले'.

ते दुसऱ्या रस्त्याने मध्यवर्ती ठिकाणाकडे परतले. आता दुपार सरत आली होती. आकाश जवळजवळ पूर्ण स्वच्छ होते. ते चौकात थांबले. मार्सेलने हात चोळले आणि तो त्याच्या समोरच्या ट्रंककडे प्रेमळ दृष्टीने पाहात होता. 'हे बघ' जानीन म्हणाली. चौकाच्या दुसऱ्या बाजूकडून एक उंच, सडपातळ, उत्साही अरब आकाशी निळ्या रंगाचे बुर्नोस, फिकट तांबूस रंगाचे बूट आणि हातमोजे घालून, तपकिरी कांतीचा गरुडासारखा चेहरा घेऊन गर्विष्ठपणे झोकात येत होता. फक्त त्याने पागोट्यासारखे घट्ट गुंडाळलेल्या चेचेमुळे जानीन ज्यांचे अधूनमधून कौतुक करायची, त्या एतद्देशीय प्रशासनाच्या प्रमुख फ्रेंच अधिकाऱ्यांपासून तो वेगळा दिसत होता. तो एका निश्चित धीमेपणाने त्यांच्याकडे येत होता, परंतु सावकाश एका हाताचे मोजे काढत तो त्या सर्वांच्या पलीकडे पाहात आहे असे वाटत होते. 'बघा,' मार्सेल तुच्छतेने खांदे उडवीत म्हणाला, 'त्याला वाटते तो जनरल आहे.' होय, येथल्या सगळयाकडे तो स्वाभिमानी रुबाब आहे; परंतु हा खरं तर जरा नको इतका जास्त आहे. जरी ते मोकळ्या जागेत होते तरी तो सरळ त्यांच्या ट्रंककडे, त्याकडे न पाहता, त्यांना न पाहता येत होता. मग त्यांच्यातील अंतर झपाट्याने कमी झाले आणि तो अरब त्यांच्याजवळ आला तेव्हा मार्सेलने झटकन सैनिकी पेटीचा दांडा पकडला आणि त्याला त्याच्या रस्त्यातून बाजूला ओढले. अरब गेला– कशाचीही दखल न घेता, तीच चाल कायम ठेवत – संरक्षक भिंतीकडे. जानीनने तिच्या नवऱ्याकडे पाहिले, त्याचा चेहरा नक्षा उतरल्यासारखे दिसत होता. 'त्यांना वाटते ते आता काहीही करू शकतात.' तो म्हणाला. जानीनने त्याला उत्तर दिले नाही. तिला त्या अरबाच्या अविवेकी उद्धटपणाचा तिरस्कार वाटला आणि एकाएकी ती दुःखी झाली. तिला निघून जावे वाटत होते आणि तिला तिच्या लहानशा निवासस्थानाची आठवण आली. त्या हॉटेलकडे, त्या गारठलेल्या खोलीत, जाण्याच्या कल्पनेने ती नाउमेद झाली. वाळवंट पाहण्यासाठी किल्ल्या– भोवतालच्या चौथऱ्यापर्यंत चढून जाण्याचा व्यवस्थापकांनी दिलेला सल्ला तिला एकाएकी आठवला. तिने मार्सेलला हे सांगितले आणि म्हणाली की, त्याला हॉटेलमध्ये ट्रंक ठेवता येईल, परंतु तो थकला होता

आणि त्याला रात्रीच्या जेवणापूर्वी थोडे झोपायचे होते. 'कृपाकरून' जानीन म्हणाली त्याने एकाएकी सावधपणे तिच्याकडे पाहिले. 'निश्चितच, प्रिये' तो म्हणाला.

हॉटेलसमोरच्या रस्त्यावर ती वाट पाहात उभी होती. पांढरी वस्त्रे परिधान केलेल्यांची गर्दी वाढत होती. एकही स्त्री दिसत नव्हती आणि जानीनला वाटले की, तिने एवढे पुरुष कधीही पाहिले नाहीत. तरीही त्यांच्यातल्या एकानेही तिच्याकडे पाहिले नाही. त्यांच्यातले काही जण तिला पाहात आहेत असे न दाखविता सावकाश तिच्याकडे मान वळवीत होते, तेव्हा त्यांचे उन्हाने रापलेले कृश चेहरे तिला एक सारखेच दिसत होते; बसमधल्या फ्रेंच सैनिकाचा चेहरा आणि हातमोजे घातलेल्या अरबाचा चेहरा, चेहरे चाणाक्ष आणि गर्विष्ठ. त्यांनी तो चेहरा परदेशी स्त्रीकडे वळविला, त्यांनी तिला पाहिले नाही. मग ती सुजलेले घोटे घेऊन उभी असताना, हळुवार आवाज न करता ते तिच्याभोवती फिरले आणि तिची अस्वस्थता आणि तिथून निघून जाण्याची निकड वाढली. 'मी का आले?' परंतु एव्हाना मार्सेल परत येत होता.

ते किल्ल्याकडे जाणाऱ्या पायऱ्या चढले, तेव्हा पाच वाजले होते. वारा पूर्णपणे थांबला होता. आता आकाश पूर्ण स्वच्छ पेरिविकल फुलासारखा निळा होता. कोरडी थंडी त्यांच्या गालांना झोंबत होती. पायऱ्यावर, अर्ध्यात एक वयस्कर अरब भिंतीला टेकून बसला होता. त्याने त्यांना मार्गदर्शक पाहिजे का विचारले. परंतु तो जागेवरून हलला नाही जणू त्याला त्यांच्या नकाराची आधीच खात्री होती. मातीच्या भरावाच्या सपाट जागा बऱ्याच असल्या तरी पायऱ्या लांब आणि चढाच्या होत्या. ते चढत गेले तसे अवकाश विस्तृत होत गेला आणि ते आले थंड आणि कोरड्या अधिक भरपूर प्रकाशात, जिथे ओएसिसमधले सर्व आवाज त्यांच्यापर्यंत स्वच्छ आणि स्पष्ट पोहोचत होते. चैतन्यमय हवा त्यांच्या सभोवताली कंप पावत आहे असे वाटत होते. जसे ते पुढे जात होते तसे कंपन कालावधी वाढत होता; जणू त्यांचे पुढे जाणे प्रकाशाच्या स्फटिकातून पसरत जाणाऱ्या ध्वनिलहरी निर्माण करीत आहे. आणि ते चौथऱ्यावर पोहोचताच, त्यांची नजर खजुराच्या राईपलीकडच्या विस्तीर्ण क्षितिजात हरवून गेली. जानीनला वाटले की, एका ऱ्हस्व आणि भेदून जाणाऱ्या सूरांनी संपूर्ण आकाश निनादत आहे आणि त्याच्या प्रतिध्वनींनी हळूहळू तिच्यावरचा अवकाश व्यापले आहे. नंतर ते एकाएकी नाहीसे झाले; तिला शांतपणे अमर्यादित विस्ताराला सामोरे जाण्यासाठी मागे ठेवून.

कुठल्याही अडथळ्याशिवाय तिची नजर सावकाश पूर्वेकडून पश्चिमेकडे, खरं तर एका परिपूर्ण वक्र रेषेत, फिरली. तिच्या खाली, अरब वस्तीतील निळे आणि पांढरे छत एकमेकांना आच्छादून होते आणि उन्हात वाळत टाकलेल्या मिरीचे त्यांवर गडद लाल डागाचे शितोंडे उडालेले होते. एकही माणूस दिसत नव्हता, परंतु आतल्या प्रांगणातून, कॉफी भाजण्याच्या सुवासासह हसण्याचा आवाज किंवा पायाचे अनाकलनीय ठेके ऐकू येत होते. दूरवर, मातीच्या भिंतीमुळे असमान चौरसात विभागले गेलेल्या ताडाच्या राईत, त्यांची शेंड्यांवरील पाने सळसळत होती. ते चौथऱ्यावर जाणवत नव्हते. त्याच्याही खूप पुढे, क्षितिजापर्यंत पिवळ्या आणि करड्या रंगाच्या दगडाचे राज्य पसरले होते. त्यात कुठलाच जीव दृष्टीस पडत नव्हता. असे असले तरी ओएसिसपासून काही अंतरावर ताडाच्या राईच्या पश्चिम सीमेवर असलेल्या मरुघळी जवळ विस्तृत काळे तंबू दिसत होते. त्यांच्या सभोवती दुरून खूप लहान दिसणाऱ्या निश्चल एक-मदारी उंटाच्या कळपामुळे, राखाडी जमिनीवर अनोळखी

हस्ताक्षरातील काळे अक्षर तयार झाले होते. त्यांच्या अर्थाची उकल करावी लागणार होती. मरूभूमीच्या वरची शांतता, अवकाशाइतकेच विस्तीर्ण होती.

संरक्षक कठड्यावर जानीन पूर्णपणे वाकलेली होती. ती अवाक् झाली होती आणि तिच्यासमोर उलगडत असलेल्या मोठ्या रिकाम्या अवकाशापासून स्वत:ला दूर करू शकत नव्हती. तिच्या बाजूला मार्सेल अस्वस्थ होत होता. तो भावशून्य होता. तो परत खाली जाऊ इच्छीत होता. शेवटी येथे बघण्यासारखे आहे काय? परंतु क्षितिजावरची तिची नजर ती हटवू शकत नव्हती. तिला एकाएकी वाटले की, त्या पलीकडे, अजून आणखी दक्षिणेला, ज्या जागी आकाश आणि पृथ्वी भेटतात एका स्पष्ट रेषेत, काही तरी तिची वाट पाहात आहे – तिला आतापर्यंत ज्याची कधीही जाणीव नव्हती तरी त्याची कमतरता नेहमी होती असे काही तरी. सरत आलेल्या दुपारी प्रकाश सैल आणि सौम्य झाला होता. तो स्फटिकातून द्रवात रूपांतरित होत होता. त्या वेळी योगायोगाने तिथे आलेल्या एका स्त्रीच्या हृदयात अनेक वर्षांच्या सवयींनी आणि कंटाळवाणेपणामुळे घट्ट बसलेली एक गाठ सावकाश सैल होत होती. ती भटक्यांच्या तळाकडे पाहात होती. तिने त्या ठिकाणी राहणाऱ्या माणसांना पाहिलेसुद्धा नव्हते. काळ्या तंबूत काहीही हलत नव्हते आणि तरीही ती त्यांचाच विचार करीत होती, ज्यांचे अस्तित्त्व तिला त्या दिवसापर्यंत जवळजवळ ठाउक नव्हते. घरदार नसलेले, जगापासून तुटलेले ते मूठभर भटकत असतात, ती पाहात असलेल्या अफाट विस्तीर्ण टापूत. कितीही अफाट असला तरी तोदेखील नगण्य तुकडा होता त्याहूनही मोठ्या प्रचंड विस्ताराचा,जो येथून दक्षिणेला हजारो मैलांवर थांबत होता जिथे पहिली नदी जंगलाचे सिंचन करते. काळाच्या प्रारंभापासून पूर्णपणे खरवडलेल्या जमिनीवरची शुष्क माती अविरतपणे तुडवीत आहेत काही थोडी माणसे, जवळ काहीही नसलेले परंतु कुणाचीही चाकरी न पत्करणारे, द्रारिद्र्याने पिडलेले परंतु एका अपरिचित अधिराज्याचे स्वतंत्र राजे. जानीनला कळत नव्हते की, या विचारांनी तिच्यात, तिचे डोळे बंद करणारी एक गोड उदासीनता का भरून गेली आहे. जानीन जाणत होती की, तिला शाश्वत आश्वासन मिळाले आहे या अधिराज्याचे आणि तरीही ते कधीही तिचे असणार नाही – पुन्हा कधीही नाही, कदाचित या निसटणाऱ्या क्षणाखेरीज. जेव्हा तिने परत डोळे उघडले एकाएकी गतिहीन आकाशाकडे आणि त्याच्या न बदलणाऱ्या प्रकाश लहरीकडे, त्या वेळी अरबांच्या वस्तीतून येणारे आवाज एकाएकी शांत झाले. तिला वाटले की, जगाचा प्रवाह नुकताच थांबला आहे आणि त्या क्षणापासून पुढे कोणीही म्हातारे होणार नाही किंवा मरणार नाही. यापुढे तिच्या हृदयाखेरीज, जिथे त्याच क्षणी दु:खाने आणि आश्चर्याने कोणी तरी रडत होते, जीवन सर्वत्र तात्पुरते थांबलेले असेल.

प्रकाशात बदल होऊ लागला. स्वच्छ आणि ऊब नसलेला सूर्य पश्चिमेकडे खाली गेला. ते किंचित गुलाबी झाले. त्याच वेळी पूर्वेकडे करडी लाट आकाराला आली, मोठ्या विस्तीर्ण प्रदेशावर सावकाश पसरण्यासाठी सज्ज. पहिला कुत्रा भुंकला नि त्याचे दूरवरचे भुंकणे आता आणखीन अधिक थंड हवेत ऐकू आले. जानीनच्या लक्षात आले की, थंडीने तिचे दात वाजत आहेत. आपण थंडीने मरणार' मार्सेल म्हणाला. 'तू मूर्ख आहेस. चल परत जाऊ. त्याने तिचा हात बेढबपणे धरला. आता ती आज्ञाधारकपणे संरक्षक कठड्यापासून दूर झाली आणि त्याच्या मागोमाग जाऊ लागली. पायरीवरचा म्हातारा अरब हालचाल न करता त्यांना खाली वस्तीकडे जाताना पाहात होता.

कुणाकडेही न पाहता प्रचंड आणि एकाएकी थकव्याने वाकलेली ती, ज्याचे ओझे आता तिला असहनीय वाटत होते ते स्वतःचे शरीर फरफटत त्याच्यासोबत चालली होती. उन्नत अवस्था तिला सोडून गेली होती. आता तिला वाटत होते की, तिने नुकत्याच प्रवेश केलेल्या त्या जगासाठी ती खूप उंच, खूप जाड (लठ्ठ), खूप पांढरी आहे. लहान मुलं, मुलगी, भावनाशून्य माणूस, रहस्यमय कोल्हा फक्त हेच प्राणी आहेत जे त्या जगात शांतपणे वावरू शकतात. यापुढे ती स्वत:ला झोपेकडे, मृत्यूकडे फरफटत नेण्याशिवाय काय करेल?

दुबळेपणाने थंडीशी झुंजत तिने स्वत:ला हॉटेलकडे फरफटत नेले. तिचा नवरा एकाएकी अबोल बनला होता. फार तर आपण किती थकलो आहोत, तेवढं तो तिला सांगत होता. त्याच वेळी तिला तिच्या आत चढत चाललेल्या तापाची जाणीव होत होती. तिने स्वत:ला बिछान्याकडे फरफटत नेले. मार्सेलही आला नि त्याने कसलीच विचारणा न करता दिवा मालवला. खोली गारठली होती. जानीनला जाणवले की, गारठा हळूहळू तिच्याकडे सरकत आहे. तिचा ताप वाढत होता. श्वास घ्यायला त्रास होत होता. तिला ऊब न देताच रक्त तिच्या शरीरात वाहात होते. एक प्रकारच्या भीतीने तिच्यात शिरकाव केला. तिने कूस बदलली आणि तिच्या वजनाने जुना लोखंडी पलंग करकरला. नाही, तिला आजारी पडायचे नाही. तिचा नवरा एव्हाना झोपला होता. तिला पण झोपायला हवे. ते आवश्यक आहे. वस्तीतले अस्पष्ट आवाज खिडकीच्या फटीतून तिच्यापर्यंत पोहोचत होते. मुरीश कॅफेमधील जुन्या ग्रामोफोनवर तिला अस्पष्ट ओळखीची वाटणारी अनुनासिक उच्चारांची गेंगाण्या आवाजातील गाणी वाजत होती. तो आवाज संथपणे हालचाल करणाऱ्या गर्दीच्या आवाजावर स्वार होऊन तिच्यापर्यंत पोहोचत होता. तिला झोपले पाहिजे, परंतु ती मोजत होती काळे तंबु; तिच्या पापण्याआड निश्चल उंट चरत होते. तिच्या आत प्रचंड एकाकीपणा घोंगावत होता. खरंच, ती का आली? त्या प्रश्नावर ती झोपी गेली.

थोड्या वेळाने ती जागी झाली. तिच्या भोवताली पूर्ण शांतता होती. मात्र त्या शांत रात्री वस्तीच्या काठावर कुत्री कर्कश्श केकाटत होती. जानीन थरकापली. तिने कूस बदलली, तिला स्पर्श झाला तिच्या नवऱ्याच्या मजबूत खांद्याचा आणि एकाएकी अर्धवट झोपेत ती त्याला बिलगली. न बुडता ती झोपेच्या पृष्ठभागावर वाहात चालली होती. सर्वात सुरक्षित आश्रयस्थान असल्यासारखे तिने अभावित अजाणतेपणी त्याच्या खांद्याला घट्ट धरले. ती बोलत होती, परंतु तिच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. ती काय म्हणतेय आहे हे तिला स्वत:लाच ऐकू येत नव्हते. फक्त मार्सेलची ऊब जाणवत होती. वीस वर्षांपेक्षा अधिक काळ प्रत्येक रात्री हे असेच. त्याच्या ऊबेच्या सान्निध्यात, ते दोघेच फक्त. आजारी असले तरी, प्रवासात असले तरी, जसे आता..... नाही तर घरी एकटीने काय केले असते? मुलं नाहीत– ती तिची न्यूनता नाही का? तिला समजत नाहीय. कुणाला तरी तिची आवश्यकता आहे या जाणीवेने संतुष्ट, ती मार्सेलचे अनुसरण करीत राहिली. त्याने तिला फक्त एकच आनंद दिला, ती आवश्यक आहे या जाणीवेचा. कदाचित त्याने तिच्यावर प्रेम केले नाही. प्रेम तिरस्काराने भरलेले असले तरी त्याचा चेहरा उदासवाणा नसतो. त्याचा चेहरा कसा आहे? ते अंधारात चाचपडतच प्रेम करायचे, एकमेकांना न पाहता. अंधारातल्या त्या प्रेमाशिवाय दुसरे प्रेम आहे का? दिवसा उजेडी मोठ्याने व्यक्त होणारे प्रेम? तिला माहीत नाही. परंतु तिला हे माहीत आहे की, मार्सेलला तिची गरज आहे आणि तिला गरज आहे

त्या गरजेची. तिला माहीत आहे की, रात्रंदिवस ती त्या आधारे जगत असते. विशेषत: रात्री –प्रत्येक रात्री चेहऱ्यावर धारण केलेले ते साचेबंद भाव घेऊन त्याला एकटे राहायचे किंवा वृद्ध व्हायचे किंवा मरायचे नसते त्यावेळी. ते भाव तिने कधी कधी इतर पुरुषांच्या चेहऱ्यावरदेखील पाहिले होते; एकटेपणा आणि रात्र त्यांच्यासमोर जे प्रकट करीत असते ते घाबरून टाकणारे सर्व काही विसरण्यासाठी त्या क्षणापर्यंत शहाणपण मिरवणारा चेहरा टाकून कुठल्याही आसक्तीशिवाय स्त्रीच्या शरीराकडे हतबलपणे झेपावणारे, सुज्ञपणाच्या चेहऱ्याआड दडलेले त्या वेड्या माणसांच्या चेहऱ्यावरील एकमेव समान भाव.

मार्सेल हलला जणू तिच्यापासून दूर सरकण्यासाठी. नाही, तो तिच्यावर प्रेम करीत नाही. ती काय नव्हती त्याची त्याला फक्त भीती वाटत होती. खरे तर त्यांना– तिला आणि त्याला खूप पूर्वीच विभक्त होऊन शेवटपर्यंत एकेकटेच झोपायला पाहिजे होते; परंतु कोण नेहमी एकटा झोपू शकतो? उपजीविकेसाठीच्या पेशाने किंवा दुर्दैवाने इतरांपासून तुटलेली काही माणसे, त्याच त्या बिछान्यात प्रत्येक रात्री मेल्यासारखे झोपी जातात. मार्सेल तसे कधीही करू शकत नाही, सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे तो एक दुबळे, असहाय नेहमी दु:खाला घाबरणारे लहान मूल आहे, तिचे स्वत:चे मूल– ज्याला तिची गरज आहे. त्याच क्षणी त्याने मुसमुसून रडल्यासारखा आवाज केला. तिने त्याला मिठीत थोडेसे जवळ घेतले आणि त्याच्या छातीवर हात ठेवला आणि त्याला हाक मारली. कधी तरी एकदा दिलेल्या लहानशा प्रेमाच्या नावाने, जे आताही ते वेळोवेळी वापरायचे, काय म्हणतो आहोत याचा विचार न करता.

तिने अंत:करणातून हाक मारली. शेवटी तिलाही गरज आहे त्याची, त्याच्या ताकदीची, त्याच्या थोड्याशा विक्षिप्तपणाची, आणि तिलाही भीती वाटते मृत्यूची. 'जर मी त्या भीतीवर मात करू शकले तर मी आनंदी होईन––.' तात्काळ एका अनाम तीव्र वेदनेने तिचा ताबा घेतला. ती मार्सेलपासून मागे हटली. नाही, ती कशावरही मात करीत नाही, ती आनंदी नाही, खरे तर ती मरणार आहे, मुक्त झाल्याशिवाय. तिचे हृदय व्यथित झाले. प्रचंड ओझ्याखाली ती गुदमरत होती. अचानक तिच्या लक्षात आले की, जवळपास वीस वर्षांपासून ती ते ओझे फरफटत वाहात आहे. आता ती तिच्या सर्वशक्तीनिशी धडपडत होती – त्या ओझ्याखाली. तिला मुक्त व्हायचे आहे; मार्सेलला किंवा इतरही कुणाला जरी व्हायचे नसले तरी. ती पूर्ण जागी झाली, बिछान्यात उठून बसली आणि तिने एक साद ऐकली. ती फार जवळून येते आहे असे वाटत होते; परंतु तिच्या कानांपर्यंत फक्त रात्रीच्या किनाऱ्यावरून ओएसिसमधल्या कुत्र्यांचे दमलेले आणि तरीसुद्धा अदम्य आवाज पोहोचत होते. किंचित वारा सुरू झाला होता आणि तिने ताडाच्या राईत हळुवार वाहात असलेल्या पाण्याचा आवाज ऐकला. तो दक्षिणेकडून येत होता, तिथे आता अविचल आकाशाखाली मरूप्रदेश आणि रात्र एकमेकांत मिसळले होते. तिथे जीवन थांबले होते, तिथे यानंतर कुणीही कधीही म्हातारे होणार नाही – मरणार नाही. त्या वेळी वाऱ्याच्या पाण्याचा प्रवाह आटला आणि एका मुक्या हाकेशिवाय काही ऐकले याचीदेखील तिला खात्री वाटत नव्हती. ती मुकी हाक, काही झाले तरी शेवटी ती ऐकणे अथवा तिच्याकडे दुर्लक्ष करणे तिच्या मर्जीवर होते. मात्र तिने जर तिला ताबडतोब प्रतिसाद नाही दिला तर परत कधीही त्याचा अर्थ तिला समजणार नाही. ताबडतोब– होय किमान तेवढे तरी निश्चित होते.

ती हळुवारपणे उठली आणि तिच्या नवऱ्याचे श्वासोच्छवास ऐकत बिछान्याच्या बाजूला निश्चल

उभी राहिली. मार्सेल झोपला होता. दुसऱ्या क्षणी तिच्यातली बिछान्याची ऊब नाहीशी झाली आणि तिला थंडी वाजू लागली. रस्त्यावरील दिव्याचा खिडकीच्या पडद्यातून येत असलेल्या अंधुक प्रकाशात, तिने चाचपडत सावकाश कपडे घातले. स्वतःची पादत्राणे हातात घेऊन ती दरवाज्यापर्यंत पोहोचली. अंधारात एक क्षण थांबली, आणि नंतर हलकेच तिने दरवाजा उघडला. दाराची मूठ करकरली आणि ती स्तब्ध उभी राहिली. तिचे हृदय बेभानपणे धडधडत होते. ताणलेले शरीर घेऊन तिने ऐकले आणि शांततेने पुनराश्वासित होऊन तिने अजून थोडा हात फिरविला. मुठीचे फिरणे हे न संपणारे असे वाटत होते. अखेर तिने दार उघडले नि बाहेर पडली. तेवढीच काळजी घेत तिने दार बंद केले. मग लाकडी दरवाजावर गाल टेकवून ती वाट पाहात राहिली. एका क्षणानंतर तिला ऐकू आले दूरवर मार्सेलचे श्वासोच्छवास. ती वळली. तिच्या गालांना रात्रीची थंड हवा झोंबत होती. सज्जातून ती पळत निघाली. बाहेरचा दरवाजा बंद होता. ती कडी सरकवीत होती, तेव्हा तिला सर्वांत वरच्या पायरीवर रात्रीचा पहारेकरी दिसला. झोपेतला चेहरा घेऊन तो अरेबिक भाषेत तिच्याशी बोलला. 'मी येते परत' अंधारात बाहेर पडत जानीन म्हणाली.

काळ्या आकाशातून ताडाच्या झाडांवर आणि घरांवर ताऱ्यांच्या माळा लटकल्या होत्या. किल्ल्याकडे जाणाऱ्या, आता रिकाम्या असलेल्या अरुंद रस्त्यावर ती पळत होती. सूर्याशी झगडावे लागत नसल्याने आता थंडीने रात्रीला व्यापले होते. खूप थंड हवा तिच्या फुफ्फुसांना इजा करीत होती, परंतु अंधारात ती पळत राहिली, अर्धवट आंधळी. रस्त्याच्या टोकावर प्रकाश दिसला, मग तो झोकांड्या घेत तिच्या दिशेने खाली उतरला. ती थांबली, आणि दातेरी चाक फिरतानाचा भर्र आवाज ऐकला. लवकरच तिने वाढत्या प्रकाशाच्या मागे, नाजूक दुचाकीवर स्वार विस्तीर्ण आकाराचे बुर्नोसेस पाहिले. बुर्नोसेस तिच्या लगत फडफडले, नंतर तिच्या पाठीमागे काळोखात तीन लाल दिवे दिसले आणि लगेच दिसेनासे झाले. ती किल्ल्याकडे पळत राहिली. अर्ध्या पायऱ्या चढल्यानंतर हवा तिच्या फुफ्फुसांना तीव्र इजा करीत असल्याने तिला थांबावे असे वाटले. तिच्यातल्या ऊर्जेच्या अंतिम स्फोटानी, स्वत:लाही जुमानता ती फेकली गेली चौथऱ्यावर. ती आता संरक्षक कठड्याला टेकून उभी होती. तिच्या पोटात ते रुतत होते. ती धापा टाकत होती आणि तिच्या डोळ्यांसमोर सर्व काही धूसर होते. तिच्या पळण्याने तिला ऊब मिळाली नव्हती आणि अजूनही तिचे पूर्ण शरीर थरथर कापत होते. परंतु ती जोरात आत घेत असलेली थंड हवा लवकरच तिच्या शरीरात समान रीतीने वाहू लागली आणि तिच्या कुडकुडण्यात एक ऊबेची ठिणगी फुलू लागली. शेवटी तिने रात्रीच्या विस्ताराकडे डोळे उघडले.

मधून मधून थंडीमुळे दगड फुटून वाळूत रूपांतरित होतानाच्या दबक्या अस्पष्ट आवाजाशिवाय, एकही श्वास, एकही आवाज, जानीनच्या भोवतालची शांतता भंग करीत नव्हता. तथापि एका क्षणानंतर तिला असे वाटले की, तिच्यावरचे आकाश फिरते आहे संथ गिरक्या घेत. कोरड्या थंड रात्रीच्या अफाट विस्तारात, हजारो तारे सतत दृष्टोत्पत्तीस येत होते आणि त्यांचे चमचमणारे बर्फाचे तुकडे एकदम सुटे होऊन हळूहळू क्षितिजाकडे घसरत होते. हळूहळू तरंगत जाणाऱ्या त्या प्रखर ज्योती निरखण्यापासून जानीन स्वत:ला थांबवू शकत नव्हती. ती त्यासोबत फिरत होती आणि ही वरकरणी स्थिर प्रगती हळूहळू थंडी आणि तीव्र इच्छा एकमेकांशी जिथे स्पर्धा करीत होते त्या तिच्या अस्तित्त्वाच्या गाभ्याशी तादात्म्य पावत गेली. तिच्यासमोर एकामागून एक तारे निखळत होते

आणि मरूभूमीतील दगडांत विझून जात होते. प्रत्येक वेळी जानीन थोडे अधिक उघडी होत होती रात्रीसमोर. खोल श्‍वास घेत, ती विसरली थंडी, इतरांचे निर्जीव ओझे, जगण्यातला वेडसरपणा, कोंदटलेपण, जगण्या मरण्याचे दीर्घ अपार दु:ख. इतकी वर्षे भीतीपासून दूर बेभान आणि निरर्थक ध्येयहीन पळत राहिल्यानंतर ती आता सरते शेवटी थांबली होती. त्याचवेळी तिला वाटले की, तिला गवसली आहेत तिची मुळं. परत एकदा तिच्या शरीरात जीवनरस वाहू लागला आहे. त्याचे थरथरणे आता थांबले होते. सरकत्या आकाशाकडे तिने शरीर ताणले तसे तिचे पोट पूर्ण संरक्षक कठड्याला टेकले; ती फक्त वाट पाहात होती तिचे फडफडणारे हृदय शांत होण्याची आणि तिच्या आत शांतता प्रस्थापित होण्याची. नक्षत्र समूहाच्या शेवटच्या तारकांनी आपले पुंजके मरूभूमीच्या क्षितिजावर किंचित खाली सरकविले आणि ते तिथे स्थिरावले. मग असह्य हळुवारपणे रात्रीचे पाणी जानीनच्या आत भरू लागले, थंडीला बुडवून तिच्या अस्तित्त्वाच्या दडलेल्या गाभ्यातून लाटामागून लाटेत वर येत भरून वाहू लागले, आणि तिच्या कण्हणाऱ्या तोंडापर्यंत चढलेदेखील. पुढच्या क्षणी थंड जमिनीवर ती पाठीवर खाली पडली. तिच्यावर पूर्ण आकाश पसरले.

तशीच सावधगिरी बाळगत, जानीन खोलीवर परतली, तेव्हा मार्सेल उठलेला नव्हता, परंतु जशी ती बिछान्यात शिरली तसा तो मुसमुसला आणि काही सेकंदानंतर एकाएकी उठून बसला. तो काही तरी म्हणाला आणि तो काय म्हणत आहे हे तिला समजले नाही. तो उठला. दिवा लागला ज्यामुळे तिचे डोळे दिपले. झोकांड्या खात तो वॉश बेसिनकडे गेला. मिनरल वॉटरच्या बाटलीतून त्याने पाण्याचा एक मोठा घोट घेतला. एक गुडघा बिछान्यावर ठेवून तो पांघरूणात शिरण्याच्या तयारीत होता तेव्हा काहीच उमजत नसल्यासारखे त्याने तिच्याकडे पाहिले. ती खूप रडत होती, स्वत:ला आवरण्यास असमर्थ.

'काही नाही, प्रिय' ती म्हणाली, 'काही नाही'. ●


प रि व र्त ना चा
वाटसरू

परिवर्तनाचा वाटसरूची वर्गणी बँक ट्रान्सफरने भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे
बचत खाते : **परिवर्तनाचा वाटसरू**
बचत खाते क्र. : 051410110013969
आयएफएससी क्र. : BKID0000514
एमआयसीआर क्र. : 411013014
**पैसे ट्रान्सफर केल्यानंतर ९७६३२०६२१२ या क्रमांकावर एसएमएस द्वारे अथवा pwatsaru@yahoo.com या ईमेलवर कळवावे.**

# रबर धूळ



## सारा थँकम म्यॅथ्युज्

अनु.

**अजित मगदूम**

ajitbalwant@gmail.com


**"**मी तुम्हाला एक ताईत देतो. ज्या ज्या वेळी तुम्हाला संभ्रम पडतो, तुमच्यातला स्व वरचढ होतो तेव्हा खालील कसोटी लावून पहा : तुम्ही पाहिलेला सर्वात गरीब व दुर्बल माणसाचा चेहरा आठवा आणि स्वतःला विचारा, की तुमच्या निर्णयाने या माणसाला काही लाभ होणार आहे का? त्याला यातून काहीतरी मिळणार आहे का? त्यातून त्याचं जीवन किंवा प्राक्तन घडणार आहे का? दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर लाखो अर्धपोटी व भुकेलेल्यांना त्यातून स्वातंत्र्य मिळणार आहे का?**"**



मैत्रिणी नसलेली एक लहानगी मधल्या सुट्टीत तिच्या छोट्या लाकडी डेस्कवर आरामात वाचत बसलीय. ती सॉफ्टबोर्डजवळच्या कोपऱ्यात बसलेली आहे. मिसेस लोबोने एकत्र टाचलेले व टेबलखाली लोंबत असलेले क्रेप कागद अलगद ओढायला तिला भारी आवडतं. तिच्या शाळेच्या बॅगमधून तिने एनिड ब्लायटन व रोल्ड डालची पुस्तके बाहेर काढली. गुन्ह्यांचा उलगडा करणाऱ्या वीर मित्रांविषयीची पुस्तके, त्यांच्या जगाला वाकवण्याइतकी रग असणाऱ्या उत्साही, विचित्र माणसांच्या गोष्टी. दुसऱ्या इयत्तेत तुम्ही ज्या कारणांसाठी कँडी बार खाता त्याच कारणास्तव तुम्ही वाचता – तुमचं आरशातून दिसणारं प्रतिबिंब न पाहण्यासाठी. पण ही लहानगी या दोन्ही प्रकारात न मोडणारी आहे.

जेव्हा इयत्ता दुसरीच्या इतर शिक्षिका मिसेस लोबोच्या डेस्कवर जेवण आणि गप्पा मारायला येतात तेव्हा लहानगी मान खाली घालून साळसूदपणा दाखवते. तेवढी हुशारी तिच्याकडे आहे. तिसरी ब ला शिकवणाऱ्या मिसेस तरीनच्या घटस्फोटाविषयी शिक्षिका डोळे विस्फारत, साड्यांचा सुक्या पानांसारखा सळसळ आवाज करत एकच कुजबुज करीत आहेत. त्यांच्या गप्पांतील तपशील 'जेम्स अँड जायंट पीच' च्या गोष्टीसारखे इतके रंजक, खिळवून ठेवणारे आहेत की, लहानगी सारा बहाणा विसरून चक्क मान वर करून सारे ऐकत राहते!

छोट्या माठांना मोठे कान असतात, हो ना? मिसेस आझमी मिसेस लोबोला कोपरखळी मारते. पण ती ईदला तरीनच्या घरी गेली असता मिस्टर तरीनने तिच्या साडीच्या पदराला कसा सूचक स्पर्श केला हे सांगण्यात गढून गेलेली असते. तसेच आपली पत्नी टीव्ही सेटवरील धूळ पुसायला नेहमीच कशी विसरते याचीही तक्रार मिस्टर तरीनने तिच्याकडे केल्याचे ती सांगते..

ते सर्वजण पाहतात तर लहानगी तिच्या बाऊलकट केसांच्या कडातून चक्क त्यांच्याकडे पाहत होती. ती लगेच सावरून पुस्तकात मान घालते, पण आता उशीर झाला होता.

'तू अशी इथे बसू शकत नाहीस, बरं का', मिसेस लोबो धसकन ओरडली. 'हे चांगलं नाही, जा बाहेर! चल जा, सामान्य मुलांसारखं खेळ'.

ती ओठ चावत बाहेर निघाली तसं सगळ्या शिक्षिका फिदीफिदी हसतात. ती उन्हाकडे किलकिल्या डोळ्यांनी पाहत फुटबॉलच्या मैदानाला एक चक्कर मारते. तिचे गुडघ्याचे मोजे खाली सरकले तर ती लगेचच वर खेचते, पण अगदी जीवावर आल्यासारखं.

एक छोटा मुलगा हळूच तिच्या मागे उभा राहून तिच्या डोक्यावर मूठभर सुकलेली पानं ठेवतो. ती जोराने हातवारे करत बंद कर म्हणते. तो करतच राहतो. हाताची दिव्यासारखी कमान करत वेड्यासारखं खिदळतो तेव्हा त्याला ती एक थप्पड लगावते. त्याच्या नाकातून रक्त येऊ लागते. शिक्षिका पाहते आणि लगेच तिला तिच्या ब्लाउजवर एक चिठ्ठी टाचणी लावून घरी पाठवते. त्यावर दोन्हीपैकी एका पालकाची सही करून आणायची असते.

तिरप्या लिपीतील तिरस्करणीय शब्दांत लिहिलेल्या चिठ्ठीत म्हटलं होतं, 'आज चांगली वागली नाही. एका मुलाच्या थोबाडीत मारली.'

'पुढच्या वेळेस चांगलं चोप त्याला', वडील गालातल्या गालात हसत सही करून चिठ्ठी तिच्याकडे देताना म्हणतात. दारातलं वर्तमानपत्र उचलून दार बंद करतात. ही लहानगी आणि तिच्या डोक्यावर पानांचा अभिषेक करणारा मुलगा हे दोघे आता तिसरीच्या म्हणजे मिसेस तरीनच्या वर्गात

येतात. आता वर्गात त्याला अगदी शेवटी आणि तेही तिच्या मागच्या बाकावर बसवले जाते. अनुज असं त्याचं नाव. मोठ्या आवाजाचा आणि गमती करणारा, सुंदर दात व हसऱ्या चेहऱ्याचा तो आहे. तिच्यासमोर एक मुलगा बसतो. ज्याला कोणीही मित्र नाही. त्याचं नाव आहे करण. लांब जबडा, मोठाले डोळे आणि त्याच्या भोवताली असणारा एक दर्प. तो जाईल तिथे त्याच्या मागे त्याचा झोत असतो. मिसेस तरीन स्कूलमध्ये सर्व शिक्षकांच्या मध्ये सर्वात दयाळू शिक्षिका असूनही त्याच्या बाबतीत ती कठोर वागत असते.

मधल्या सुट्टीत अनुज लहानगीला विचारतो की, तिला झोपाळ्यावर यायचं आहे काय. तिला आश्चर्य वाटतं आणि ती संकोचून म्हणते, 'हो, थँक्यू'.

अनुज आणि ती बाहेरच्या लखलखीत उन्हात जातात. जरी तिनं वळून पाहिलं नसलं तरी तिच्या मनाच्या एका कोपऱ्यात या मोकळ्या वर्गात आपल्या बाकावर बसून असलेल्या, समोर पुस्तकही नसलेल्या व बंद होणाऱ्या दाराकडे बघणाऱ्या करणचं भान आहे.

अनुजचे पालक घटस्फोट घेत आहेत पण त्याला त्याची फिकीर नाही. आता तो जास्त वेळ आपल्या फुटबॉल मित्रांपेक्षा या लहानगीबरोबर घालवतो. याचा तिलाही आनंद होतो कारण *सिटींग इन अ ट्री* या बडबडगीतासारखे हे दोघेही कुचेष्टेचे विषय झालेले असतात.

तिनं मिनीमाऊसचं चित्र कसं काढायचं आणि ओरीगामीतून बेडूक कसा बनवायचा हे त्याला दाखवलं पण त्याला त्यात रस नाही. ते दोघं दिवसाच्या शेवटी गृहपाठाच्या वेळी रबरधूळ करतात ज्याला अनुज म्हणतो करड्या गुलाबी रंगाच्या लोळ्या ज्या खोडरबरने खोडल्यानंतर तयार होतात. ते हे रोज करत असतात. ते दोघेही जमलेली रबरधूळ ड्रॉवरमध्ये साठवत राहतात.

'आपण सूर्याकडे पाहत राहूया', अनुज म्हणतो.

ते सुकलेल्या गवताच्या उतारावर पडून राहतात. तो डोळे किलकिले करून आकाशाकडे पाहतो. लहानगी आपला चेहरा हाताने लपवते.

'मी तसं करू शकत नाही', ती म्हणते.

'ठीक आहे', अनुज.

नंतर हा रोजचाच परिपाठ होतो. चालत फुटबॉल मैदान पार करायचं. मग गुआरी बांध. मग दोघांचेही पडून राहणं. आपल्या डोळ्यांच्या रक्षणार्थ तिचं डोळ्यावर आपले इवलेसे तळवे ठेवणं. आपण लग्न लग्न खेळूया सूर्याकडे बघण्याच्या वेळेला लहानगी म्हणते.

'छट, ते सगळं आता बिघडलेलं आहे', अनुजचे वस्तुस्थितीमुळे आलेले बोल. खोडरबरचं काम सुरू होतं. अनुजनं आता नवा शोध लावला आहे की, आपल्या फेबर कॅसेल रबरला आपल्या स्टील पट्टीने करवतीसारखं कापलं की, भरपूर कीस जमा होतो. तिच्या बाकाचा पाव भाग हा या मऊ, रंगीत भुशाने भरला होता. मिसेस तरीन फळ्यावर हिंदीचे शब्द 'नमकीन', 'बुरा', 'पुराना' लिहिते त्यावेळी लहानगी या भुशावरून हात फिरवत 'पुराना' म्हणजे 'जुना' तसेच 'गोष्ट' असाही अर्थ होतो असं लिहून घेते.

एका क्षणी हे दोघे हा भुसा करणच्या डोक्यावर शिंपडतात. हसू आवरण्यासाठी ओठ चावत ते वाट पाहतात शिक्षिका पाठ फिरवायची आणि तो लिहायला किंवा आकडेमोड करायला खाली वाकताच त्याच्या केसांच्या टाळूपर्यंत विखुरलेला भुसा खाली सांडण्याची.

(याची सुरुवात तिने की अनुजने केली हे आजच्या लहानगीला किंवा उद्या मोठी झाल्यावर तिला आठवणारही नाही. या बाबीचा तिच्यातील सुप्त आवाज पुढे ज्या वेळी मोठा होईल तेव्हा तो

तिला शरमिंदा करून जाईल.)

दिवसेंदिवस अनुजची धिटाई वाढत गेली व प्रत्येकवेळी करणच्या जवळून जाताना रबराचा भुसा त्याच्या डोक्यावर टाकायचा. नर्सच्या कार्यालयात तासन्‌तास बसावे लागल्याने त्याचं डोकं ठणकायला लागतं. मिसेस तरीन म्हणते, 'तुझे डोळे तपासण्याची गरज आहे बेटा, ही घे पालकांसाठी चिठ्ठी'. 'माझ्या आई-वडिलांना त्याची फिकीर नाही आणि मी चष्मा अजिबात घालणार नाही'. मिसेस तरीनच्या बाकाच्या पायावर लाथ मारून तो बाहेर पळत सुटतो. नंतर तो लहानगीला नवे खोडरबर दाखवतो - मोठे, लवचीक, गुलाबी सुंदर - आणि ते कामाला लागतात.

दुसऱ्या दिवशी त्याच्या गृहपाठाच्या तासाच्या वेळी अनुजची आई येते. मिसेस तरीन त्यांना नमस्कार करते आणि वर्गाला उद्देशून म्हणते, 'आता मी पलीकडच्या खोलीत आहे, तोपर्यंत संपूर्ण शांतता राखली नाही तर मात्र मी रागवेन. मग वाईट वाटून घेऊ नका, ठीक आहे?'

'येस्स मॅम' ३ ब ची सगळी मुलं एक सुरात म्हणतात तशी सगळी मुलं वह्यांमध्ये मान घालून, हातात पिवळ्या एचपी पेन्सिली घट्ट पकडून बसतात हे मिसेस तरीन या कडक व प्रेमळही असल्याचे निदर्शक आहे.

'ठीक आहे, चला लग्न करुया', अनुज कशाचाही संदर्भ नसताना लहानगीच्या कानात कुजबुजतो. ती स्मितहास्य देते, नंतर भुवया उंचावून पहा या सिग्नलकडे पाहते. आपल्या बाकाच्या खालून मूठभर रबराचा भुसा घेऊन ती त्याला दाखवते. रंगीत पेन्सिलींचा किसही त्यात ती मिसळत आहे.

आपला हात लांबवून ती करणच्या डोक्यावर पसरते. अनुज तो ओरडू नये म्हणून त्याच्या तोंडावर हात ठेवतो.

करण तिच्याकडे बघत हातवारे करतो. त्याचे सुजलेले डोळे आसवांनी भरले होते.

'हे का केलंस तू?' करण चेहरा वेडावाकडा करून कपाळ बडवत फुत्कारतो. पेन्सिलच्या भुशाचं मिश्रण त्याच्या डोक्यावरून खाली ओघळतं आणि डोळ्यातही जातं.

आऽऽ

रागाने डोळे चोळत, वेदनेने कळवळतो. लहानगीच्या तोंडाला वाळूसारखी कोरड पडते.

ती अनुजजवळ येते तर तो भयभीत झाला होता. बाकीची मुलंही भोवती जमून त्याच्याकडे बघत होती. पानांची सळसळ व्हावी तशी त्यांच्यात कुजबुज सुरू होती. करण डोळ्यावर हात ठेवून वर्गाबाहेर पळतो. लहानगी आता आपल्या बाकावरील कणन्‌कण फ्रॉकच्या ओट्यात घेते. तिच्या अंगातून घामाच्या धारा वाहत होत्या. पाठीवरून घामाच्या धारा वाहत होत्या. भुसा खूप म्हणजे खूपच होता. असं का केलं त्यांनी? तो ढीगभर कोरडा, करड्या, गुलाबी रंगाचा भुसा फ्रॉकच्या ओट्यात भरून कचऱ्याच्या डब्याकडे धावत सुटली. आपला ओटा थरथरत्या हातांनी डब्यात झाडून रिकामा करते. वर्गाच्या कुजबूजीनं कानात ड्रिलिंग होत असल्यासारखं तिला वाटत होतं. जोरानं दार उघडून ती करण कुठे गेला हे बघायला बाहेर सुटते. तो तिला मुलांच्या बाथरूमबाहेर दिसतो. डोळे अगदी लालबुंद झालेले. तिला पाहता क्षणी तो पोक काढून तोंड लपवतो.

'मला माफ कर, करण', ती म्हणते, 'मला माफ कर, मला माफ कर,मला माफ कर'.

तो मान वळवतो. ती रडकुंडीला येते.

'माफ कर, कृपा करून मला माफ कर'.

'मी मॅमला सांगणार नाही'. एवढंच तो नर्सच्या कार्यालयात जाण्यासाठी जिना उतरताना पुटपुटतो.

तिला कसं सांगावं हे कळत नव्हतं की, तो तिची चुगली करेल हे तिच्या भीतीचं कारण नव्हतं. परंतु छातीत धडधडणाऱ्या किड्याला दूर ठेवायला हवे. जर मिसेस तरीननं तिला झाडलं, प्राचार्यांकडे धाडलं, त्यांनी चांगली वागली नाही आज असं फ्रॉकच्या पुढच्या बाजूवर लिहिलं तर...

ती आपल्या वर्गाकडे जाते. मिसेस तरीन बाकावर बसून पेपर तपासत आहे. प्रत्येकजण अजूनही गृहपाठ करीत आहे. अनुजनं डोकं बाकावर टेकवलं आहे व त्यावर छतासारखे दोन हात ठेवले आहेत. तो शांत आहे पण त्याचे अधूनमधून मुसमुसणे व त्याचा जोरजोरात चाललेला श्वास ती ऐकत होती. तिच्यापुढील करणची खुर्ची रिकामी होती. खुर्चीत रबराचा भुसा होता.

'मला तुम्ही माराल का प्लीज'? तिच्या वडिलांना विचारते पण ते केवळ टीव्ही चॅनेल बदलून भारत पाकिस्तान मॅच लावतात व नंतर अमेरिकेच्या बातम्या.

ती पाय आखडून घेत कपाटात कोंडून घेते.

अनुजची आई त्याला चश्मा घेण्यासाठी घेऊन जाते. त्याची डोकेदुखी सुरूच आहे, ठणका प्रचंड आहे. त्याचं लहानगीशी बोलणं आता थांबलं आहे.

ती करणच्या पेन्सिलीना टोक करून देते व क्वालिटी स्ट्रीट कँडीज त्याच्या बाकावर ठेवते ज्या तो बेमुर्वतपणे फेकून देतो. ती पाहतच राहते.

अनुजनं चष्मा घातला तरी फळ्यावरील दिसण्यासाठी फळ्यासमोरच त्याला बसावे लागते. तो बाकांमधून धडपडत जातो. दाराच्या चौकटीला तोंड आपटतं. मग डोकं धरुन विव्हळत, किंचाळत बाहेर पडतो.

लहानगी मधल्या सुट्टीत पुस्तक वाचत बसते. ती मिनी माउस पुन्हा-पुन्हा काढत राहते, त्याच्या लांबलचक मिशा आणि फताड्या दातांसकट.

एक दिवस तो शाळेत आलेला नाही, आणि नंतरच्या दिवशीही. आणि नंतरच्या दिवशीही. आणि नंतरच्या दिवशीही. आणि नंतरच्या दिवशीही. आणि नंतरच्या दिवशीही...

'एक्सक्युज मी मॅम, अनुज कुठे आहे?' आपलं लिखाण तपासण्यासाठी घेऊन आलेली लहानगी कापऱ्या स्वरात विचारते.

मिसेस तरीन म्हणते, 'अनुजला विशेष शाळेत जाणं आवश्यक होतं. तो आता परत येणार नाही.'

चौथीच्या वर्गात त्या सर्वांना अनेक वेगळे विषय अभ्यासाला असल्याने हा वर्ग आता विभागला गेला आहे. आता करणही नसणार. ती आपलं नवं भूगोलाचं पुस्तक उघडते. पुस्तकाच्या पहिल्या पानावर मोहनदास गांधी यांचा एक विचार छापला होता. तो असा -

'मी तुम्हाला एक ताईत देतो. ज्या ज्या वेळी तुम्हाला संभ्रम पडतो, तुमच्यातला स्व वरचढ होतो तेव्हा खालील कसोटी लावून पहा : तुम्ही पाहिलेला सर्वात गरीब व दुर्बल माणसाचा चेहरा आठवा आणि स्वतःला विचारा, की तुमच्या निर्णयाने या माणसाला काही लाभ होणार आहे का? त्याला यातून काहीतरी मिळणार आहे का? त्यातून त्याचं जीवन किंवा प्राक्तन घडणार आहे का? दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर लाखो अर्धपोटी व भुकेलेल्यांना त्यातून स्वातंत्र्य मिळणार आहे का?'

तिला वाटलं की, ही उत्तराची सुरुवात आहे. आतून कुरतडणाऱ्या मांसल कीटकाला झटकन शांत करणारे हे विधान आपल्या जांभळ्या रेघांच्या वहीत टिपून घेते. ताईत हा शब्द ताज्या शाईनं चमकतो आहे.

'कृपया ऐका. मी जेथे वाढलो तेथे मी परत येऊ शकत नाही. मी गुगल मॅपवर माझं जुनं घर शोधलं पण त्यावर 'रिझल्ट नॉट फाऊंड' येतं. मला जरा

हलवा, सबंध भूतकाळ एखाद्या तुटलेल्या सर्कीट्रीसारखं खडखडाट करत उभा राहील. माझं मी मगभरून चहा करतो आणि डोळे मिटतो. सिरॅमिक मधून येणारी उष्णता माझ्या तळहातात येते.

मध्येच रात्री मला जाग येते, घामेजलेला मी कम्प्युटरच्या टेबलावर येऊन बसतो आणि सगळी गोष्ट मी टाईप करायला लागतो. कथेला शीर्षक देतो, 'वाईटाचं स्वरूप, चांगल्याचं स्वरूप' आणि माझ्या लेखक ग्रुपला पाठवून देतो. ते चकित होतात आणि काहीसे अस्वस्थही. ते विचारतात की, लहानगीला एकटीलाच नाव का दिलं गेलं नाही. एकूणच शब्दोच्चार कसे करायचे याबाबत ते नाराज होते.

इथं निवेदक श्रोत्यांना समाविष्ट करून घेत नाही ही बाब सबंध सांस्कृतिक विशेषतेशी जोडलेली आहे, एक जण सावधपणे म्हणाला.

मला असंही वाटतं की, माझ्या ग्रुपमधल्या अन्य कुणाला तरी ही कथा लिहायला द्यावी, सुरुवात करावी, त्याच्या स्वतःची स्पष्टता आणि थेटपणासह. मग एखादा लिहायला बसेल, नितळ आणि वेधक सुरुवात करेल, मला पहिला मित्र मिळाला तो अंध होता. माझ्या कथेबद्दल बोलल्यावर काही दिवसांनी येणाऱ्या सूर्यग्रहणावर चर्चा करत राहतात. काहीजण सुट्टी काढून ग्रहणाच्या कालावधीत गाडी घेऊन ज्या ठिकाणी ग्रहण पूर्ण दिसेल अशा ठिकाणी जातात. बाकीचे कोणते चष्मे वापरावेत जेणेकरून सूर्यग्रहण सुरक्षितपणे पाहता येईल यावर बोलत राहतात. तो माणूस म्हणतो की, चष्म्याची आपल्यासाठी मोठी ऑर्डर देतो. मला विचारतो, तुला हवाय? मी मान हलवत 'नाही' म्हणतो.

चौथीच्या वर्गात लहानगीचे वडील कुटुंबासाठी पहिला कम्प्युटर विकत आणतात. शाळा सुटल्यानंतर ती कम्प्युटर सुरू करते व चमकदार, उबदार पडद्यासमोर बसते. तिचे पालक कामावर गेलेले आहेत. तिला आश्चर्य वाटते की, लिहिलेला मजकूर खोडरबरशिवाय पुसला जातो, इतक्या सहज आणि स्वच्छपणे कोणतीही धूळ न जमता. चालू बंद होणारी एक उभी रेषा पाहत राहते जी शब्दांनी बाहेर येण्यासाठी जणू एक द्वारच आहे. ती बोटं उचलते व कळीवर दाबते.

●





**'परिवर्तनाचा वाटसरू'चे ५वे प्रकाशन**

पंचविधा

**सुकुमार शिदोरे**

मूल्य १५० रु.

प्रसिद्ध झाले


**पुणे शहरातील प्रमुख विक्रेते :**

।। **बुकगंगा इंटरनॅशनल** डेक्कन जिमखाना, पोस्ट ऑफिस जवळ
।। **पुस्तकपेठ** साई-सरस्वती, शिक्षकनगर, गल्ली क्र. ७, पौड रस्ता
।। **भाई अविनाश इंगळे बुक गॅलरी** शान-ब्रह्म, केळकर रोड, अप्पा बळवंत चौक
।। **मार्शल्स् बुक कॅफे** औंधगाव, पं. भिमसेन जोशी सभागृहासमोर

परिवर्तनाचा वाटसरू

# बाबा हरवलेल्या मुलीची गोष्ट

छाया
कोरेगावकर
chhayabkbob@gmail.com



ताई गेली! आता तरी बाबा परत घरी येईल असं वाटलं होत. ज्या दिवशी ताई गेली त्यादिवशी बाबा मुंबईत नव्हता. 'ती'च्या बरोबर सोलापूरच्या कुठल्यातरी शिबिराला गेला होता. बाबा येईपर्यंत रात्रीचे दहा वाजले. ताई सकाळी दहा वाजता गेली. बसल्या जागी! कोचावरच! घरात कुणी नव्हतं. घरातून बाहेर पडताना पुसटशी कल्पनासुद्धा नव्हती की, ताई मला कधीच दिसणार नव्हती. मी घरी थांबायला हवं होतं का? आता जर तरला काहीच अर्थ नव्हता. ताई गेली या वास्तवाच्या विस्तवाची धग या जर-तरने कमी होणार नव्हती.

गोरापान दादा रडून रडून कोमेजून गेला होता. नमामावशी, विद्यामावशी राहून राहून मुसमुसत होत्या. सगळी नातेवाईक मंडळी ताईच्या डेडबॉडीभोवती ताटकळली होती. बाबाची वाट पाहून चिरडीला आली होती. बाबाशिवाय अंत्यविधी तर करता येत नव्हता. लग्नाची बायको होती ना त्याची! खूप महत्त्व असतं लग्नाच्या बायकोला! लग्नाचं बंधन शेवटपर्यंत निभावलं नाही तरी!

बाबा एकदाचा आला. पांढऱ्या कपड्यात गुंडाळलेली ताई, तिच्यावर हिरव्या साडीची घडी, हिरव्या बांगड्या ठेवलेल्या. तोंडात पानाचा विडा सवाष्णीचं मरण आल म्हणून कपाळभर लाल कुंकवाचा मळवट. आपल्या बायकोचं, निर्मलाचं असं विद्रूप पाहून तो हेलावून गेला. एरवी अशा वांझोट्या कर्मकांडाविरुद्ध त्याने आकांड-तांडव केलं असतं, पण आज त्याच्याकडे तो अधिकार नव्हता, पण तरी त्याचं असणं गरजेचं होतं. निर्मलाच्या गळ्यात त्याच्या नावाचं मंगळसूत्र होतं. ज्या मांगल्यांच सूत्रच हरवलं होतं त्या मंगळसूत्रासाठी त्याचं निर्मलाच्या अंत्यविधीला असण गरजेचं होतं.

उघडपणे व्यक्त होणं बाबाचा स्वभाव नव्हता. पण तिचा मृतदेह पाहून त्याला भडभडून आलं. डोळ्यावरचा चष्मा काढून त्याने शर्टाच्या खिश्यात टाकला आणि रुमालाने डोळे कोरडे केले. कुणीतरी त्याच्या हातात सोन्याचा मणी आणून दिला.

हा मणी, तुमच्या हाताने तिच्या तोंडात ठेवा. मणी आणून देणाऱ्याने आदेश दिला.

निमुटपणे तो मणी तिच्या निर्जीव ओठात ठेवण्याचा त्याने प्रयत्न केला. तो मणी सारखा-सारखा ओघळून पडत होता. तेव्हा एका पोक्त बायकी आवाजाने पुन्हा एकदा आदेश दिला. तो ईडा काढा तोंडातनं आन मणी घाला तोंडात! काय करायचं असतं मृतदेहासोबत आणखी? बाबा बावचळला होता त्याने मळवटभरल्या ताईच्या कपाळावर तळवा टेकवला.

तळव्याला जाणवला तो एक थंडगार स्पर्श, उभ्या देहात वणवा पेटवणारा. पंचवीस वर्ष जिच्याबरोबर संसार केला, जिने गोजिरवाणी दोन मुलं दिली जिच्याकडे पाठ फिरवल्यानंतरही चाळीस वर्षापूर्वी तिच्या गळ्यात घातलेल्या मंगळसूत्राचं इमान राखलं होत, ती निर्मला आज डेड बॉडी

"सूलीपर चढानेवालो को भी येशूने माफ कर दिया था! बुद्धने करुणा के बल पुरे संसार को जीता है जो इसी भारतभूमी का पुत्र था! और खुदकुशी करनेवाला हिटलर जीतकर भी हार गया था! करुणा बडी ताकदवर होती है बेटी! नफरत का जहर ख़ुशी को बरबाद कर देता है!"

झाली होती. अपराधीपण, दु:ख, वेदना याने डोकं भोवंडून गेलं, भोवळ आल्यासारखं झालं, उभ्या उभ्याच तोल गेला आणि बाबा मटकन खाली बसला.

ताई गेल्यानंतर घर रितं झालं होतं. नवऱ्याच्या मृत्यूनंतर सौभाग्यालंकार उतरवून ठेवलेल्या विधवेसारखं! ओकं बोकं खिन्न झालेलं घर श्वापदासारखं अंगावर राहून राहून धावत येत होतं. तिचं स्वयंपाकघर, तिने हाताळलेली प्रत्येक वस्तू बेवारस झाल्यासारखी निर्जीव वाटत होती. ताई घरासकट मला आणि दादाला पोरकं करून गेली होती. बाबा जेमतेम आठ दिवस घरात थांबला आणि पुन्हा 'ती'कडे निघून गेला जसा बावीस वर्षापूर्वी गेला होता तसाच!

मृदुला 'ती'ला चेटकीणच म्हणायची. हो चेटकीणच होती ती! बावीस वर्षापूर्वी तिने बाबावर चेटूक केलं होतं. चेटूक नाहीतर काय? पंचवीस वर्षाचा रसाळ आंब्यासारखा पक्व झालेला संसार अर्ध्यावर टाकून बाबा 'ती'कडे निघून गेला होता.

ताईला काहीतरी कुणकुण लागलीच होती. त्यातच रात्रीचं बाबाचं फोनवर तासंतास हळू आवाजात बोलणं, रात्री घरी उशीरा येणं, सुट्टीच्या दिवशी मित्राकडे जातो सांगून गायब होणं हे सगळं ताईसाठी संशयास्पद होतं.

ताईच्या मनात सतत एक भीती असावी, भीती म्हणण्यापेक्षा न्यूनगंड. बाबा रुबाबदार, गव्हाळकांतीचा देखणा पुरुष! साजूक तुपाक तळलेल्या पुरीसारखा सात्विक चेहऱ्याचा, सामाजिक चळवळींशी जोडलेला. समाजबदलासाठी वेगवेगळे उपक्रम राबणारा. जाती-पातीची तटबंदी मोडण्यासाठी ऐन तारुण्यातच मिश्र-विवाह चालवणारा वाढत्या वयाबरोबर त्याच्या सामाजिक कामाची आभा त्याच्या देखण्या व्यक्तिमत्वाला अधिकाधिक तेजाळून टाकत होती. बुद्धीच्या प्रखरतेचं वेगळंच तेज बाबाच्या एकूण व्यक्तिमत्वातून जाणवायचं. तर ताई सामान्य गृहिणी. पोराबाळात रमणारी. सुंदर म्हणता येणार नाही पण नाकी डोळी नीटस. तिच्या जगण्याचा परीघ कुटुंबांच्या बाहेर नव्हता. त्यामुळे बाबाच्या संसारात ताई सुखी होती. पण पातिव्रत्याची तिची संकल्पना अतिशय अणकुचीदार होती. त्या तलवारीचं तीक्ष्ण टोकं कायम बाबावर रोखलेलं असायचं. त्यामुळे बाबाही तिच्या परिघाच्या बाहेर जात नव्हता.

पण 'त्या' चेटकीणीने चेटूक केलं. मला अजूनही आठवतं. माझं तेव्हा दहावीचं वर्ष होतं. ताईच्या आणि बाबाच्या कुरबुरी वाढल्या होत्या. एका रात्री बाबा घरी आलाच नाही. रात्रभर आजी, आजोबा, ताई सगळेजण चिंतेत. मित्रांकडे फोन केले कुठेच बाबाचा पत्ता नाही. रात्री बारा वाजता घरातला फोन ठणठणला.

हा निर्मला, मी विद्याधर बोलतोय!

काय झालं, कुठे आहात तुम्ही? आम्ही काळजीत आहोत सगळेजण!

काळजी करण्यासारखं काही नाही. उद्या सकाळी येतोय मी!

ताईच्या डोक्यात संतापाचा वणवा उसळलेला. सकाळी नऊच्या दरम्यान बाबा आला, पण बाबा एकटा नव्हता. त्याच्यामागे 'ती' उभी होती. रात्रभर सगळेजण जागे होते. आजोबा आरामखूर्चीत हाताची घडी करून त्यात डोकं अडकवून बसलेले. आजी किचनमध्ये खुडबुडत होती. दादा उगीचच वर्तमानपत्रात डोकं खुपसून बसलेला.

बाबा म्हणाला, ह्या श्रीमती अहिल्या. काल मी त्यांच्याकडेच होतो.

बाबाचा हा प्रामाणिकपणा की, निर्लज्जपणा?

ताईने तलवारीच्या पात्यासारखी थंडगार नजर दोघांवरून फिरवली.

उद्यापासून मी ह्या बाईबरोबर राहणार आहे.

बाबाने अचानकपणे असा बॉम्ब टाकल्याने अवघ्या घराचा हिरोशिमा-नागासकी झाला. आजी, बाबाच्या अंगावर अंगावर धावून गेली मारायला! आजोबा थिजून गेले होते. त्यांनी कोणतीच प्रतिक्रिया दिली नाही. दादा संतापाने लालबूंद झाला होता आणि मी? मला काहीच कळेना कोण ही बाई आणि बाबा आपलं घर सोडून तिच्याबरोबर का राहणार? नुसतेच डोळे भरून भरून येऊ लागले. हुंदकाच फुटेना. खूप काहीतरी आत कोंडल्यासारखा जीव घुसमटून गेलेला.

'ती' तशीच अवघडून उभी! तिला कोणी बस म्हणेना. ती एक साधी-सुधीशी बाई! चारचौघींसारखी सावळ्या वर्णाची तिच्या अंगावर जॉर्जेटची निळी गर्द साडी. त्या तलम साडीत तिचा बांधा विलक्षण कमनीय दिसत होता, पण डोळे मात्र प्रचंड कारुण्याने डुचमळलेले. ती मला मुळीच आवडली नव्हती. आख्खाच्या आख्खा बाबा माझ्यापासून खेचून नेण्यारी ही बाई मला कशी आवडणार होती?

तिला काय वाटलं कुणास ठाऊक ती माझ्याजवळ आली आणि तिने माझ्या डोक्यावर हात ठेवला आणि म्हणाली बेटा रागावू नकोस, माफ कर मला.

तिचा आवाज अतिशय गोड होता. अगदी नादमय.. मी झटक्यात तिचा हात दूर केला.

लांब हो माझ्यापासून! हात लावू नकोस मला! चेटकीण आहेस तू चेटकीण! चेटूक केलस माझ्या बाबावर! चालती हो आमच्या घरातून!

तिने बाबावर खरोखरच चेटूक केलं होतं. चेटूक नाहीतर काय? माझ्या आजारपणात डोक्यावर थंड पाण्याच्या घड्या ठेवून रात्र -रात्र जागणारा माझा बाबा! तापाच्या ग्लानीने फिट्स आल्यावर दोन्ही हातात मला घेऊन रात्री-बेरात्री दवाखाने शोधत भिरभिरणारा माझा बाबा मला मुलांचे कपडे घालायला आवडतात म्हणून ताईच्या विरोधाला न जुमानता मला शर्ट पँट आणून देणारा, माझ्या पुरुषी आवडीनिवडीची निर्भत्सना न करता माझ्या नैसर्गिक उर्मी जपणारा माझा बाबा. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे खिशातला शेवटचा रुपया संपेपर्यंत स्वत: कंगाल होऊन दादाला उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठवणारा बाबा असा कसा घर सोडून जातो?

दहावीची परीक्षा कशीबशी पास झाले पण शिक्षणात लक्ष लागत नव्हतं. तसं कशातंच लक्ष लागत नव्हतं. ताईवर कोसळलेलं आभाळ सावरण्यात माझी आणि दादाची बरीच वर्षे निघून गेली. बाबा यायचा अधूनमधून, वेळप्रसंगी, कौटुंबिक मेळाव्याला, पण आम्ही तुटलो होतो त्याच्यापासून. ताई तर अगदी अनोळखी माणसासारखं स्वागत करायची त्याचं. बाबाने आम्हाला तोडलं नव्हतं पण 'ती'लाही सोडलं नव्हतं. ताई सावरल्यासारखं दाखवत होती पण आतून खूप खचली होती. नवरा दुसऱ्या बाईबरोबर राहतो. त्यामुळे कुंकवाबरोबरच टाकलेल्या बायकोचा टॅग कपाळावर लावून ती आयुष्य रेटत होती. घरटं हरवलेल्या चिमणीसारखी दोन्ही पिल्लं आपल्या उबदार पंखाखाली घेऊन जिण्याचा वारा पाऊस अंगावर झेलत होती. बाबा गेल्यावर रिकाम्या झालेल्या बेडरूमचं तिने भला मोठा देव्हारा केला होता. देवा-धर्माच्या कर्मकांडातून ती जगण्याचं निमित्त शोधत होती. ताई, तुला बाबाचा राग येत नाही? काय मागतेस तू देवाकडे?

जगण्याचं बळ मागते रे बेटा!

तुझा आणि बाबाचा काही संबंध राहिला नाही, मग गळ्यात हे मंगळसूत्रांच लोढणं कशाला घालतेस!

मृदुला, संबंध बाबांनी तोडला, मी नाही.. त्याचं कर्म त्यांच्याबरोबर. त्यांच्या आयुष्याची तेवढीच वाटेकरी होते मी.

तुला बाबाला शिक्षा करावीशी नाही वाटत कधी? कधी तरी मी चिरडीला येऊन तिला विचारलं तर म्हणाली, काय करू पोलिसात जाऊ? कोर्टात दावा लावू? त्याने काय होणार? तुझा बाबा मला परत मिळणार आहे? बाईच्या संसारातून 'नवरा' हरवल्याची फिर्याद कोणत्याच कोर्टात करता येत नाही गं! दावं तोडून गेलेल्या जनावरासाठी मालकाला दोष देण्याची रीत आहे आपल्या समाजात!

ताई काय बोलतेय ते कळतच नाही. कळलं ते एवढंच की, साला लग्न-बिग्न झूठ आहे सगळं! बाबा आजी-आजोबांचा एकुलता एक मुलगा, अगदी गुणी म्हणावा असा आज्ञाधारक. आजोबांच्या निवृत्तीनंतर गावाकडे जाण्यापासून त्यांना रोखणारा, आजी - आजोबांसोबत राहण्याचा आग्रह धरणारा बाबा कसा गेला घर सोडून? का? का? गेला बाबा? या भुंग्याने माझ्या मेंदूचा भुगा केलेला.. आजूबाजूच्या सोसायट्यांमध्ये चर्चेला उत आलेला. ताईच विझत -विझत जाणं.. अवघ्या पंधरा वर्षाचा मेंदू माझा!

नाहीच पेलवलं सगळं काही. हॉस्पिटलच्या बेडवर जेव्हा मी डोळे उघडले तेव्हा समोर बाबा दिसला. मी अर्धवट ग्लानीत, डाव्या हाताला बँडेज बांधलेलं. बाबा कॉटशेजारी एखाद्या कैद्यासारखा हात बांधून उभा. त्याच्या काळजातली कालवा - कालव डोळ्यातून पाण्यातून अखंडपणे झिरपत होती. घरी आल्यावर उराशी धरून पोटभर रडला बाबा.

माझ्या वासरा, एवढी कठोर शिक्षा नको देऊस तुझ्या बाबाला! काय केलंस तू! आयुष्य संपवायला निघालीस तुझ्या नादान बाबासाठी!

बाबा महिनाभर होता घरात, पण ताई आणि बाबा यांच्यातला संवादाचा पूल पूर्णपणे कोसळलेला. चेटकिणीने बाबाचं पुरत वशीकरण केलेलं. बाबा पुन्हा निघून गेला घर रितं करून.

आजोबांनी मुंबई सोडली. दादा लव्हमॅरेज करून मोकळा झाला. त्याच्या लग्नात आला होता बाबा एखाद्या चिफ गेस्ट सारखा! ताई आणि बाबा दादाचे लग्नविधी करत होते एकत्र बसून पण त्यांच्यात पडलेल्या मैलामैलाचं अंतर मला स्पष्ट जाणवत होतं. हा सगळा देखावा कशासाठी? लोकांसाठी? समाजासाठी? नवऱ्यामुलाला बाप असून लग्नात हजर नाही या लोकापवादाच्या कचाट्यातून सुटण्यासाठी? इतकी महत्त्वाची असते ही रूढी परंपरा? कुणी आखल्या या संकेतांच्या चौकटी?

लग्नानंतर दादाही निघून गेला बायकोला घेऊन. आता ताई आणि मी! आमच्या दोघींचा संसार सुरू झाला. दोन बायकांचा संसार, मायलेकीचा संसार, माझ्या जगण्याची चौकट बदलली.

अशा भिरभिरत्या वादळी दिवसात पल्लू भेटली आणि माझ्या जगण्याची चौकट विस्तारली. पल्लू म्हणजे पल्लवी हे एक अजब रसायन. आडदांड हाडापेराची दणकट उंचीपुरी पल्लू. तिला पोलीस खात्यात नोकरी करायची होती पण ती जातीनं शहाण्णव कुळी. ह्या मायनस फोर वाल्यांच्या डोक्यातच लोचा असतो. बाप म्हणाला, आपल्या बायका पोलिसात जात नाहीत तिथलं वातावरण बेक्कार! कोण लगीन करणार तुझ्याशी! तोंडाला काळ फासती का आमच्या? म्हणजे पुन्हा गाडी लग्नापाशी येऊन थांबली. जगण्याच्या प्रवासात इतका अटळ असतो लग्नाचा थांबा? की हा थांबा गाठण्यासाठीच लेकीबाळींनी या धावण्याच्या शर्यतीत उतरायचं असतं? बाईच्या जगण्याला दुसरा कुठचाच आयाम असू शकत नाही? जगणं समृद्ध करण्यासाठी लग्न वगळून इतर कोणत्याच जगण्याच्या वाटा नसतात का? मला तर हे बिलकुलच मान्य नव्हतं. दादाच्या लग्नानंतर बाबा

आला होता. माझ्या लग्नासंबंधीची बोलणी करायला.

बाबा कशासाठी करायचं असतं रे लग्न?

हे बघ आपल्या समाजात एकट्या मुलीचं जगणं सुरक्षित नाहीए बेटा!

हा म्हणजे सुरक्षिततेसाठी करायचं लग्न! तू पण केलं होतंस ना लग्न? काय झालं मग? तू निघून गेलास त्या चेटकिणीबरोबर ताईला असुरक्षित करून? आणि उद्या माझं लग्न झालं की ती एकटी राहणार! उद्या माझ्याही बाबतीत हे घडू शकतं ना? लग्न करताना सुरक्षिततेचं कोणतं हमीपत्र लिहून मिळतं बाईला? खर सांग बाबा कशासाठी करतात माणसं लग्न? एकमेकांच्या सोबतीनं, सहवासानं जगण विस्तारित व्हावं, आनंदाचे प्रदेश सोबतीने तुडवावेत, एक समृद्ध आयुष्य जगता यावं म्हणूनच ना? मग ही जगण्यासाठीची सोबत विरुद्ध लिंगी व्यक्तीकडूनच का अपेक्षित करायची?

म्हणजे काय म्हणायचं आहे तुला? बाबा अगदीच अगतिक झालेला.

नाही करायचं मला लग्न! माझा कोणत्याच पुरुषावर विश्वास नाही. केवळ एक पुरुष माझ्या जगण्याचं निमित्त नाही होऊ शकत. तेव्हा तू माझ्या लग्नाच्या भानगडीत पडू नकोस. मांडीवर बसून चिऊ काऊच्या घास भरवलेली मृदुला विद्याधरला जगण्याचं तत्त्वज्ञान शिकवत होती. तिच्या निग्रहाचा बुरुज भेदण्याची आपली क्षमता नाही, बाप म्हणून आपण तो अधिकार गमावलाय. या जाणीवेने विषण्ण झालेला विद्याधर हताश होऊन निघून गेला. हे आपण काय करून बसलो.. आपल्या अघोरी निर्णयाने केवढी उलथापालथ झालीय मृदुलाच्या आयुष्यात, या जाणीवेने तो अधिकच व्याकुळ झाला.

पोलीस भरतीत पल्लूचं सिलेक्शन झालं नाही. नाक घासत पुन्हा वडिलांकडे सोलापूरला जाणं तिला मंजूर नव्हतं. अंगात बऱ्यापैकी रग होती. कराटेची ब्लॅकबेल्ट होल्डर होती. मुलींसाठी सेल्फ डिफेन्सचे क्लासेस तिने सुरू करून मुंबईतच सेटल व्हायचं ठरवलं. थोड्याच अवधित पल्लू मृदुला दुधात पाणी मिसळावं तशा एकजीव झाल्या. आता संसार तिघींचा झाला होता. बाबाने घर सोडून सतरा अठरा वर्षे लोटली होती. कधीतरी धुमकेतूसारखा उगवायचा अधूनमधून पण ताई देवघरातून बाहेरही यायची नाही. अलीकडे ताईचा जास्तीत जास्त वेळ देवघरात जायचा. घरातून बाबा वजा झाला आणि तेहतीस कोटी देवांनी घरात ठाण मांडलं आणि अनेक व्याधींनी ताईच्या शरीरात. नवऱ्याच्या अपेक्षेसकट तिने डायबेटीस, बी.पी., निद्रानाश या सगळ्या व्याधींनाही स्वीकारलं होत. बाबा घरातून वजा झाला पण ताईच्या आयुष्यातून नाही, आणि चेटकिणीला आजतागायत बाबा वजा करू शकला नाही.

उत्सुकतेपोटी गेलेच एकदा चेटकिणीला भेटायला. तिने असं स्वागत केलं जणू मधल्या वीस वर्षात काही घडलंच नाही. खरं तर फोनवरून मी तिची यथेच्छ निर्भत्सना केली होती. दादा तर पोरं घेऊन तिला मारायला गेला होता. पण जेव्हा मी तिला भेटले तर तिचे डोळे नितळ, निरभ्र! कुठलंच मळभ नव्हत तिच्या डोळ्यात, तोच नादमय गोड आवाज.. विलक्षण लाघव होत तिच्या बोलण्यात.

मृदुला तू कधी मला भेटशील असं वाटलं नव्हतं गं! खूप बरं वाटलं तू भेटायला आलीस ते! असं म्हणत तिने हात धरून जवळ बसवलं.

चेटकिणीची देहबोली आणि डोळे सांगत होते की, हे तिचं मायावी रूप नाही. मला वाटलं तेवढी चेटकीण कुरूप नव्हती. पण मी बधणारी नव्हते. मी माझी तटस्थता अभेद्य ठेवून तिला न्याहाळत होते, अगदी आरपार! शोधत होते तिच्यातलं चेटूक ज्याने माझा आख्खा बाबा गिळला होता. मी शक्यतोवर

डोळे कोरे ठेवण्याचा प्रयत्न करत होते. तटस्थ राहून तिच्या माझ्यातलं अंतर ठळक करत होते.

तिच्याकडे विलक्षण संभाषण चातुर्य होत. मी तिला जवळ येऊ देत नव्हते पण ती माझा त्रयस्थपणा डावलून अतीव प्रेमाने वागत होती. तिचं ते लाघव जीवघेणं होतं. इवल्याश्या घरातला तिचा वावर, तिच्या हालचाली यांना एक लय होती, नाद होता. काहीतरी होत खास चुंबकीय असं. बहुतेक बाबा याच्यातच वितळला असावा.

गोडाचा शिरा करू तुझ्यासाठी? पुन्हा एकदा नाजूक आवाजात ती किणकिणली.

काही करू नकोस माझ्यासाठी! तुझ्या घरात पाणी सुद्धा पिणार नाहीये मी!

माझ्या फणकाऱ्याकडे दुर्लक्ष करत ती किचनकडे वळली. मी तिचं घर न्याहाळत राहिले दहा बाय बाराची चिमुकली बैठकीची खोली एका भिंतीला टेकून बसण्यासाठी सेटी. त्यावर बदामी आकाराची मखमली आवरणाची कुशन्स, समोरच्या भिंतीवर आकर्षक पद्धतीचा रॅक, त्यावर हारीने मांडलेली सन्मान चिन्हं, साहित्यिक पुरस्काराच्या ट्रॉफ्या, काही पुरस्कार स्वीकारतानाचे फोटो, सन्मानचिन्हांवर झळकणारं तिचं नाव अहिल्या चव्हाण.. रॅकच्या उजव्या कोपऱ्यात गवसणीत निगुतीने बांधून ठेवलेला तंबोरा आणि गवसणीवर रेशमी टाक्यांनी विणलेली राधा - कृष्णाची छबी.. घराचा प्रत्येक कोपरा तिच्या कलासक्त व्यक्तिमत्वाची साक्ष देत होता.

शिऱ्यांच्या दोन प्लेट्स तिने टीपॉयवर ठेवल्या.

घे, केशर घालून केलाय शिरा!

मी तुला आधीच सांगितलं होतं मी पाणी सुद्धा पिणार नाही तुझ्याकडे, घेऊन जा त्या प्लेट्स!

मी तिला फटकारायची, तिचा तेजोभंग करण्याची एकही संधी सोडत नव्हते. ती तितकीच शांत होती. तिच्या डोळ्यांचे नितळ डोह जराही डुचमळत नव्हते.

मी आलेय तुला जाब विचारायला, खायला नाही!

कसला जाब, काय हवंय तुला माझ्याकडून?

ती अतिशय शांत स्वरात माझ्याशी संवादत होती. तिच्या अशा वागण्याने माझ्या त्वेषाचा पारा चढत होता.

तू एका बाईचं आयुष्य उद्ध्वस्त केलंस! एक सुखी घरटं मोडून टाकलंस, गुन्हेगार आहेस तू!

असेन गं! पण हा गुन्हा मी जाणीवपूर्वक नाही केला. आयुष्याच्या एखाद्या वळणावर सापडतो. अशा चकव्यात माणूस! नाही पडता येत बाहेर त्यातून! अटळ असतात काही अपघात!

तुझी साहित्यिक भाषा बाजूला ठेव.. शब्दांचा मुलामा चढवून समर्थन नाही होऊ शकत तुझ्या गुन्ह्याचं! असं बोलून मी जायला निघाले तशी एक जखमी नजर टाकली तिने माझ्याकडे! हात धरून मला कुशीत घ्यायचा प्रयत्न केला. तिचा हात झिडकारून दिला.. अनेक वर्षाच्या संतापाचा धडा तिच्यावर रिता करून तडक तिच्या घराबाहेर पडले.

खोपोली स्टेशनपासून पाच कि. मी अंतरावर बंगला भाड्याने देणे आहे पेपरमधली ॲड वाचून मृदुलाने पल्लवीला मिठी मारली. पल्लू डन! आपण हा बंगला बघायला जायचं. मृदुलाच्या मनात उत्साहाची कारंजी उसळू लागली. ताई गेल्यापासून घर अंगावर यायचं. तिथून पळून जावंसं वाटायचं, तिच्या आठवणीने जीव व्याकुळ व्हायचा. बाबाच घरं सोडून जाणं, ताईचा मृत्यू या सगळ्याचं गाठोडं दूर भिरकावून नव्या आयुष्याला सुरुवात करायची, ठरलं तर!

बंगल्याचा मालक गुजराथी सत्तरी ओलांडलेला. मृदुलाच्या हाती चावी देताना तो अगदी भावुक होऊन गेला होता.

ये बंगलो मारी बायडीनू छे! ये मने बेचवानू

नथी!

किराया, डिपॉझीट कितना?

मृदुलाने सुरुवातीलाच मुद्द्याला हात घातला.

देखो बेटी, ये बंगला पुराना है! मारी बायडी वास्ते बनवाया था! अब बायडी नही रही! देखभाल करनेवाला कोई नही! पुराना बंगलो है तुम डिपॉझीट के बदले उसे ठीक -ठाक करो! किराया बाद में देखेंगे! पहिले बंगला देख लो!

रणरणत्या उन्हात मृदुला आणि पल्लवी रिक्षातनं उतरल्या. रस्त्याच्या डाव्या हाताला पंधरा वीस पावलावर बंगला.. बराचसा जुना झालेला, झाडा झुडपांनी, झाकोळलेला. रानवेली जमिनीपासून बंगल्याच्या वरपर्यंत चढलेल्या. आजू-बाजूला सुकलेल्या पानांचा पाचोळा, वाढलेलं गवत! परिसर अगदी निवांत. रस्त्यावरून कोणी येताना जाताना दिसत नव्हतं. बंगल्याच्या गेटच्या दिशेला दहा-पंधरा पावलावर एक टुमदार कौलारू रो हाउस! तिथं थोडी जाग वाटत होती. कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज येत होता.

पाठीवरच्या सॅक खाली ठेवून दोघी बंगल्याच्या पायरीवर रुमाल टाकून बसल्या. पल्लवीने सॅकमधून पाण्याची बाटली काढली. उन्हाने घशाला कोरड पडली होती. उन्हाळ्यामुळे प्लास्टिकच्या बाटलीतलं पाणी कोमट झालं होत.

पल्लू, मला हा परिसर आवडलाय. छान निवांत आहे. माणसांची, घरांची गर्दी नाही, आणि बंगल्याच्या भोवताली पण बरीचशी जागा मोकळी आहे! आपण इकडेच राहू या.

मृदू वेडी बिडी आहेस का? अग हा बंगला वापरात नाही. त्याची केवढी डागडूजी करावी लागेल! रंग रंगोटी केवढा खर्च!

त्यात काय झालं! आपण या बंगल्याचा महाल करून टाकू! माझ्या डोक्यात खूप आयडिया आहेत.

दोघींचं बोलण चालू असताना समोरच्या पाचोळ्याचा चुरचुर असा आवाज झाला. म्हणून त्यांनी समोर पाहिलं तर समोरच्या घरातून एक व्यक्ती त्यांच्या दिशेने येताना दिसली. ती व्यक्ती जवळ येऊन थांबली. हॉरर सिनेमातल्या सारखी ती व्यक्ती काहीशी गूढ वाटत होती. अंगात लाल रंगाचा टी शर्ट! गुडघ्यापर्यंत मातकट रंगाची बरमुडा! डोक्यावर गोल - पसरट हॅट आणि हातात स्टीलचा ट्रे! ट्रेमध्ये चहाचे दोन मग. एका बशीत बिस्कीट आणि पाण्याची बाटली!

मायसेल्फ इज थॉमस! पांढऱ्या शुभ्र घनदाट दाढीच्या आड लपलेल्या ओठातून भारदस्त आणि दणकट आवाज आला.

दोघी हडबडल्या. नेमकं काय बोलावं सुचेना!

अंकलऽऽऽ आप ये... सब...

मृदुला चांगलीच भांबावली होती. हा अंकल खरा की, खोटा?आता दोघी उठून उभ्या राहिल्या.

लो बेटी पानी पी लो! चाय भी लाया हूँ!

अनाहूत पाहुणचाराने गडबडलेली पल्लवी म्हणाली -

अंकल इसकी जरुरत नहीं थी!

तो फिर वापस ले जाऊ?

हा माणूस केवळ गूढच नाही तर चक्रमही दिसतोय! आपणहून ओळखदेख नसताना काहीशा निर्जन ठिकाणी असा पाहुणचार नाकारणं म्हणजे केवढा उद्धटपणा! मृदुला म्हणाली, नहीं नहीं, ऐसी बात नहीं.. आपने क्यू तकलीफ उठायी!

बेटा ये तकलीफ नही, तसल्ली है! दर्द, तकलीफ ये दिल का वहेम है! हर एक बात में, हर एक पल में ख़ुशी ढूंढ़ो जिंदगी जन्नत से कम नहीं!

अरे हे थॉमस अंकल! म्हणजे ख्रिश्चन पण हिंदी एवढं अस्खलीत बोलतात!

अंकल आपकी हिंदी तो बहुत अच्छी है!

बेटा, अस्सी की उमर पार कर चुका हूँ! केरल का रहेनेवाला.. पुरी दुनिया घुम चुका हूँ! सर पे

जितने ये सफेद बाल है! उतने शहेर घुम चुका हूँ! हिंदी का क्या, मल्याळम मेरी मातृभाषा है! मैं मराठी और गुजराथी भी जान लेता हूँ!

थॉमस अंकल बोलता बोलता खुलून गेले. भाषेची केवढी किमया असते ना! त्यांना मराठी येतं म्हंटल्यावर दोघींची कळी खुलली. संभाषणातली ताठरता निवळू लागली.

अंकल आम्ही महाराष्ट्रीयन आहोत. आपण मराठीतच बोलू!

बोलता बोलता मृदुलाचा आवाज ओलसर झाला.

अंकल आपके घर में कौन कौन है फॅमिली मेंबर!

चलो मैं दिखाता हूँ, आओ मेरे पीछे!

अंकलच्या रो हाऊसच्या उजव्या हाताला एक पत्र्याची शेड होती. शेडच्या सावलीत खाली गोणपाटावर पाच - सहा गावठी कुत्री बसली होती. त्यांच्यासाठी बाकड्यावर हारीने जर्मनच्या थाळ्या मांडून ठेवल्या होत्या. पाण्याचे छोटे छोटे तीन चार टब भरून ठेवलेले होते, अंकल आवारात शिरताच दोन कुत्री आवाज करत त्याच्या जवळ येऊन पायात घोटाळू लागली. एकाने अंकलच्या पायावरच तोंड घासायला सुरवात केली. नहीं अभी नहीं, चलो रुस्तुम जगह पे जाकर बैठो! ज्युली तेरा क्या.. चल तेरे बच्चे के पास जाकर बैठ! अभी मेहमान आये है चलो बाद में बात करेंगे!

अंकलला कुत्र्यांची पण भाषा येते? तिन्ही कुत्री जागेवर जाऊन बसली.

मुलींनो हा माझा परिवार! गेले वर्षभर माझी सोबत करतात. वेळ मिळाला की, गप्पा मारतो आम्ही!

अंकलचा परिवार बघून मृदुला आनंदाने चित्कारली. अंकल आपली कुंडली एकदम जमून जाणारे! माझ्याकडे पण सुली आणि लीली आहेत. दोन बोके, एक मांजर, एक कासव आणि सात मासे आहेत.

हा बेटी बेजूबान जानवरों का प्यार बडा सुकुन देता है!

डाव्या बाजूला प्राण्यांची शेड तर उजव्या बाजूला भाज्यांचे वाफे! असे सात-आठ वाफे! एकात इवल्या इवल्या भेंड्या रोपांना लगडलेल्या होत्या. दुसऱ्यात हिरवट वांगी रोपट्यांवर हिंदोळत होती. तिसऱ्यात हिरव्या मिरच्या डौलात डुलत होत्या. भोपळा कारल्याचे वेल मांडवांवर चढले होते. समोरच्या आवारात वेगवेगळी फुलझाडं - गुलाब, मोगरा, तगर, सदाफुली रो हाऊसचा परिसर हिरवाईने नटला होता.

अंकलच कौलारू रो हाउस म्हणजे हिरव्या शालूत नटलेली नवरीच जणू! हे सारं पाहून मृदुला हरखून गेली मनातल्या मनात तिने अंकलशी गट्टी जमवून टाकली.

घराच्या आतली रचना तर मंत्रमुग्ध करणारी. पायऱ्या चढून आत आल्यावर मोठा हॉल, हॉलच्या भिंती पांढऱ्या शुभ्र! डाव्या कोपऱ्यात शिसवी डायनिंग टेबल. त्यावर एक फळांनी भरलेली वेताची टोपली. ख्रिसमस ट्री सारख्या स्टँडवर लटकवलेले काचेचे मग आणि ग्लास! डायनिंग टेबल सुसज्ज! घरात शिरताच समोरच्या भिंतीवर लक्ष वेधून घेणारी येशूची वात्सल्याने ओथंबलेली तसबीर! त्यावर, लटकवलेल्या दिव्याची तांबड्या केशरी रंगाची आभा! वेताच्या दोन खुर्च्या, वेताचाच नाजूकसा सोफा! मोजकंच फर्निचर पण सुबक मांडणी केलेलं घर अंकलच्या, रसिकतेने ओतप्रोत भरलेलं! पल्लवी आणि मृदुला चाहूल घेत होत्या. त्यांना वाटलं किचनमधून कोणीतरी येईल. पण घरात कोणाचीच चाहुल नव्हती. न राहवून पल्लवी म्हणाली, अंकल तुम्ही एकटेच राहता?

एकटा कुठे? आता तुम्ही आलात ना! असे

रोज माझ्याकडे नवे नवे लोक येतात. कधी कधी रस्त्यावरचे वाटसरू सुद्धा!

मग तुमची फॅमिली कुठे असते?

वो बडी लंबी कहानी है! मूड बनेगा तभी सुनाऊंगा! तुमचं काय? तुम्ही इकडे कशा आलात!

अंकल आम्ही हा बंगला भाड्याने घेणार आहोत आणि इथेच राहणार आहोत!

ये हुई ना बात! अंकलला चेहऱ्यावरचा आनंद लपवता येईना.

मुलींनो बंगल्याची मरम्मत करावी लागणार! तेव्हा तुम्हाला काही हेल्प हवी असेल तर ये अंकल हाजिर है!

अंकलच्या घरातून परतताना संध्याकाळ होत आली होती, पण मृदुलाच्या मनात नव्या घराच्या स्वप्नांची पहाट फुलत होती.

कुबड्या माणसाचं कुबड गायब होऊन त्याच्यात आमूलाग्र बदल दिसावा, त्याला कोणी ओळखूच नये तस झालं त्या बंगल्याचं.



झाडं झाडोऱ्यात लपलेला बंगला कोणाच्या खिजगणतीत नव्हता तो आता रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्याचं, गावकऱ्यांचं लक्ष वेधून घेऊ लागला. मृदुला आणि पल्लवीने त्याचं रूपडं पार बदलवून टाकलं. मृदुलाच्या हातात कला आणि डोक्यात कल्पकता होती. आकर्षक रंगसंगतीने बंगला रंगवला होता. बंगल्याभोवती लाकडी कुंपण तेही निळसर रंगात रंगवलेलं. आवारात फुलझाडं डोलू लागली. आवडी-निवडी पण संसर्गजन्य असतात की, काय कोणास ठाऊक? थॉमस अंकलच्या प्रेरणेने तिनेही भाज्यांची लागवड केली. बंगल्याच्या पोर्चमध्ये फुलझाडांच्या, स्वत:च्या हाताने नक्षीकाम केलेल्या हंड्या लटकू लागल्या. उत्सुकतेपोटी बिगारी कामावर जाणारे कामगार, ज्यात अधिकतम कोंगाटी लोक होते, ते बंगल्यापाशी थबकत. त्यांच्यासाठी कंपाऊडच्या बाहेर दोन मोठे पाण्याचे माठ ठेवले गेले. कामगार हक्काने पाणी पिऊन जायचे, जाताना बाटल्यांमध्ये पाणी भरून घेऊन जायचे.

थॉमस अंकल एकटे! पण घरात चार-पाच माणसांचं अन्न शिजायचं. त्यातलं अर्ध-अधिक कामगारांना वाटण्यात जायचं. थोडं मृदुलाकडे जायचं. रोज नव्या डिशेश. थॉमस अंकल चांगले कुक होते. तंदुरी चिकनपासून डोश्यापर्यंत सगळ्या डिशेश त्यांना यायच्या. स्वत: मात्र फारच थोडंसं खात असत. या देवाण घेवाणीत त्यांचा गोतावळा वाढला आणि मृदुला - पल्लवी घरोबा घट्ट झाला. आता कामगार हक्काने त्यांच्याकडे येऊ लागले होते. तसेच मृदुलाकडेही त्यांच्या चुटुक मुटुक समस्यांचं निवारण करणं, अडी-अडचणीला आर्थिक मदत करणं आता नित्याचंच होऊन बसलं. कामगार गरीब होते. त्यांचं हातावर पोट होतं. काम नसताना थॉमस अंकलच्या बागेत स्वेच्छेने काम करायचे, कोणत्याही मोबदल्याशिवाय. गरीबाकडे दारिद्र्य असतं पण इमानाची श्रीमंती असते याचा वारंवार प्रत्यय त्या दोन्ही बंगल्यांना येऊ लागला. एकदा पल्लवी थॉमस अंकलला म्हणाली सुद्धा,

अंकल तुम्हारे इस छोटेसे खेत में इतनी सब्जी निकलती है बेचोगे तो अच्छी खासी आमदानी हो सकती है! आप तो फोकट में इन लोगों को बाटते रहते हो!

अंकल गालातल्या गालात हसले आणि म्हणाले ऐ जिस्म अस्सी साल का हो गया है, इसके साथ मैं पुरी तरह से इन्साफ कर चुका हूँ! इस जिस्म ने दुनिया के बडे बडे होटल में कॉन्टीनेंटल खाना खाया है! पुरा युरोप घुमकर कुदरत का करिष्मा देखा है! जीने का पुरा नशा मैं लुट चुका हूँ! अब इस जिस्म को किसी चीज की चाहत नहीं है! अब में जिंदगी जीनेवालों को कुछ देना चाहता हूँ! दुसरों के लिए जीने का नशा भी कुछ और होता, बस मैं उसी नशा में डूबा रहता हूँ! पुरा दिन पेड पौधो में काम करता हूँ! काम आदमी जिंदा रखता है! और एक बात कहूँ? मिठाई जब खत्म हो जाती है तभी चस्का लगा देती है वैसेही जिंदगी थोडीसी बची है तो उम्मींदे बढ गयी कुछ अच्छा करके दुनिया छोडने की! अस्सी के उपर मैं कितने साल जिंदा रह सकता हूँ! अब मॅच खतम होने को है! लास्ट ओव्हर में हो सके उतने रन निकाल के मैं मॅच जितकर जाना चाहता हूँ! बोलता बोलता अंकलचा गळा दाटून आला, पापण्याच्या कडा ओलावल्या. अंकलच्या आयुष्याचं गणित आणि एकूणच जीवनविषयक भूमिका, त्यामागचं तत्त्वज्ञान ऐकून मृदुला भारावून गेली होती. तिने अंकलच्या दोन्ही खांद्यावर प्रेमाने हात ठेवले आणि त्यांच्या डबडबलेल्या डोळ्यात ती आपला हरवलेला बाबा शोधू लागली.

त्या दिवशी अंकलचा चांगलाच मूड लागला आणि त्यांनी आपला जीवनपट मृदुला आणि पल्लवीसारख्या कोवळ्या तरुण मुलींकडे उलगडून दाखवला. कोण होत्या त्या दोघी अंकलच्या? कुठंच नातं होतं त्या तिघांमध्ये! केरळहून आलेले अंकल, मुंबई सोडून आलेली मृदुल, पुण्याहून पळून आलेली पल्लवी. तीन प्रदेशातली तीन माणसं! तिघांचीही वेगवेगळी कौटुंबिक पार्श्वभूमी. जीवनाचे प्रवाह वेगळे पण खोपोलीसारख्या म्हंटलं तर शहरात म्हंटलं तर गावात अशा ठिकाणी तिघांच्या जीवनप्रवाहांचा त्रिवेणी संगम झाला होता. तिघांच्यातही भावनिक असा बंध दिवसेंदिवस घट्ट होत गेला होता. हरवलेली नाती एकमेकांच्यात शोधत वसुधैव कुटुंबकम या उक्तीची तिघेही अनुभूती घेत होते. मृदुलाने आपल्यापुरती बदललेली कुटुंबाची चौकट ती प्रत्यक्ष अनुभवत होती.

अंकल जेवढे गूढ होते तेवढाच त्यांचा जीवनप्रवासही झंझावातीच होता. अंकल केरळी ख्रिश्चन, त्यांनी केरळी गोवेकरणीशी लग्न केलं. तिच्यापासून त्यांना दोन मुलं झाली. पंधरा वर्षे आर्मीत मोठ्या हुद्यावर नोकरी केली. परतल्यावर गोव्यात बिझनेस केला. कोट्यावधीची प्रॉपर्टी जमवली. मुल लहान असतानाच बायकोचा मृत्यू झाला. संगोपनाच्या नावावर बायकोच्या माहेरच्यांनी दोन्ही मुलांचा ताबा घेतला. भल्या – थोरल्या प्रॉपर्टीचा हिशोब ठेवून अंकलला मुलांपासून दूर ठेवले. बायकोचा मृत्यू आणि दुरावलेली मुलं! अंकल विस्कटले आतल्या आत, त्या विमनस्क अवस्थेत त्यांनी इंडिया सोडायचं ठरवलं. हरहुन्नरी स्वभाव, आर्मीतला अनुभव आणि शैक्षणिक क्षेत्रातली भरभक्कम पदवी घेऊन त्यांनी दुबई गाठली. तिथे चांगलं बस्तान बसत असतानाच हसीना नावाची अरेबियन पोरगी या अवलीयाच्या प्रेमात वेडी झाली. मुलांच्या ओढीने भारतात फेऱ्या व्हायच्या पण मुलांना त्यांच्यापासून दूर ठेवण्यासाठी बायकोच्या माहेरच्या लोकांनी खेळी खेळली. त्यामुळे स्वत:पेक्षा वीस वर्षांनी लहान असणाऱ्या हसीनाशी निकाह करण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

हसीना एका श्रीमंत अरबाची एकुलती एक मुलगी. मुलीच्या प्रेमाखातर बाप लग्नाला तयार झाला पण एका अटीवर! अंकलला इस्लाम धर्म स्वीकारावा लागला. हसीनाचा बाप सोन्याचा व्यापारी. गडगंज पैसा, मोठमोठ्या कंपनी डायरेक्टरबरोबर घनिष्ट संबंध. त्याच संबंधांतून एका इंटरनॅशनल कंपनीत मिस्टर थॉमस भागीदार झाले. मुळच्या हुशार असणाऱ्या अंकलने कंपनी भरभराटीला आणली. आपली ओळख निर्माण केली. पैसा आणि प्रसिद्धी माणसातल्या हैवानाला जागं करते हेच खरं. कंपनीतल्या स्थानिक अधिकाऱ्यांनी मिस्टर थॉमसवर बालंट आणलं. मिस्टर थॉमसने वर्षभर जेलची हवा खाल्ली. तिथल्या कायद्याप्रमाणे प्रॉपर्टी सील केली. त्यांचा पासपोर्ट रद्द केला आणि मिस्टर थॉमस दुबईतून हद्दपार होऊन रित्या हातांनी इंडियात परतले.

मधल्या अवधीत हसीनाने इरफानच्या रूपाने आपल्या अतूट प्रेमाची पावती दिली. इरफानचं देखणेपण लाजवाब होते. हसीनाचं लावण्य आणि थॉमस अंकलचं मर्दानी रूप याचा सुंदर मिलाफ म्हणजे इरफान! पण या अपत्याचं पण सुख त्यांच्या नशिबात नव्हतं. अफरातफरीच्या आरोपाखाली नवऱ्याला शिक्षा झाली. ह्या धक्क्याने हसीना खचली. आपल्या प्रतिथयश व्यापारी बापाच्या प्रतिष्ठेचा चक्काचूर झाला. या मानहानीने तिने हाय खाल्ली. धर्माचा, देशाचा कसलाही विचार न करता ज्या थॉमसवर तिने जीव ओवाळून टाकला, तो लफंगा निघावा या दु:खाने ती उन्मळून पडली. तिने अंथरूण धरलं. सतरा वर्षाच्या इरफानला आणि थॉमसला एकटं करून तिने थोड्याच दिवसात या जगाचा निरोप घेतला.

अंकल थॉमस कफल्लक होऊन इंडियात परतले, त्यांनी थेट केरळ गाठलं, तर धर्मांतराच्या कारणास्तव नातेवाईकांनी बेदखल केलं. सामाजिक बहिष्कारामुळे केरळ सोडून त्यांनी मुंबई गाठली.

तीन मुलांचा निपुत्रिक बाप, एक गरीब सैन्याधिकारी वयाच्या पंच्याहत्तरीला मित्राच्या बंगल्याचा केअरटेकर म्हणून खोपोलीला आला. एकेकाळी अतिशय सुबत्तेत राहणारा, पैशाच्या राशीत लोळणारा, विदेशी कापडाचे सूट-बूट घालणारा अंकल थॉमस खोपोलीच्या बंगल्यात सन्यस्त आयुष्य जगू लागला.

कोजागिरी पौर्णिमेच्या मसाला दुधाची कल्पना अंकलना एकदम पसंत पडली. आजपर्यंत शिवास रिगल, शॅम्पेन अशा उंची उंची मद्याच्या पेल्यात धुंद रात्रींचा कैफ बाजूला ठेवून ते या अनोख्या मैफिलीत सामील झाले. त्यांच्यासाठी हा एक अभिनव असा अनुभव होता. संध्याकाळपासूनच ते उत्साहात होते. त्यांच्या बागेत त्यांनी लाकडी टेबल आणि खुर्च्या मांडल्या. टेबलावर किनरवापी कशिद्याचा पांढराशुभ्र टेबलक्लॉथ. त्यावर फुलांनी सजवलेली नक्षीदार फुलदाणी आणि काचेचे नक्षीदार मग, मसाले दूध पिण्यासाठी आणि दुपारपासून खपून बनवलेलं खास पुडिंग! चांदण्याच्या दुधाळ प्रकाशात मैफील रंगात आली होती. बागेतल्या रातराणी -मोगऱ्याचा सुगंधात मैफिलीचा रंग गडद होऊ लागला. अंकल त्यांच्या आयुष्यातल्या जुन्या आठवणी सांगत होते. आर्मीतले अनुभव, शिकारीचे किस्से. रेसकोर्सवरची धमाल आणि दुबईत ऐन पन्नाशीत रंगलेलं त्याचं आणि हसीनाचं प्रेमप्रकरण. मृदुला आणि पल्लवी मुग्ध होऊन ऐकत होत्या. इतका वेळ आपणच बोलतोय हे लक्षात आल्यावर ते थोडे खजील झाले आणि म्हणाले, अरे इतने दिनों में तुम्हारे बारे में कुछ पूछा भी नहीं! हां वैसे जरुरत भी नहीं मेहसूस हुई, अब तुम बतायो तुम्हारे बारे में! फॅमिली के बारे में!

दो साल पहले मेरी मम्मी गुजर गई! बडा भाई

है वो अमेरिका में सेटल है! और एक मैं हूँ!

और तुम्हारे पापा? अंकलच्या या प्रश्नावर मृदुला क्षणभर स्तब्ध झाली. बाईस साल पहले मेरे पापा खो गये! बोलताना मृदुलाचा गळा दाटून आला होता.

मैं समझा नहीं! खो गये मतलब? तुमने ढूँढा नहीं उसे?

पास होकर भी खो जाने का दर्द बडा जालीम होता है अंकल! मैं मेरे पापा से बहुत प्यार करती थी! वो मेरे बहुत करीब दोस्त थे! लेकीन एक डायन उन्हें निगल गयी! पापा घर छोड के चले गये उसके साथ.. तबसे मैं उनसे बहुत नफरत करती हूँ!

देखो बेटी मैं तो जिंदगी के सारे रिश्ते खो चूका हूँ! फिर भी मैं किसीसे नफरत नहीं करता! पहले दो बेटे उनके बचपन से बिछड गये! इरफान सतरा साल मेरे साथ था लेकिन जेल जाने के बाद वो भी मुझसे नफरत करने लगा! मैंने जिंदगी का मोड बदल दिया! मैंने जानवरो से पेड पौधों से रिश्ता जोड लिया! और किस्मत का करिष्मा देखो तुम्हारे जैसी दो बेटिया मुझे मिल गयी है! मैं खुश हूँ! जिंदगी के रास्ते खुशियों की, तरफ मोड देंगे तो जिंदगी का सफर आसान और सुकुन दे होता है!

पापा ने हमें अकेला छोड दिया! मेरे मम्मी के साथ धोका किया! मैं उन्हें माफ नहीं कर सकती!

सूलीपर चढानेवालो को भी येशूने माफ कर दिया था! बुद्धने करुणा के बल पुरे संसार को जीता है जो इसी भारतभूमी का पुत्र था! और खुदकुशी करनेवाला हिटलर जीतकर भी हार गया था! करुणा बडी ताकदवर होती है बेटी! नफरत का जहर ख़ुशी को बरबाद कर देता है!

अब तुम्हारे पापा की उम्र क्या होगी?

He has crossed seventy. मृदुला.

तो उनके पास जिंदगी के कितने साल बचे है! अगर सही में जिंदगी के साथ इन्साफ करना है तो तुम्हारे पापा को माफ कर दो! संतान का बिछडना दर्दभरा होता है! और दुसरी बात तुम्हारे पास आठ – दस जानवर है! उसे तुम जी जान से प्यार करती हो, ये तुम्हारी फ्रेंड पल्लवी उसके साथ तुम्हारे खून का कोई रिश्ता नहीं उसको तुमने अपनी जिंदगी में समा लिया है! तो जिस पापा का खून तुम्हारे रगो में है, उसे तुम एक बार माफ करके रिश्ता नहीं जोड सकती.. जो मेरे जैसे अन्जान अंकल से जोडा है!

अंकल उमाळ्याने बोलत होते. त्यांच बोलणं ऐकताना मृदुलाच्या काळजातही काही फडफडत होतं. तिला अंकलचं म्हणणं पटतंही होत आणि नव्हतंही.

पोस्टमनने दिलेला लिफाफा विद्याधरने घाई-घाईने उघडला. आजच्या डिजिटलच्या दिवसात हे कुणाचं पत्र!

दोन अडीच पानांचं पत्र वाचता वाचता विद्याधरचे डोळे भरून आले होते. घळाघळा डोळ्यातून वाहणाऱ्या पाण्याने पत्र भिजून गेलं. पत्र त्याच्या लाडक्या बछड्याचं, मृदुलाचं होतं. शब्दा-शब्दातून अपराधीपणाची धग आणि त्याच्याबद्दलचं तिचं प्रेम ओथंबत होतं.

बाबा, तुझ्या लेकीचा संसार बघायला येणार नाहीस? हा माझा अनोखा संसार आहे. त्यात लिली, जुली, मन्या, पिंद्या, मोगरा, रातराणी, पेरू, आंबा, केळी, पल्लवी आणि जोसेफ अंकल पण आहेत. बाबा तू नेहमीच मला इतर पारंपारिक बापांपेक्षा वेगळी तालीम दिलीस.. उडण्यासाठी आभाळ मोकळं ठेवलंस. माझ्या मनस्वीपणाचा सन्मान केलास, माझ्याभोवती चाकोरीचं कुंपण घातलं नाहीस. बाबा तू लवकरात लवकर ये! तुझ्या लाडक्या लेकीचा संसार डोळे भरून बघायला ये आणि हो येताना चेटकिणीलाही घेऊन ये! मी वाट पाहतेय.

●

केरबातात्या लिंबाच्या झाडाखाली बसून एकटक धुऱ्याकडे पाहत होता. वळभर अलीकडे असणारं लिंबाचं झाडं धुऱ्याच्या जवळ आलं होतं. नव्हे धुराच लिंबाच्या झाडाजवळ आला होता. एकाच बाजूने सतत इजा होत असल्याने बिचारा धुरा चळचळ कापायचा अन् पुन्हा धक्का लागू नाही म्हणून थोडा सरकायचा. असे करीतकरीत तो वळभर तात्याच्या शेतात सरकला होता. तात्याची प्रेमाची नजर त्यावर पडायची अन् तात्याच्या डोळ्यांच्या कडा आपोआप पाणावायच्या. खरंच बिचाऱ्याला वाचा असती तर तो काय बोलला असता? तात्याला विचार करताकरताच प्रश्न पडायचा. तात्याच्या नजरेने त्याला भूतकाळात नेले. तो आठवणीत गढून गेला. संभाने दोनदा आवाज दिला तरी त्याच्या आवाजाकडे तात्याचे लक्ष नव्हते न राहून संभा त्याच्याजवळ आला. धुऱ्याकडे एकटक पाहत बसलेल्या तात्याला म्हणाला,



'काय इचार करताय तात्या?'

तात्या एकदम दचकला. भानावर येत डोळे चोळत बोलला, 'काही नाही रे संबा. मला काही गमना झालं.'

'तात्या आलं मह्या लक्षात, दौलतरावनं धुरा फोडल्यानं तुमचं डोस्क बिघडलं खरंय नं'

'हो, गांडमनीचं लईच तरास देयालं ब्वा संबा.'

'जाऊ द्या तात्या. इतका नका इचार करू. घेऊनघेऊन किती वळभर रानं घेईल याच्यापेक्षा काय हाय. तुम्ही टेंशन घेतल्यानं उगं काही करता काही झालं तं.'

या शेवटच्या वाक्यानं तात्याच्या छातीत धस्स झालं. गडी तसा शरीरानं हाडकुळा, पण विचारानं हिंमतबाजच. अलीकडे वाढत जाणाऱ्या धुऱ्याच्या भांडणामुळे तो थोडा खंगत चालला होता.

काही म्हण, 'दौलतीला माज चढला संबा गरीबाला एवढंय छळू नाई रे. पाच वेळा माणसं बोलवले. गोटे रवले तरी धुऱ्याला सारखचं खिसतो म्हणजे.'

'जाऊ द्या तात्या माणसाच्या संग काय येणार हाय. सगळं

# धुऱ्याचा धाक




## माधव जाधव

mrjadhav1995@gmail.com


**"**दौलती त्या दिवसापासून मनाने बराच खचला होता. लोकांना पैसे मागावे का आता, असा प्रश्न त्याच्या मनात आला की, 'पुन्हा त्रास दिल्याची बातमी कळाली की उभं चिरतो,' हे वाक्य त्याच्या कानात घुमायचे अन् तो दचकायचा. शेतात गेला तरी धुऱ्याकडे तो पाहायचाही नाही. धुऱ्याकडे पाहिलं की त्याच्या अंगावर काटे यायचे.**"**

येथंच ठेऊन जायाचं हाय. काळ काय असाच थोडी राहाणार हाय. सकाळची इकडची सावलीतं सांजच्याला तिकडं जाते. काळ देईल उत्तर त्याला.' संभा तात्यासमोर खाली बसतबसत समजावत होता. तात्याच्या शेताचा दुसऱ्या बाजूचा शेजारीच होता तो. तात्याला त्याच्यासोबत कधीच धुऱ्याच्या भांडणाची वेळ आली नव्हती.

'पनीक मी काय मनतो संबा, गरीब झालो म्हणून किती सहन करायच रे या गधडीच्याचं. पिढ्यानं पिढ्या चालल्या की याच्यात आपल्या. काही तरी धडा शिकवावं लागंल ब्वा. नाही तर इकून मोकळं तरी व्हवावं लागंल' बोटानं माती उकरत तात्या अस्वस्थ होऊन बोलत होता.

'खरचं हे जमंल का तुमच्याच्यानं?' संभाचा प्रश्न

'ते व्हयनं मनूनतं याचं तागडं वाढायलं न संबा.'

'मग मी आधीच काय मनलो तुम्हाला, आपल्यानं काही व्हत नाही. जाऊ द्या माणसानं खाल्ल्यानं काही कमी पडत नाही. वरच्याची नजर आसावी फक्त. तेच दाखवते दाखला एखाद्या बार. आता हेच पाहानं, त्याचं पोरगंच किती उधळं निघालं. चार वर्सात दावील त्याला इंगा. मनतात नं आभळाकीचं धन कोणाला पचत नाही तसं हाय...' संभा अजून बरंच काही बोलणार होता. तात्या त्याला मध्येच थांबवत बोलला,

'त्याचं जाऊ दे; पण दौलतला धडा शिकवाव लागंल गड्या. पंचाचं ऐकीनं, कोणाचंच ऐकीनं म्हणजे लईच झालं.' बोलताबोलताच तात्याचा आवाज वाढत होता.

'जाऊ द्या, जाऊ द्या' म्हणत संभानं तात्याला हाताला धरून उठविलं. दोघं बोलत बोलत शेतातून घरी आले. विषय काही बदलला नव्हता अन् संपलाही नव्हता. संभा त्याच्या घरी गेला. तात्यानं घरी जाऊन हातापाय धुतले. धोतरानं तोंड पुसीत तो बैठकीत तक्तावर येऊन बसला.

नागेशनं ग्लासात पाणी आणून दिलं. त्याच्या हातातला ग्लास स्वत:च्या हातात घेत तात्या बोलला,

'आनिक फोडला ब्वा धुरा दौलत्याच्या टॅक्टरनं.'

नागूनं हातातला मोबाईल खिशात ठेवला. पँटीला हात पुसीत तो बोलला,

'कही आज आल्तं टॅक्टर?'

'हो.'

'तुमच्यादेखत आल्तं?'

'मह्यादेखत फोडल्यावर तं तेथचं हानला असता साल्याला. मी जायाच्या आधीच नांगरून झालं व्हतं मेंग्याचं' हाडकुळा असणाऱ्या तात्याचा, आवाज कणखरच होता.

'देवावं का पोलीस ठाण्यात तक्रार' – नागेश

'त्यानं काय व्हणार हाय?'

तात्याच्या चेहऱ्यावरची खिन्नता पाहून नागेशही अस्वस्थ झाला होता.

पाण्याचा ग्लास तात्यानं तोंडाला लावला. पहिल्याच घोटानं त्याला ठसका लागला.

'जरा हळहळू बाबा.'

खोकलणं थांबलं तसा तात्या पुन्हा त्याच विषयावर मुलाशी बोलू लागला. अंधार वाढत चालल्यानं बाहेरच्या खांबावरचे दिवे नेमकेच लागले होते. नागूनंही लाईटचं बटन दाबलं. तो बाजूला लोखंडी खुर्चीत बसला. दोघंही काही वेळ गप्पच.

तात्या भूतकाळात गेला होता. बापदाद्यापासून दौलती आणि त्याच्या वडिलाचा धुऱ्याला होणारा त्रास तात्याचा मनस्ताप सारखाच वाढवीत होता. सतत सांगून समजावून, पाव्हण्यारावळ्याला मध्ये टाकूनही तो ऐकत नव्हता. पंचासमोर तो

ऐकल्यासारखं करायचा. नंतर करायचं तेच करायचा. पंच तरी काय करतील. ज्याचा जोर जास्त तिकडं ते झुकायचे. तात्यालाच समजावत म्हणायचे, 'जाऊ द्या, जाऊ द्या'. म्हणून अलीकडे तात्यानं पंच बोलावणं सोडूनच दिलं होतं. दौलती धुरा खिसायचा अन् तात्यावरच नको ते आरोप करायचा. त्याची धुरा खिसण्याची पद्धती अनोखीच होती. मुसळधार पावसात सालगड्याला खोरं घेऊन शेतात पाठवायचा. धुरा खिसाय लावायचा. निघालेले गवताचे बेचाडं सरकून तात्याच्या शेताच्या बाजूला लावायचा. दोन दिवसांत बेचाडं जसेचा तसे हिरवेगार व्हायचे अन् धुरा जागा बदलायचा. हे सालोसाल चालू होते. आता मात्र तात्याने चांगलेच मनावर घेतले होते. दौलतीच्या आजच्या कृतीने तो अजून पेटून उठला होता. स्वभावाने आणि पैशानेही गरीब असणाऱ्या तात्याची अस्मिता जागी झाली होती. त्याचा सुपरइगो त्याला गप्प बसू देत नव्हता. रात्री जेवण करून तो कसाबसा झोपला. पण, झोप लागते कोठं बिचाऱ्याला. या अडंगावरून त्या अडंगावर होत त्याने रात्र काढली. दौलतीला टक्कर देण्यासाठी त्याने मनात अनेक शक्कल तयार केल्या; पण सकाळी उठला तो दौलतरावाच्या पायावर डोके ठेवण्याचा विचार करीतच. चहापाणी झाले अन् लगेच तो दौलतरावाच्या घरी गेला. दौलत तरी कोण, त्याचा चुलतभाऊच की. वयाने लहान असला तरी संपत्तीने श्रीमंत होता. गावात त्याचे बऱ्यापैकी वजन होते. काही लोकांशी देण्याघेण्याचे व्यवहारही होते.

दौलती बैठकीत एकटाच आहे, हे पाहून तात्या आत गेला. दौलतीचे डोळे आपोआप ताणले गेले. कपाळावर आठ्या आल्या. चेहऱ्यावर खोटे हसू आणित तात्याकडे पाहत तोंडातील सुपारी चघळीत खाकरत तो म्हणाला,

'येनं केरबादा.'

तात्या मुक्यानेच मान हलवत त्याच्याजवळ गेला, अन् हलक्या आवाजात बोलला,

'भाऊ, हे बस करनं आता. मी असं काय पाप केलं. काय घोडं मारलं तुव्हं म्हणून तू असा सारखा तरास देतूस.' बोलताना त्याच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या.

'काय झालं? काय झालं?' दौलतीनं विषय कळाला नसल्याचं सोंग घेत तात्याला विचारलं.

'तुला माहीत नाही व्हय!–'

'नाही–'

'आरे, त्या ट्रॅक्टरवाल्यानं व्हते नव्हते ते सगळेच बेचाडं काढले की धुऱ्याचे.'

'ते कहाला काढील केरबादा! हलगर्जीनं निघाले असतील एकदोन. त्याला काय मिळणार हाय तुहे बेचाडं काढून.'

'हे तुव्हं नेहमीच हाय भाऊ.' असं म्हणून तात्यानं त्याला हात जोडाय सुरुवात केली.

तात्याच्या या वाक्यानं तो भडकला. चढ्या आवाजात बोलला, 'तोंड सांभाळून बोल केरबादा. विनाकारण माझी बदनामी करू नको. रडायचं सोंग घेऊन माझ्या गळ्यात पाय टाकू नको. माझं पुढं जाणं खपनं झालं तुला. राहूनराहून माझी बदनामी करायला. फोडलातं नाही धुरा; पण आता सगळाच फोडतो. जाय तुला काय करायचं ते कर. निघ मह्या घराच्या बाहेर. पुन्हा उबंरवटा वलांडायचा नाही मह्या घराचा.'

दोघांचाही आवाज वाढल्यानं रस्त्यानं जाणारे चार जण गलबला ऐकून थांबलेले. ते मध्ये पडण्यापूर्वीच नागू तिथे आला. वडिलांचा हात धरून त्यानं तात्याला घराकडं नेलं.

'कशाला गेले बाबा दुश्मनाच्या घरी? अन्याय करणाऱ्याला कोठं न्याय देयाचं माहीत असते. जाऊ द्या राहिलं तेवढं राहिलं.'

महिना–दोन महिने असेच गेले. तात्या शेतात

गेला की, धुऱ्याकडं जायचा. डोळे भरून पाहायचा. धुऱ्याकडं पाहातच म्हणायचा, 'मी समजू शकतो तुही दशा... गेल्या अनेक वर्सापासून तुला इजा व्हतेय... तुझे साल्टं निघतात... हाडं उघडे पडतात... इजा व्हवू नये म्हणून तू सारखा सरकत आहेस...पण नक्की एक दिवस तुझा येईल...तुला कुणीही हात लावणार नाही...तू आमची इज्जत आहेस...बांध आहेस.' बोलताबोलताच तात्याला आव्हेरुनं आलं. डोळ्यांतले दोन अश्रू जमिनीवर पडले. त्या दिवसापासून दौलतरावला धडा शिकवायचा ठाम निर्णय त्यानं केला 'साप तर मेला पाहिजे, पण काठी मोडता कामा नये,' याप्रमाणे त्याने नामी युक्ती सोचली. मनाचा पक्का निर्धार केला. ही युक्ती नागेशशिवाय कोणालाच सांगायची नाही, असे ठरवून तो कामाला लागला.

तात्याने दौलतीला प्रचंड गोड बोलायला सुरुवात केली. आपल्याला त्रास झाला हे विसरल्याचे त्याने सोंग घेतले. दौलतीच्या वडिलांचे म्हणजे तात्याच्या काकांचे श्राद्ध होते. दौलतरावाने गावजेवण देण्याचा मानस केला होता. तात्याने या कार्यक्रमाच्या निमित्ताने पुढाकार घेतला. आठ दिवस तो सतत राबत होता. दौलतीने सांगितलेले कोणतेही काम तो मन लावून करायचा. तात्याची ही भूमिका दौलतीला प्रचंड भावली होती. केरबादा म्हणणारा दौलती आता तात्याला दादा, दादा म्हणाय लागला होता. मोठ्या असणाऱ्या चुलतभावाला मान द्यायला लागला होता. लोकांना कोठे बरे दिसते. लोक म्हणायचे,

'तूही सगळी जमीन गिळायला दौलत, तरी तू त्याच्याच गोडीनं काऊन हागायला केरबादा.'

तात्या निमूटपणे ऐकून घ्यायचा अन् सहज म्हणायचा, 'शेवटी काहीही झालं त मव्हा, भाऊच व्हयनं ब्वा. खाऊनखाऊन कोण खायलं भाऊच की.'

तात्याच्या अशा बोलण्यानं जवळचे सगळे मित्र त्याचे शत्रू झाले होते. तात्याच्या मनात चाललेला कालवा त्यांना काहीच माहीत नव्हता. तात्या एवढा बदलला कसा, याचेच नवल गावातल्या प्रत्येकाला वाटत होते.

'भोळसट हाय येड्या गांडीचं, नुसतं भियालं.'

'भीत नाही तसं बेरकी हाय.'

'कहाचं बेरकी! माझ्यासारखं व्हयतं नादीच लागायचं नाही, अन् तोंडय पाह्याचं नाही अशा लुचाटाचं.'

'खूप सहन केलं त्यानं. त्याची ताकतच नाही. काय करील?'

'मंग असं करावं की-'

केरबातात्याच्या जवळचे लोक आपसात असं काही बोलत होते. त्यांच्या दृष्टीने तात्या वेडा ठरला होता. त्याची हिंमत खचली असेच त्यांना वाटत होते.

श्राद्धाचा कार्यक्रम जोरात पार पडला. सगळ्या गावाला, पाव्हण्याला दौलती-केरबाच्या साथ-संगतीचा संदेश गेला. पाव्हण्यातील एखादा म्हणायचा,

'बरं झालं बापा, दोघाचं चांगलं जमायलं. नाहीतर सारखा वाद-वाद.'

श्राद्ध होऊन आठेक दिवस झाले असतील. लगनसराईचे दिवस असल्याने दौलती आणि केरबा एकाच मोटारसायकलवर शेजारच्या गावी लग्नाला गेले होते. लग्न लावून तालुक्याला गेले अन् परत यायला अंधार पडायची वेळ झाली. तालुक्यावरून गाव तसं चारच किलोमिटर. पण, रस्ता खराब असल्याने गाडी हळू होती. अर्ध्या रस्त्यात आले असतील. अचानक गाडीसमोर दोन लुंगीधारी तरुण आले. दोघांनी दोन्हीकडून हँडल पक्के धरले. त्यांनी डोक्यासहित तोंडाला पक्की काळी पट्टी बांधली होती. त्यामुळे ओळख पटण्याचा प्रश्नच नव्हता.

दौलतीने गाडीचा ब्रेक कचकून दाबला, तसा तात्या त्याच्या पाठीला टेकला. दौलतीच्या तोंडून पटकन शब्द बाहेर पडले,

'अरे बापरे! काय झालं?'– तात्यानं विचारलं

'चोयऽऽ चोयऽऽ' दौलतीची बोबडी वळली. हात–पाय थरथर कापाय लागले. गाडी स्टँडला लावेपर्यंत तात्या कसाबसा उतरला. पोरांनी अंधारात पहिल्यांदा दौलतीची ओळख पटविली. लगेच एकाने त्याची कॉलर पकडून बाजूला घेतले. तो कॉलर पक्की धरून उभा राहिला अन् दुसऱ्याने बदडाय सुरुवात केली. बदडणारा त्याचे पाय, पोटरी, मांडी, ढुंगन, पाठ यावर फोकाने झपके देत होता अन् कॉलर धरणारा आवाज बदलत घोगऱ्या आवाजात एकेका फोकासंगे म्हणायचा, 'करतू का व्याजबट्टा! लुबाडतू का गरिबाला! देतू का तरास शेजाऱ्यापाजाऱ्याला! सगळे धंदे बंद झाले पाहिजे. आम्ही कोणी चोर नाहीत. धडा शिकविणारे आहोत. पुन्हा आमच्या कानावर तुझ्याबद्दल तक्रार आली तर बघ उभा चिरतो.'

दौलती 'नाही भाऊ नाही भाऊ' म्हणत विव्हळत होता. माराने तो पुरता सुजला होता. सगळीकडे वळ उठले होते.

त्याला सोडून पोरांनी आपला मोर्चा तात्याकडं वळवला. तात्या अंधारात गुमान बाजूला बसला होता. एक जणाने हलक्याने त्याची कॉलर पकडली अन् दुसऱ्याने पहिला फोक माराय सुरुवात केली. अर्थात फोकाचा आवाज कमी बोलण्याचाच मोठा होता.

पहिल्याच फोकात तात्याने मोठमोठ्याने ओरडाय सुरुवात केली 'मायो, बापूयो मेलो रे.' अर्थात हे नियोजनबद्धच होते.

'हाडकुळ्या एका रट्ट्याचा नाहीस. थापडात जायबंद करील. कहाला भेटला याला. याद राख वाचा उखळली तर? तात्याला दोन–तीन फोक मारेपर्यंत शेजारच्या शेतातले काम करणारे दोन शेतकरी आवाजाचा शोध घेत आरडत येत असल्याचे पोट्ट्यांना कळाले. पोट्टे लगेच पसार झाले.

दौलती आडवा पडला होता, तर तात्या बाजूलाच बसून मोठमोठ्यानं ओरडत होता. आलेल्या एका शेतकऱ्याने खिशातला मोबाईल काढला. त्याची बॅटरी लावली. उजेडात पाहतात तर दौलतराव अन् तात्या विव्हळत असल्याचे त्यांना दिसले. लगेच दौलतरावच्या घरी एकाने फोन लावला. घरच्यांच्या मनात धस्स झाले. दौलतच्या मुलाने नागेश अन् शेजारच्या दोन माणसांना सोबत घेतले. तीन मोटारसायकलवर ते घटनास्थळी पोहोचले. दौलतीची अवस्था पाहून मुलगा भांबावून गेला. एरव्ही बापाला पैसे मागताना शिव्या देणारा तो; पण आज बापाची गत पाहून त्याचे डोळे पाणावले. 'कुठे लागले पप्पा' म्हणत त्याने दौलतीच्या हातात हात दिला. इकडे नागेश आपल्या वडिलांना बोलत होता.

दोघांनाही गाडीवर बसविले. दवाखान्यात नेले. दौलतीला चांगलाच मुका मार होता. डॉक्टर त्याला तपासत म्हणाले,

'कसे झाले हे? कुणी मारले? दंगा झाला का?'

'तसे काही नाही. गावाकडे गाडीवर येत होते. रस्त्यात अडवून मारले? – दौलतीचा मुलगा बोलला.

'गावात काही दुश्मनी आहे का?' – डॉक्टर

'नाही.'

'तुम्हाला कसे कळले?'

शेजारच्या शेतकऱ्याकडे बोट दाखवीत नागेश बोलला, 'ह्या काकांनी फोन केला दादाच्या घरी.'

'तुम्हाला कसे कळले?' शेतकऱ्याकडे पाहत डॉक्टरांचा प्रश्न.

'यांच्या मोठ्यानं होणाऱ्या आरडाओरड्यानं. आम्ही अंधारात धावत गेलो, तोपर्यंत मारणारे पसार झाले.'

'पैसाआडका होता का?' दौलतीला डॉक्टरांचा प्रश्न.

'पैसे होते थोडेफार, पण त्यानी हातय लावला नाही.'

'अजबच चोर व्हते म्हणा की?'

डॉक्टर पुढे बोलणार होते; पण मध्येच एका शेतकऱ्याने त्यांना थांबवले अन् म्हणाला.

'देता का त्रास गरिबाला, लुटता का, असे वाक्य आमच्या कानावर आले.'

डॉक्टरांना जे समजायचे ते समजले. बाकी सर्व शांतच औषधी, गोळ्या देऊन डॉक्टरांनी दोघांनाही घराकडे नेण्यास सांगितले. दोघानांही घरी आणले. दौलतीचे पाय पाठ सुजले होते. त्याच्या पायांवर, पाठीवर हिरवेगार वळ दिसत होते. केरबातात्याच्या पाठीवर दोन वळ उठले होते.

दौलतीच्या पाठीवर मलम लावून त्याला गरम पाण्याने शेकत त्याचा मुलगा आणि बायको विचार करीत होते. 'कोणी आखला असेल हा कार्यक्रम, याचा छडा लावला पाहिजे.' दोघे एकमेकांना म्हणत होते. 'आपण म्हणत होतो यांना, एकदा तरी अद्दल घडल्याशिवाय तुम्ही वाटंवर येणार नाहीत. अभाळकीचं धन पचत नसते. यांना भलती पैशाची हाव, कहाला देणंघेणं करता. काय कमी हाय आपल्याला. जीव गेला असता तर. आता तरी सोडून द्या'

दुसऱ्या दिवसापासून गावात या प्रकरणाची सारखीच चर्चा सुरू झाली. दौलतीनं ज्यांना व्याजानं पैसे दिले होते ते आतून सुखावले होते अन् केरबातात्याचा डाव फत्ते झाल्याने तो तर भलताच आनंदला होता. दौलतीशी मुद्दाम दोस्ती करणाऱ्या अन् बंधुप्रेमाचा आव आणणाऱ्या तात्याला त्याच्यामुळे दोन चार धप्पू मुद्दाम खावे लागले होते. धप्पू कमी अन् आवाज जास्त काढणाऱ्या हडकुळ्या तात्याचीच त्यामुळे ही युक्ती असेल असे कोण म्हणणार!

दौलती त्या दिवसापासून मनाने बराच खचला होता. लोकांना पैसे मागावे का आता, असा प्रश्न त्याच्या मनात आला की, 'पुन्हा त्रास दिल्याची बातमी कळाली की उभं चिरतो,' हे वाक्य त्याच्या कानात घुमायचे अन् तो दचकायचा. शेतात गेला तरी धुऱ्याकडे तो पाहायचाही नाही. धुऱ्याकडे पाहिलं की त्याच्या अंगावर काटे यायचे.

तात्याला या प्रकरणावर लोक बोलायचे. तो अतिशय घाबरा चेहरा करून म्हणायचा, 'वाचलो तेच खूप झाले बाबा. मरायचीच येळ व्हती त्या दिवशी. सुन्या जागी लागलं असतं त. मरायला काय लागते. वरच्याचीच नजर मनावं. जाऊ द्या नावसुद्धा काढू नका आता.' अन् आतून भलता सुखावायचा. मनाशीच म्हणायचा,

'किती सोपी हाय युक्ती. युक्ती लढवायला कोठं गरिबी-श्रीमंती लागते! ती तर डोस्क्यातून जल्मते अन् डोस्कं त ईश्वरानं सगळ्यायलाचं सारखं दिलं'.

●

**आगामी अंकात**

जागेअभावी या अंकात समाविष्ट करता न आलेली भाषा सिंग यांची प्रवीण घोडेस्वार यांनी अनुवादित केलेली मुलाखत येत्या अंकात प्रसिद्ध होईल याची कृपया नोंद घ्यावी.

**संपादक**

**पवन भगत... (पृष्ठ क्र. ११ वरून)**

विषारी प्रचार सुरू केला. सुरमा लावलेली ही दाढीधारी माणसं 'दहशतगर्द' आहेत. हे तबलीगी लोक देशातल्या लोकांना कोरोना पसरवून संपवणार आहेत. हे दाढीधारी लोक जिथं कुठं दिसतील तिथं त्यांना ठेचून काढा, असं आवाहन काही धार्मिक पक्षांचे नेते करत होते. सत्ता राबवणारे महामारी रोखण्यात येणारं स्वत:चं अपयश मुसलमानांवर ढकलत होते. परिणाम म्हणून हायवेच्या काळ्या डांबरी रोडलाही धर्माचे रंग चढायला सुरूवात झाली. कितीतरी मुसलमान मजुरांना मार बसत होता. भुकेनं जर्जर झालेले, पायी प्रवास करणारे मुसलमान मजूर टारगेट झाले होते; ते भयभीत झाले होते. त्या कष्टकरी मजुरांना 'मरकज' ही काय भानगड आहे हेही माहिती नव्हतं. भाकरीसाठी आपलं घर सोडणाऱ्या त्यांना फक्त आपलं पोट माहिती होतं. छोटी-मोठी कामं करून पोटाची खळगी भरण्यासाठी आपलं गाव सोडणाऱ्या त्या मजुरांना फक्त त्यांची कारागिरी आणि त्यात माहिर कसं व्हायचं एवढंच माहिती होतं. मुसलमान मजुरांना अलगद वेचून ठोकण्यात येत होतं. ते सगळे दहशतीत आले होते.

अशा वेळेला आपल्या आरिफभाईच कसं होईल याची चिंता रामस्वरूप आणि पंडितजींना वाटू लागली. ते मुख्य रस्ता सोडून दुसऱ्या रस्त्यानं जायचा विचार करू लागले. रस्ते सगळे सारखेच असतात, तरीही दुसऱ्या रस्त्यावर हल्ला होणार नाही याचीही काही खात्री नव्हती. 'आरिफच्या केसालाही धक्का लागू देणार नाही. आपण सगळेच आरिफ आहोत, आपण फक्त मजूर आहोत' - असं सगळा तांडा म्हणू लागला होता. आरिफला वाचवण्यासाठी वेगवेगळ्या उपाय योजना आखण्यात येत होत्या. सोबतचे छत्तीसगडचे आदिवासी आरिफला आपल्या घोळक्यात घेऊन चालत होते.

एकदा अशाच एका मारहाणीच्या घटनेनंतर पंडित मिश्राजी आरिफभाईला रस्त्याच्या कडेला घेऊन गेले आणि त्याला धीर देऊ लागले. आरिफ घाबरून गेला होता. त्याला काहीच कळत नव्हतं. तो दहशतीत होता. 'आता आपण कधीच घरी जाणार नाही का? आपली अम्मी.. अब्बाजान भाई, आपा अशा सगळ्यांना आता आपण दिसणार नाही का? आपला काही दोष नसतानाही आपल्याला हे लोक का मारतायत? आपण मुसलमान आहोत हाच गुन्हा आहे का?, मैं तो मरकजमें नही था, फिर मुझे क्यों तकलीफ दि जा रही हैं?...' असे अनेक विचार त्याच्या भोवती पिंगा घालू लागले. या आधी कधीच आरिफला त्याच्या मुसलमान असल्याची इतकी प्रखर जाणीव झाली नव्हती. त्याला कधीच इतकं 'अलग' वाटलं नव्हतं, त्याला काहीच कळत नव्हतं.

पंडितजींचा अपमान झाला होता. त्यांच्याशी भेदभाव करण्यात आला होता, दुरूनच पाणी दिलं होतं, त्यांनी त्या गावात दुकानातून काही सामान घेतलं होतं. त्यात पंडितजींनी एक रेझर पत्ता घेतला होता. तो त्यांनी झोळीतून बाहेर काढला आणि क्षणभरही विचार न करता पंडितजींनी आरिफचं डोकं हातात घेतलं. ते रेझर आरिफच्या गालावर चराचर फिरवून टाकलं. आरिफची संपूर्ण दाढी पंडितजींनी आपल्या हातांनी सफाचट केली. आपल्या जवळची भगवी झोळी आरिफच्या खांद्यावर दिली आणि आरिफला जोरात आलिंगन देऊन त्याचा हात घट्ट पकडला. तेव्हा बाकी काफिला इंदौर पार करून पुढे निघाला होता.

●

**ते पन्नास दिवस** (कादंबरी) ले. पवन भगत, मैत्री पब्लिकेशन, पुणे, मूल्य ३०० रु.

# शरद बिल्लौरे यांच्या ८ कविता



## ठरलं तर हेच होतं

सगळ्यात आधी डावा हात कापला
मग दोन्ही पाय रक्तबंबाळ करत
तुकड्यांत कापले गेले
रक्त वेदनेचे धक्के खात खात
नसांमधून बाहेर आलं होतं
ठरलं तर हेच होतं की मी
कबुतराच्या वजनाएवढं
आपल्या शरीरातलं मांस कापून
ससाण्याला द्यायचं
आणि तो कबुतराला सोडेल
खरंच खूप असहनीय वेदना होती
शरीरातला एक मोठा हिस्सा तराजूत होता
आणि कबुतर असलेलं तराजूचं पारडं खाली होतं
पराभूत होऊन मी
पूर्णच तराजूवर चढलो
आकाशातून फुलांचा वर्षाव नाही झाला
कबुतराने कोणतंही दुसरं रूप घेतलं नाही
आणि मी पाहिलं
ससाण्याच्या दाढेला
माणसाचं रक्त लागलेलं आहे

## तू मला उगवू तर दे

अखेर कधीपर्यंत शोधत राहू
शक्यता अंकुरण्याची
आणि अखेर कधीपर्यंत
माझी पृथ्वी
तू तुझा ओलावा पुरत राहशील,
कधीपर्यंत पाहत राहशील
गव्हाच्या दाण्यांची वाट
मी जंगली गवत का असेना

*(जन्म : १९५५ मृत्यू : १९८०) १९७५–७६मध्ये हिंदी साहित्यात एम. ए. ही पदवी घेतली. क्षयरोग झाल्यामुळे भोपाळच्या टी. बी. इस्पितळात उपचार घेण्यासाठी ॲडमिट होते. शिक्षक आणि क्लार्क म्हणून अनेक नोकऱ्या केल्या. १९७९ साली अरुणाचल प्रदेशमध्ये अध्यापकाची नोकरी करण्यासाठी गेले आणि तिथून आपल्या गावी परतत असताना गरम वाऱ्याच्या झळा (लू) लागल्यामुळे ३ मे १९८० रोजी कटनी इस्पितळात भरती केले गेले आणि तिथेच त्यांचा मृत्यू झाला. त्यांचा एकमेव कवितासंग्रह 'तय तो यही हुआ था' त्यांच्या मृत्यूनंतर राजेश जोशी यांनी पुढाकार घेऊन काढला. त्यांच्या सुरुवातीच्या काळात लिहिलेल्या कवितांत गावातील जीवनाविषयीचे अनुभव आले आहेत. तसेच लोककथा, ग्रामजीवनातील श्रद्धा यांकडे पाहण्याची एक समंजस दृष्टी दिसून येते. या कवीच्या कविता हळूहळू प्रगल्भ होत जाण्याची भरपूर शक्यता सुरुवातीच्या कवितांतच दिसते, असे राजेश जोशी यांनी म्हटले आहे.*

अनु.
विकास पालवे
vikas_palve@rediffmail.com

तुझ्या ओलाव्याला
सगळ्यात आधी मीच तर स्पर्श केलाय
माझ्या मुळांची वळवळ
तुझ्या आत तुला जाणवली नाही का
मला उगव माझी पृथ्वी
मी उगवून
कोपऱ्यान्‌कोपऱ्यात पसरू इच्छितो
तू मला उगवू तर दे
मी
तुझ्या गव्हाच्या दाण्यांसाठी
कदाचित चांगलं
खत होऊ शकतो

## तेव्हा एक कविता लिहिली गेली असेल

तेव्हा
रात्रीच्या देवतेने कूस बदलली असेल
आणि आकाशात
एकत्र खिंकाळले असतील
चांदीचे घोडे
तेव्हा
एक बैल शरीर झटकून उभा राहिला असेल
आणि एकाने
फक्त हवेला हुंगूनच
मान खाली केली असेल
तेव्हा
एका चुलीतून धूर निघाला असेल
आणि एका लाकडाने
तोंडाला जखम होऊ न देता चाखली असेल
लोखंडाची तुरट चव
तेव्हा
एक बी जमिनीत खूप आतवर गेलं असेल
आणि एक स्वप्न अंकुरलं असेल
निद्रेच्या अगदी बाहेर
तेव्हा
एका माणसाने आकाशाच्या दिशेने पाहिलं असेल
आणि एक स्त्री
जमिनीत लपवून आली असेल
आपल्या केसांतली घाण
तेव्हा
एक कविता लिहिली गेली असेल
एक कावळा उडाला असेल
आणि एका गायीच्या पोकळ दाढेत
भरला असेल
कोवळ्या चाऱ्याचा रस

## आणि मी सिगरेट ओढतो

ही कविता कोणत्यातरी तारखेला लिहिली गेली होती, पण आज अचानक खूप महत्त्वपूर्ण झालीय. १८ महिन्यांच्या दीर्घ उपचारांनंतर आज मेडिकल फिटनेसचा रिपोर्ट आलाय, मी पूर्णपणे ठीक असल्याचं म्हटलं आहे, आता तर टीबीच्या आजाराची जाणीवही कधी तरी (कॉलेजच्या सुरुवातीच्या दिवसांत) पूर्ण भावनाकुल होत केलेल्या (अयशस्वी) प्रेमाच्या जाणीवेसारखी वाटू लागते, जी कधी कधी काही खाजगी क्षणांत आतवर, खूप आतवर सलत राहते आणि पुन्हा आजारी व्हावंसं वाटतं आणि मी सिगरेट ओढतो... (डायरी)

तो टीबीचा रुग्ण
रात्री साडे अकरा वाजता
टीबी हॉस्पिटलच्या समोरून
सिगरेट ओढत जातो
इस्पितळाच्या इतक्या मोठ्या व्हरांड्यात
एकट्याच पेटलेल्या
चाळीस वॉल्टच्या बल्बला पाहत
हसतो
खोकता खोकता

रस्त्यातच थकून जातो
आणि घरी पोहचून
एक ग्लास पाण्याबरोबर
एक गोळी खाऊन झोपी जातो
सिगरेट
रात्रभर
त्याच्या पोकळ छातीत
निरंतर जळत राहते
सकाळी
तो पुन्हा सिगरेट ओढतो
खोकतो
गोळी खातो
त्याला हे सगळं
प्रेम करत असल्यासारखं वाटतं.

## नदी

मी खूप घाबरलो होतो नदीच्या मौनामुळे
नदीला इतकं गप्प
आधी कधीच नाही पाहिलं
दगड फेकल्यानंतरही
कोणतीच प्रतिक्रिया नाही उमटली
आईने कालपासून काहीच नाही खाल्लंय
मी म्हाताऱ्या मच्छिमाराला विचारतो
काका
काही उपाय आहे का
नदीची नि:शब्दता दूर करण्यासाठी
म्हातारा म्हणतो
मुला नदीचं मौन खूप खतरनाक असतं
गावंची गावं गिळून टाकतं तिचं मौन
ते तोडण्यासाठी
यज्ञ करावा लागतो
नरबळी द्यावा लागतो
मी रात्री स्वप्नात पाहतो
माझ्या कपाळावर कुंकवाचा टिळा लावलाय
आणि आईच्या थाळीत
भाकरी ठेवलीय

## प्रवास : एक

आपण परदेशाच्या प्रवासाला निघतो
फिरण्यासाठी नाही
नोकरी करण्यासाठी
आपण निघतो
आपल्या शहरातून बाहेर
आणि
कोणाच्यातरी पूर्ण आयुष्यातून बाहेर निघून जातो
एकदम जिवंत
रेल्वेत बसून आपण
प्रवासाशी संबंधित बाबी सोडून
उरलेल्या सगळ्या बाबींविषयी विचार करतो
उद्या
जेव्हा आपल्याला आपल्या शहरात नोकरी मिळेल
आपण परतू
सुट्ट्या घालवण्यासाठी नाही
शहरात कायमचं कायमचं वसण्यासाठी
तेव्हा
आपण त्या जगात
तेवढेच जिवंत परतू शकू का
जिथून एक दिवशी आपण
परदेशाच्या प्रवासाला निघालो होतो
नोकरी करण्यासाठीही
आणि आपल्या शहरात
कायमचं कायमचं परतून येण्यासाठीही

## प्रवास : तीन

निरोपाच्या वेळी
सगळे आले सोडायला
दरवाजापर्यंत आई
मोटारीपर्यंत भाऊ
स्टेशनावर मोठी गाडी पकडेपर्यंत
मित्र
शहर आलं शेवटपर्यंत सोबत
आणि परतून गेलं नाही

## प्रवास : सहा

रेल्वेत चढताना
आपल्या सामानाच्या बाबतीत आपण
तेवढेच सतर्क असतो
जेवढे
बसमध्ये चढताना
खिडकीच्या शेजारच्या सीटबाबत.
जेवढे
निरोपाच्या वेळी
हात हलवण्याबाबत.
जेवढे आपण
प्रवास संपवल्यानंतर
सतर्क होतो.
स्वप्नांच्या त्या जगाविषयी
आपण कधीच सतर्क नसतो
जिथे आपल्याला
भविष्यातील भीतीविषयी सतर्क करत
घेऊन जातात
रेल्वेगाड्या
बसगाड्या
आणि मित्रसंबंध.

## पहिल्यांदा

क्रूरतेने जेव्हा पहिल्यांदा
हात उगारला होता निरागसतेवर
तेव्हा मुलं उपाशीच झोपी गेली होती

ज्या रात्री पहिल्यांदा
महामूर्ख राजाने मुकुट चढविला
तेव्हा विकली गेली स्त्रीची लाज,
शेतकऱ्याची मेहनत,
दुबळ्या माणसाचा स्वाभिमान,
धर्माची नैतिकता,
विद्वानांची नम्रता,
सत्तेची शरम,
प्रेमिकांचे प्रेम,
आणि दुकानातले पाणी

अगदी त्याच वेळी
या सगळ्याच्या विरुद्ध
बोलायला हवे होते मी
पण मी बोललो नाही त्यावेळी
कारण ही माझी सवयच होऊन गेली होती

आता मात्र मी
पुन्हा पुन्हा बोलतोय खरा
पण माझा आवाज बिलकुल ऐकू येत नाहीये
मला स्वतःलाच

आणि आता जीवनभर बोलूनही
चुकवली जाऊ शकणार नाहीये
पहिल्यांदा न बोलण्याची किंमत


मूळ हिंदी कविता
**हुबनाथ**
मुंबई
मराठी अनुवाद
**रमेश नागेश सावंत**
मुंबई

## सिंहासन मात्र जागंचय

मी झोपलेय
तू, झोपलीयस
ते त्या ती आपण सर्व झोपलोय
सिंहासन मात्र जागंचय
रात्रंदिवस...सिंहासन काम करतंय
येरझाऱ्या घालतंय
खलबतं-चर्चा..खूप काम खूप काम
सिंहासनाकडे घड्याळ नाही
खूप हात लांब न पाय पण लांबच
सिंहासनाला कान नाही
पण तरी सगळं ऐकू येतं
ऐकलच नाही असं पण भासवता येतं
सिंहासन सगळीकडे जाऊ शकतं
देवासारखंच ते सर्वत्र सारखंच कठोर आहे
आपल्याला झोप प्रिय आहे
आपल्याला नोकरी प्रिय आहे
आपापली व दुसऱ्याची बायको पण प्रिय
आपण शांतताप्रिय आहोत
आपण फोन रेडिओ टीव्हीवर बातम्या
ऐकत ऐकत झोपतो
सिंहासन मात्र दक्ष आहे
सिंहासन एकमात्र लक्ष आहे...
आपण झोपत झोपत स्वप्न पाहू
की लोकशाही वगैरे जिवंत आहे
न आपणही
जेव्हा की खलबतं शिजत असतील
कुणाकुणाला उडवायचं
सिंहासन हसतं मिशीत
गालातल्या गालात
आपण झोपेत हसू
आपल्या पांढऱ्या कपाळाच्या नशिबावर
लोकशाहीवर...
♦♦

**मलिका अमर शेख**
मुंबई

## वासरातली गाय


लंगडी गाय
भटकतेय रानोमाळ एकटीच
गळ्यातले लोढणे सांभाळीत
सांगावेत चारदोन समजुतीचे शब्द तर
वासरांचा कळप कुठे उधळलाय
तिला ठाऊक नाही आणि
सांगतही नाही कुणी.

आजकाल तिला चिंता सतावत राहते
रात्रंदिन

न जाणो एखाद्या वासराला
लळा लागायचा कुणा दाढीधारी टोपीवाल्या
मुसलमानाचा
मुक्या जनावराला लळा लावला म्हणून
गळा कापला जायचा जमावाकडून बिचाऱ्याचा

त्याची हंबरणारी पोरं धाय मोकलून रडणारी बायको
आणि
दुःखानं गोठून गेलेल्या म्हातारा-म्हातारीचं चित्रं
लंगड्या गाईच्या डोळ्यासमोर तरळतं
लंगडी गाय लोढणे ओढत
जिवाच्या आकांतानं वासराचा कळप
शोधत धावत राहते रानोमाळ
♦♦

**विजय चोरमारे**
मुंबई



## वासरातली गाय

काही माणसं
सोन्याचा चमचा तोंडात घेऊन येतात जन्माला जसे
काही गेंड्याची कातडी घेऊन येतात
काही वरून पांघरून घेतात
गेंड्याच्या कातडीची केली खोळ की
सारेच खपवता येते राजरोज
बेदरकार निब्बर असंवेदना
राठ मज्जेचे बेलगाम जाळे
चेतनेचे सारेच रज्जू केले बधीर की
पोहोचतच नाही कोणतेही संदेश मेंदूपर्यंत
ज्ञानाचे कुठलेच केंद्र रुजत नाही आत

खोळ आणि खळ यात असतो बेसिक फरक
खळ अनादी पुटांचे वारूळ
इतिहास संस्कृतीचा वसा घेऊन
अस्तित्वाचे रंगरूप अदृश्य करते
खरा चेहरा दिसूच देत नाही

खोळ सोयीची
हवी तेव्हा घेता येते पांघरून
लबाड
लाचार
धूर्त
कावेबाज
दगाही देता येतो बेमालूम सगळ्यांना

गेंड्याच्या जगात राहून
कातडीचा बचाव कठीणच
मी पांघरली नाही कोणतीच खोळ
नग्नपणे झेलत आले वार
पाठीवर
पोटावर
वक्षावरही
पावलागणिक पसरलेल्या तीक्ष्ण सुयांवर
चालत आले रक्तबंबाळ अनवाणी
चामडी बुटा खाली फुलपाखरू चिरडण्याची
रीत मान्य नाही मला

देहभोग
दुखणं-खुपणं
पडणं-झडणं
सारेच मान्य आहेत मला
नव्या युगाच्या प्रसवासाठी

त्वचेची सारीच रंध्रे ठेवते मी
पारदर्शी
सर्वस्पर्शी
कवितेची कुसही ठेवते निरामय
होऊ देत नाही कोणतीच लागण
माणूसपणाचा उच्चार साठवून ठेवते
कानामनाच्या ध्वनीलहरीत

सुकोमल त्वचेच्या साऱ्याच संवेदना जपते मी
अनंत आले राठ क्षण तरी
गेंड्याची कातडी घेऊन जन्माला आले नाही मी
माझ्या आत आत
धडधडत आहे छोटसं हृदय
अन्
ओठांना प्रतीक्षा आहे
तुझ्या तरल ओठांची
♦♦

**पद्मरेखा धनकर**
चंद्रपूर

## भाषेच्या हमरस्त्यावरून

कधीकाळी भाषेच्या
हमरस्त्यावरून येणारे शब्द
गायब होऊन जातात अचानक.

शब्द कधी बेदखल होत
निरुपयोगी ठरतात
कधी ओरबाडले जातात
त्यांचे संदर्भ
तर कधी बदलले जातात
त्यांचे अर्थ.

शब्द हरवून जातात
संस्कृतीच्या अरण्यात.
काही भूमिगत होतात
त्यांच्यावरील निरर्थक आरोपांमुळे.
शब्द वणवणत राहतात
युगानुयुगे अज्ञातवासात
त्यांच्यावरील राजद्रोहाचा आरोप
रद्दबातल होईपर्यंत
किंवा विद्रोहाची ठिणगी पेटेपर्यंत.

शब्द दुखावले जातात
जखमी होतात,
मारले जातात वेचून वेचून.
सत्ता संघर्षाच्या ओढताणीत
होत राहतात बेइज्जत;
आत्महत्या करतात
मागे चिठ्ठी न ठेवता.

शब्द पेलू पाहत असतात
कालपटाचे विस्तीर्ण अवकाश,
मानवी उत्क्रांतीच्या प्रवासाचे
ते असतात मैलाचे दगड.
भूत भविष्याची
ते दाखवू शकतात दिशा
सांगू शकतात शोषितांच्या दशा.
उघड करू शकतात
किती रहस्ये शोषकांची
देऊ शकतात
इतिहासाची अचूक बातमी.

म्हणून तर..
कधी गायब होतात
कित्येक शब्द
भाषेच्या हमरस्त्यावरून
लागतही नाही पत्ता.
आपण चुकचुकत राहतो
आजपर्यंत किती
मरून गेल्यात भाषा.
♦♦

**राजश्री देशपांडे**
सातारा

## चक्रवर्ती विमान

चक्रवर्ती विमान
अद्भूत शब्दांच्या चकव्या जंगलात
अकल्पित कोसळल्यानंतर
स्फोटक आवाजाने हादरलेला
मानवी भूप्रदेश

विमानाचे विखुरलेले अवशेष शोधून
मरणोन्मुख वैमानिकाला
स्थानिक अपरिचित भाषालोकांनी
तोंडावाटे दिलेला श्वास
मानवजातीला पुनरुज्जीवित करणारा
♦♦

**अरुणचंद्र गवळी**
पुणे

## अलविदा

तू वस्त्रहीन आलास,
तू वस्त्रहीन जाशील
तुझं अस्तित्व अवलंबित्वातून फुललं
अवलंबित्वातच तुझा अंत आहे
तू भौतिक संस्कृतीशिवाय अवतरलास,
पैसे आणि वस्तूंशिवाय आलास आणि ते न घेताच
निघून जाणार आहेस!

तुझी पहिली आंघोळ कोणा एकाने घातली;
तुझी शेवटची आंघोळ कोण एक घालेल
हे जीवनाचे संतुलित सार आहे,

येताना अंगी द्वेष, मत्सर, राग आणि स्वार्थ नसतो;
तर, निरागस हास्य, निर्मळ सृजनतेची चमक, प्रसन्न,
नैसर्गिक, चिरंतन सुखद क्षणांचा समुच्चय असतो

जाते वेळी अनैसर्गिक, विपर्यास, विकृतीने भारीत वेदनादायी मनोवस्थेत मरणासन्न शय्येवर पहुडायचं, की प्रसन्न चित्तावस्थेत निरव शांतता अनुभवत अलविदा म्हणायचं, याचा निवाडा सूज्ञपणे जागेपणीच करावा लागतो!

♦♦

**स्वाती**
**राजन**
पुणे

## काय द्यावं नाव?

ठाऊक असेल पाण्याला त्याचं रासायनिक नाव?
दोन हायड्रोजनचा ऑक्सिजनशी होणारा प्रेम त्रिकोण?
घोकला असेल सफरचंदानं गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत?
चुंबकांच्या उत्तर-दक्षिण टोकांनीच व्हावं आकर्षित
हा नियम शिकवला गेला असेल त्यांना जन्मत:च?
इलेक्ट्रॉनने असावं ऋण,
प्रोटॉनने धन
न्युट्रॉननं भार रहीत होताना
येत असेल त्यांच्यात दुभंगलेपण?
होणारी झीज पाहून
द्रवत असेल घर्षणाचं मन?
येत असेल काटकोन त्रिकोणाच्या स्वप्नात पायथागोरस?
परावर्तित होणाऱ्या प्रकाशाबद्दल
काय असेल आरशाच्या अंतर्मनात?
माहीत असेल स्थितीज् ऊर्जेला
गतीज् ऊर्जेच्या गावचा पत्ता?

या प्रश्नांची उत्तरं मिळतीलही कदाचित
पण काय द्यावं नाव
नवरा असतानाही जडलेल्या प्रेमाला?

♦♦

**गीतेश गजानन शिंदे**
ठाणे

ता वि क

## बहर जाळला कुणी?

पानगळीचा इतिहास जुनाय
पण... बहर जाळला कुणी?
हा मोठा प्रश्नये
अज्ञातय असं नै.
महावंशाच्या मुळ्या अन् फांद्या अफाट पसरल्यात.
ती कुऱ्हाड नीट लक्षात ठेव.
दांडा गोतास काळ हेही लक्षात असू दे.
मूक साक्षीदार उभेत अजूनही,
बोलून बघ दोन गोष्टी
त्यांच्या मौनापलीकडच्या भाषेत.
समजली तुला ती भाषा तर आनंदचंय.
ती उमटलेली लिपी वाच.
कित्येक पिढ्यांपासून उमटलेले वळ आहेत ते.
हाडामांसाचा हा इतिहास
नदीच पानी/डोळ्यातलं पानी
एकाचवेळी तुला वाचता येईल का?
दान देणारे हात कैद केले तरी ते ताठ उभे होते.
तुला तेवढं तरी जमलं पाहिजे, ताठ उभं राहणं.
♦♦

**देविदास सौदागर**
तुळजापूर, जि. उस्मानाबाद

## स्वातंत्र्याचा जाहीरनामा...!

स्वातंत्र्य भाकरी सोबत तोंडी लावून चघळून घेतल्यावर
सुटकेचा निःश्वास सोडल्यासारखं वाटतं
आभासी जगण्याच्या पटलावर
अस्पष्टतेचे जाहिरनामे आपटतात एकापाठोपाठ...
सर्वत्र फक्त भोंगा वाजतोय
या आवाजाखाली सत्य तळाशी गुदमरतंय
कोण जाणे...
माझा आवाजही कोणी ऐकेल?
♦♦

**हेमंत दिनकर सावळे**
वाशिम

## लोक

लोकशाही गेली हुकुमशाही आली
येऊ द्या खुशाल म्हणताहेत लोक
लुटले जाताहेत दिवसाढवळ्या
तरी सत्तेचे ढोल बडवताहेत लोक

द्वेषाच्या अग्नीत स्वतः भाजून
जग जाळण्याची भाषा बोलताहेत लोक
दुसऱ्यांना गुलाम करण्यासाठी
आपणच गुलाम होताहेत लोक

सर्व काही समजत असूनही
सोंग घेताहेत लोक
आपल्याच मरणाची
वाट चालताहेत लोक

आपल्या डोळ्यांदेखत
लोकशाही मरताना
पहात आहेत लोक
हुकुमशाहीच्या स्वागताला
सज्ज आहेत लोक

जातीच्या धर्माच्या
गुंगीत गुंग झालेत लोक
ही कसली नशा चढलीय
आपल्याच पराभवाचे
उत्सव साजरे करताहेत लोक
♦♦

**मारोती कसाब**
उदगीर जि. लातूर

ता

## अंतर

अग्नीला साक्ष ठेवून मारलेली
साताजन्माची गाठ नंतर सैल होत जाते
अन्
नातं जपता जपता
मनाला माराव्या लागतात सतराशे साठ गाठी
नाखुषीनं.

खरं तर,
फुली मारण्याइतका वाईट माणूस नाही मी
नि
तीही.

मी जसा हवा तसा मिळत नसावा तिला
येतही असेन तिच्या वाट्याला कमी
मी नसेन बांधलं करकचून
माझं आयुष्य तिच्या आयुष्याला
मोडत चालली असेल माझी सवय
तिला मिठीत घेऊन डोळ्यांत खोलवर पाहण्याची
हक्काची बायको झाल्यानं
हळूहळू सुखावत गेलं असेल माझं पुरुषत्व.

या कावऱ्याबावऱ्या काळात
अन उतरणीला लागलेल्या आयुष्यात
ती माझी आवड होती की निवड
हेही आता सांगता येत नाही नेमकेपणानं.

तिच्या – माझ्यात असतं
कितीही पल्ल्याचं भौगोलिक अंतर
तरी ते मी केलं असतं पार
पण...
♦♦

**भगवान**
**निळे**
मुंबई

## काळोख डोह

हा दिवसांचा काळोख
झुंडीने उच्छादतो चौफेर...
किती चाळावीत पाने उजेडाची
तरी काळी अक्षरे पानापानावर
कोरलेली ओळीओळीने लयबद्ध.
हा प्रकोप अटळ असेल कदाचित...!
या गोपुरातून जाळ उठत असेल संस्कृतीचा कदाचित...!
तरी हा गलबला चिडीचूप माणूसपण गळताना...
हे घर की हवामहल शब्दांचे
पृथ्वी सोडून आकाशगंगेत झुल्यासारखे
तरंगतेय अतृप्त मनात...
की हा उच्छाद उडणाऱ्या माणसांचा
आदी-अंत नसलेला?
ही स्तब्धता माकडहाड तुटल्यावर जीभेची
रिचवीत नेते स्नायूच्या एकांतातून
अफाट आकांताकडे.
फालतूपणातून मन वितळते, विकलते,
झिरपते अगाध एकांताकडे...
ही लुब्धता अवास्तवी झिंगते
अबोली खिन्नता उजळते
रोमारोमात विलसते
काळोख डोह....
♦♦

**गिरीश नारायणराव सपाटे**
रामटेक जि. नागपूर

## सत्य

सत्या
कुठे हरवलास तू?
कुठे आणि किती शोधावे तुला
हरएक संस्थेत, ऑफिसात, दुकानात
सरकारात, मंडळात, बिझनेसात?

नाही सापडतयंस तू
नोकरीत, शेतीत, समाजात, राजकारणात..
गावात, शेतात, शहरात...
इतकेच काय
साहित्यातही नाही सापडत तू आताशा

तू आहेस म्हणे एकच शाश्वत!
बाकी तर सगळेच नश्वर!
किती जपले आजतागायत
तुला थोर महान आदर्शांनी!
किती केले कौतुक
धर्म आणि धुरीणांनी!
पण तरी तू गायबच
या भव्य धार्मिक देशातुनी

पेलवत नाहीस तू कच्च्या दिलांना!
सत्याचे प्रयोग झेपत नाहीत सगळ्यांनाच
तरीही लोक आत्मवृत्ते लिहीत राहतात
खोट्यालाच तुझा अंगरखा चढवून टाकतात

खरे बोलले तर सख्ख्या आईलाही राग येतो म्हणतात
ठाऊक आहे, शुद्ध सत्य असतं नागडं
आतमध्ये डोकावलं तरच दिसतं साजरं
तरीही लोक असत्यावरच प्रेम करतात

सत्या तू आवडत नाहीस कुणालाच
इतकी का झाली ही माणसं भेकड?
सत्य म्हणजे धगधगतं अग्निकुंड
ज्यावर चालताना झालेल्या राखेनंच तर
पुढच्या पिढ्या रेखतात रांगोळी
पण आज
सत्य म्हणजे बंदुकीची गोळी.
एकाच छताखाली राहून ताणत चाललेलं
दोघांमधलं भावनिक अंतर मी करू तरी कसं पार?
••

**मंदाकिनी**
**पाटील**
कल्याण, जि. ठाणे

## कर्कवृत्तावरून

कर्कवृत्तावर उभा राहून
मी खाली पाहतो तेव्हा
दिसतो मला
कोवळ्या उन्हात
शांत पहुडलेला विंध्य
त्यापलिकडला
निश्चल सातपुडा.
त्याच्या पायथी
इथं तिथं बसलेली
छोटीशी गावखेडी.
त्यातलं एक माझंही.
हसणारी शेतं
त्यापलिकडलं जंगल.
दिसते मला
जंगलाला
नागमोडी वळसा घालून
खळखळ वाहत जाणारी
वाघूर
अन् तिच्या काठावर बसून
पाणी शेंदणारी
माझी माय
••

**जितेंद्र परशराम कुवर**
ओझर मिग, जि. नाशिक

## नाही सांगू शकत मनातलं कुणालाही

वि

दुःखाचे दार
बंद करून बाहेर यावे
मस्त गार हवेत फिरून घ्यावे
असे कितीही वाटत असले तरी
घट्ट बंद असलेले
दार उघडण्यातच आयुष्य
निघून चाललंय
✻

अधोरेखित करतोय
मलाच माझा सभोवताल
मी जगतोय
तेच तर कवितेत येतंय
म्हणून तर कविताही होतेय
अधिकच गडद अधोरेखित
✻

बांधून टाकल्या आहेत
काळजाच्या सभोवतालच्या
सर्व सीमारेषा
कुणालाही
आत आणि बाहेरही
फिरता येणार नाही
हे असे करणे
अत्यावश्यकच आहे
कुणाचेही जगणे
मुश्कील होऊ नये म्हणून
✻

जगण्याला अर्थ होता
तेव्हा लक्ष दिले नाही
जगण्याकडे
काळ सरकून गेलाय पुढे
आता फक्त जगणेच
अटळ आहे
✻

कवितेची पाने
केवळ फडफडली नाहीत
तर महाकारूणिकही झालीत
सभोवतालचे दुःखं मिटवण्यासाठी
आमिषांच्या
खूप वाटा आणि वळणंही
आलीत वाटेवर
स्थितप्रज्ञच झाली कविता
रिमझिम पावसाळे
कित्येकदा आलेत
तृष्णेचा महासागर
पार करत गेली कविता
✻

मुखवट्यांचे दिवस
नाही टिकत फार काळ
एकना एक दिवस
मुखवटा गळून पडतोच
जगण्याचे सच्चे क्षणच
दिवस बदलत असतात
✻

दिवस-रात्र
अभिनयच तर करत असतो
अभिनयाच्या पाठशाळेतूनच
शिकता येते असे नाही
आपला सभोवताल
हीच तर खरी पाठशाला असते
काळाचा पडदा पडेस्तोवर
अभिनयच तर सुरू असतो
✻

दिवस
उडून चालले आहेत
एकेक करून
रात्रीही
विझताहेत साऱ्या
जगण्याची रोज
दमछाक होतेय
छळणारा वर्तमान
पेलतेय कविता
कालच्या जखमांना
लेप लावतेय कविता
उद्याच्या स्वप्नांना
बळ देतेय कविता
✻

मिटल्या नाहीत
अजूनही काळीजखुणा
हजारो कोस दूर असल्या तरी
कवितेत उमलून येतात
स्वप्नांच्या हळुवार खुणा
✻

आजकाल
गुदमरतोय श्वास
नाही सांगू शकत
मनातलं कुणालाही
कवितेशी तेवढं
बोलायचं ठरवतो तर
तिचेही गुदमरताहेत श्वास
आजकाल
♦♦

**शशिकांत हिंगोणेकर**
जळगाव

## वावटळ

क

वावटळी उठतात
उन्हाळा आला की
सगळा फुफाटा गरागरा
फिरायला लागतो
भ्या वाटावं असा.
मोकळ्या माळरानावर मोठ्ठी वावटळ
गावातल्या आळ्यांमधनं
छोट्या छोट्या वावटळी.
वावटळी उदसून टाकतात
पायाखालची माती,
उचलून नेतात
मातीबरोबर बरंच काही
भिरकावतात भुईचा पाचोळा
आभाळभर
कुठं टोपलं फरपटत जातं,
तर कुठं
छप्पर उडून पडतं
घरादारात किती खकाना पसरतो
याचा काही हिशेबच नाही.
वावटळ आली की,
कुणी झाकापाक करतं,
कुणी आडोशाला पळतं,
कुणी एखाद्या
आधाराला घट्ट पकडून
गच्च डोळे मिटून घेतं.

अचानक घोंघावणाऱ्या
उन्हाळ्यातल्या वावटळी
परवडल्या एकवेळ;
उठतील उठतील अन्
पुन्हा बसतील.
पण माणुसकीच्या उन्हाळ्यातल्या
वावटळी
परवडायच्या नाहीत आपल्याला;
होत्याचं नव्हतं करतील,
जरा डोळे मिटले तर.

शहाण्या-सुरत्यांनी तरी
जोडत राहिलं पाहिजे
माणसांचे बिंदू.
ओरखड्यांनी न्
जिव्हारी घावांनी
गहिवरलेल्या
मातीतून आता
जिवंत होऊ दे
जिव्हाळे
ओहोळाला ओहोळ
मिळत
ओलाव्याचे गच्च
प्रवाह गहिरे होत
पाझर फुटू दे
कठोर खडकांना.
धरणीच्या तगमगीनं
आभाळाच्या डोळ्यांत
सहृदयतेचे अश्रू दाटो.
सुसंवादाच्या हाळीनं,
सद्भावनेच्या पायरवाने
आपल्या काळजांना
पाऊलवाटा फुटो
शब्दच्छलांचे कोरडे काटवन
मऊ होऊ दे
माणुसकीच्या
टपोऱ्या थेंबांनी.
शिंपणासाठी आभाळाचे
मन धावू दे
वळीव होऊन.

हाच तर उतारा आहे नं
मिरगाचा पाऊसकाळ येईपर्यंत.

♦♦

**अंजली ढमाळ**
सातारा

## या प्रदेशाला काय झाले आहे?

या प्रदेशाला काय झाले आहे
ग्रहण लागले आहे
की
दिवसानेच
अंगावर ओढून घेतली आहे
मिट्ट काळी चादर;
अशा कृत्रिम अंधारात
लोकांकडून
कशाचा माफीनामा
लिहून घेतला जातो आहे
त्यांनी
सूर्यकिरणे चोरल्याचा
की चांदणं खुडून नेल्याचा..

आणि
हे कधी झालेत
या प्रदेशाचे कायमचे मालक?
तशी मालकालाही
जपावी लागते
खऱ्याखोट्याची चाड;
हे तर लोकांनी शिक्के मारून
नेमलेले अल्पजीवी भटके,
उद्या हेच नजरेला पडतील तिथं
असे नाही..
स्वतःला
दैवताच्या वस्त्रात गुंडाळून;
लोकांना
हल्लीच्या मोसमात
ओठांवर मनातले आणता येवू नये
वा ओठातले मनातच गोठवून टाकावे
शांतपणे,
जर ते शब्द
त्यांना हवे ते सूर माखून येणार नसतील;
ही त्यांची कोणत्या प्रकारची मनमानी..?
कदाचित
त्यांना अभिप्रेत असलेली
हीच ती सुल्तानी मुस्कटदाबी.
फार काही फरक नाही
नेहमीप्रमाणे
झेंडे फडकत राहतात
रंग वा डिझाईन बदलून..

आता लोकांना समज
आली आहे,
कुठेतरी घोळ आहे
काहीतरी
व्यवस्थेचे चुकते आहे घनघोर.

लोकं चतुर आहेत
ते स्वप्न वितळू देत नाहीत
असल्यातसल्या मारक अटींच्या
भडक आचेवर;
ते व्यक्त होत राहणार
त्यांना
जीभ छाटायची हिंस्त्र धमकी दिली
अगदी अंधारात
तरी..

त्यांना हमखास कळते –
त्यांना दिवस बदलता येतात
मोसम बदलता येतो
नव्याने शिक्का मारता येतो
ढोंग हटवण्यासाठी
ढोंगी हद्दपार होण्यासाठी
नव्या रक्षकांच्या निवडीसाठी..
त्यांना जिवंत राहण्याचे
मुरवता येते स्वप्न

कसलीही चोरी न करता
आणि
थेट जिरवताही येते
दिवसाउजेडी
व्यक्त होत
तथाकथितांची समस्याग्रस्त घुसखोरी..

ते आता ठरवतीलच
माफीनामा उधळण्याचा बेत
दिवसावरचे गडद सावटही
काढून टाकतील,
अप्रस्तुत धमकीला
बोटांच्या चिमटीत पकडून
चिरडतील
आणि
सूर्यमुखी नवे पर्व
फळाला आणतील
लोकशाहीचा धडा गिरवायला
कोणतेही टोचणारे
अनाठायी आरोप
पराजित करायला..

ते व्यक्त होणारच
मजल दर मजल;
कोण किती ते रोधणारे
क्लृप्त्यांचे फासे टाकणारे
होतील लवकरच जमीनदोस्त, दोस्तहो..!
♦♦

**सतीश लोथे**
नाशिक




**बदलावंच लागेल हे सगळं**

आजच्या वर्तमानपत्रात
अपघाताची बातमी नाही
भांडणाची बातमी नाही
चोरी किंवा दरोड्याची बातमी नाही
हल्ला किंवा खुनाची बातमी नाही
आजच्या वर्तमानपत्रात एकही रक्तरंजित बातमी नाही

आज मी खूप अस्वस्थ आहे
मिळमिळीत बातम्यांचं हे वर्तमानपत्र वाचून

विचार करतोय
का जगताहेत
माझ्या भोवतालचे सगळे लोक
इतके रूक्ष आणि रटाळ?

का वागताहेत
माझ्या देशातले सगळे लोक
इतकं मचूळ आणि नीरस?

नाही!
मला तातडीने बदलावंच लागेल
माझ्या उत्साहशून्य देशाचं हे चित्र

त्याची सुरुवात
हे वर्तमानपत्र बदलण्यापासूनच करावी म्हणतो!
♦♦

**प्रशांत असनारे**
अकोला

**'परिवर्तनाचा वाटसरू'ची पावशतकी वाटचाल..**
**हार्दिक सदिच्छा!**

**लुंकड हॉस्पिटल**

**डॉ.वर्षा लुंकड ● डॉ.दिलीप लुंकड**

२५८, पुणे-मुंबई रोड, दापोडी, पुणे ४११ ०१२
फोन - ०२० २७१४ ८१९४ / २७१४ ७६१२

## गर्निका

शहर जळून गेलं जळून खाक झालं
आगीने झुलसणारं
भर बाजारात माणसं मग्न तुडुंब
जगण्यात खोलवर पसरलेली हसरी
त्या भयानक हिंसक क्षणाच्या
सेकंदाच्या मिनिटाच्या आधी
सावल्या सोडून पळाल्या सैरावैरा
अधांतरी तुटले रस्ते गल्ल्या बोळ वाटा गडप झाल्या
जमिनीने पोटात घेतले तुटके रक्तबंबाळ अवयव
राख राख सगळी राख
समस्त वस्तुजाताची

प्रेम जे उगवत होतं कुठेही
पातं बनून धारदार कोवळं
राबणाऱ्या हातांना चिकटायचा चांदण्यांचा वर्ख
आकाश किती नजिक असायचं
इतिहासात दर्ज होण्याआधीचं गर्निका
कोसळून काळं करडंधूसर भेसूर होण्याआधीचं गर्निका

एक स्त्री वेदनेनं विव्हळणारी
आणखी चार स्त्रिया
घोडा
बैल
तुटलेलं मोडून पडलेलं हत्यार
पॅलेटमधल्या अस्वाभाविक अवास्तविक रंगातलं गर्निका
ध्वस्त किंकाळ्या
दुःखाचंजखमांचं अमानुष नृशंस क्रौर्याचं थरकाप उडवणारं
रंगरेषाआकाराचं हे चिरंतन घटित
कॅनव्हासवर प्रकटण्याआधीचं गर्निका
गर्निका आधीचं नंतरचं
त्या भयानक हिंसक क्षणाचंसेकंदाचंमिनिटांचं
अराजक
इतिहासात सरळसरळ प्रवेश करताना

नेपथ्य बदलतं
कॅनव्हास
काळही
स्थळप्रत मात्र तीच राहते
आमच्या देहाचं अक्षांश रेखांश
गर्भाशयं
सतत दावणीला बांधलेली
वंश राष्ट्र धर्म जात
संपृक्त संज्ञेसाठी
हिंसेच्या परिसीमेचं डिझाईन
आत्म्याला भोक पाडूनच
रंगवलं गेलंय
पिकासो, मला ते फूल हवंय
गर्निकातलं
जगातल्या यच्चयावत बायांना ते फूल हवंय
दिवसेंदिवस
अप्राप्य होत जाणारं
या युद्धग्रस्त जमिनीच्या खालून चालताना
आमचेही हात तितकेच रिकामे रिकामे आहेत
भयभीत थरकाप उडवणारे
गर्निकासारखे.
♦♦


**प्रज्ञा दया पवार**
ठाणे


**'परिवर्तनाचा वाटसरू'ची पावशतकी वाटचाल..**
**हार्दिक सदिच्छा!**

**डॉ. पोळ ऑर्थोपेडिक हॉस्पिटल**

**डॉ. सुहास (सुरेंद्र) पोळ ● डॉ. गीतांजली पोळ**

राधिका पॅलेस हॉटेलजवळ, पंताचा गोट, नवा राधिका रस्ता,
सातारा ४१५ ००२ फोन – ०२१६२ २३७०८४



वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय हा तसा जुनाच विषय आहे. याबाबत वेगवेगळी मते आहेत. याच अर्थाने काही लोक *सायंटिफिक टेम्पर* असाही शब्द वापरतात. हा शब्द भारताच्या राज्यघटनेतदेखील आहे. सर्व भारतीय नागरिकांनी *सायंटिफिक टेम्पर* अंगिकारावे असे तेथे म्हटलेले आहे. *टेम्पर* या शब्दाचा मराठीत अर्थ वृत्ती, मनोवृत्ती, दृष्टिकोन, जीवनाकडे पाहण्याची दृष्टी असा काहीतरी होतो. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे जगाला सामोरे जाताना व त्याला भिडताना, जगाकडे पहाण्याचा, ते आकळण्याचा, ते समजून घेण्याचा, त्याचे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा एक विशिष्ट प्रकारचा दृष्टिकोन. हा दृष्टिकोन भौतिक विश्व, सामाजिक जीवन व माणसाचे व्यक्तिगत जीवन आणि मन, या तिन्ही गोष्टींकडे पहाण्याचा असतो.

वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे नेमके काय हे समजावून घ्यायचे तर विज्ञानाचा जो प्रत्यक्ष व्यवहार चाललेला असतो त्याच्याकडे आपल्याला वळले पाहिजे. रोजच्या सामान्य व्यवहारात आपण सामान्य बुद्धी वापरतो, कॉमन सेन्स वापरतो. त्यातून आपल्याला सामान्य ज्ञान प्राप्त होते. विज्ञान म्हणजे विशेष प्रकारचे ज्ञान. ते खास वैज्ञानिक पद्धती वापरून मिळवलेले असते. विज्ञानाचे काम कसे चालते हे ढोबळमानाने सगळ्यांनाच ठाऊक आहे. प्रत्यक्ष जीवनक्रिया – अनुभव, निरीक्षण – वस्तुतथ्ये म्हणजे फॅक्ट्स – आडाखे, हायपॉथिसिस – विशिष्ट प्रकारे नियोजित कृती म्हणजे प्रयोग – त्यांची निरीक्षणे – त्यांची संगती लावणे, विश्लेषण करणे, त्यांच्या मागचे कार्यकारण भाव व नियम शोधणे, सिद्धांतांच्या रूपात ते मांडणे – पुन्हा ते पडताळून पहाणे, पुराव्यानिशी सिद्ध करणे, वगैरे. या सगळ्या कामात विशिष्ट प्रकारे बुद्धीचा वापर केला जात असतो. जगाचे यथार्थ, वास्तवनिष्ठ ज्ञान प्राप्त करून घेण्याचा सगळ्यात चांगला मार्ग वैज्ञानिक पद्धती वापरणे आहे हे आता सर्वमान्य आहे. पण जरा जास्त खोलात जाऊन ही पद्धती कशी असते हे स्पष्टपणे जाणून घ्यायला हवे. वैज्ञानिक पद्धतीचे स्वरूप कसे असते, निकष काय असतात? तिच्या पायाखाली आधारभूत अशी तत्त्वे काय असतात? ती का म्हणून मानायची? तिच्याशी कोणत्या मनोवृत्ती जोडलेल्या असतात? हे सगळे समजले तर वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय हे जास्त नेमकेपणाने व सखोलपणे आपल्याला समजू शकेल.

पण या प्रश्नांकडे वळण्याआधी दोन गोष्टींचे भान ठेवायला हवे. त्यातली एक अशी : माणूस जगाला सामोरा जातो तेव्हा तो काही फक्त जगाचे ज्ञान मिळवत

सुधीर
बेडेकर

# वैज्ञानिक दृष्टिकोन

*मार्क्सवादाचा माझा पहिला गुरू आणि नंतर ५२ वर्षे मित्र असलेल्या सुधीर बेडेकरचे २५ मार्च रोजी अचानक निधन झाले. त्याचा वैज्ञानिक दृष्टिकोन हा अपुरा व म्हणून अप्रकाशित लेख 'परिवर्तनाचा वाटसरू' प्रसिद्ध करत असल्याबद्दल विशेष धन्यवाद. या लेखामागची पार्श्वभूमी म्हणजे डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या शहीद-दिनी – २० ऑगस्ट रोजी वैज्ञानिक दृष्टिकोन दिन पाळायचे २०१८मध्ये अखिल भारतीय लोक-विज्ञान चळवळीने ठरवले. तेव्हा सुधीरने माझ्या आग्रहामुळे जुलै २०१८मध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन या लेखाचा मसुदा लिहला. मी आग्रह केला कारण या विषयावर सुधीरची विलक्षण मास्टरी होती. विज्ञान, तत्त्वज्ञान, वैज्ञानिक विचारपद्धती, विचारसरणी यांचा नेमका अर्थ काय, परस्परांचे नाते काय, सीमा-रेषा कोणत्या व मार्क्सने या क्षेत्रात नेमकी कोणती वैचारिक क्रांती केली याबद्दल तो अतिशय समर्पक पद्धतीने मांडणी करे. 'मागोवा', 'तात्पर्य' या त्याच्या मासिकांत याबाबत त्याचे या विषयावर अतिशय चांगले तीन लेख त्याने लिहले होते. त्यातील सर्व मुद्दे गुंफणारा एक लेख त्याने लिहावा असा मी त्याला आग्रह केला. त्या लेखाचा हा अपुरा राहिलेला मसुदा. त्याच्या या मसुद्यावर माझ्या काही सूचना होत्या. त्याबाबत आमची चर्चा झाली. तो सुधारित लेख बनवणार होता. पण अनेकदा आठवण करुनही त्याने ते केले नाही. कित्येक वर्षे त्याने काही लिहिले नव्हते, निदान प्रसिद्धीस दिले नव्हते. ते का? हे कधी कळाले नाही. त्याच्या मनात अनेक प्रश्न निर्माण झाले होते व मनातील या शंकांचे पूर्ण समाधान झाल्याशिवाय काही लिहायचे, प्रसिद्ध करायचे नाही असे त्याचे होते. पण या मूलभूत विषयाबाबत त्याच्या मनात प्रश्न, गोंधळ आहे असे कधी वाटले नाही. कारण काहीही असो, हा लेख अपूर्णावस्थेत राहिला! एक अपुरा व म्हणून अप्रकाशित लेख म्हणून तरी सर्वांच्या पुढे यावा असे वाटून त्याच्या पश्चात प्रसिद्धीला देत आहे. या लेखाचे महत्त्व या बाबत माझी टिपणी सोबत जोडत आहे.*

**– अनंत फडके**

नसतो. त्याला वाघ पाहिला तर भीती वाटते, गुलाबाचे फूल पाहिले तर छान वाटते. म्हणजेच भाववृत्तींच्या अंगानेही तो जगाला सामोरा जात असतो, केवळ बुद्धीने नाही. तसेच त्याला इच्छा होते, पळून जाण्याची, फूल घेऊन केसात माळण्याची. म्हणजेच माणसाचा बुद्धीने करण्यात येणारा ज्ञानव्यवहार हा एक झाला. पण माणूस भावनात्मक अंगाने, सौंदर्याच्या म्हणजे कलात्मक दृष्टीने, चांगले-वाईट ठरवण्याच्या नैतिक मूल्यांच्या दृष्टीने, इच्छा-अनिच्छांच्या अंगानेही जगाशी संबंध ठेवतो. आणि अर्थातच तो व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात प्रत्यक्ष कृतीही करत असतो. हे सगळे करताना, म्हणजे जगताना, त्यामागे त्याची काहीतरी एक जीवनदृष्टी असते. हे सांगण्याचे कारण म्हणजे माणसांचा वैज्ञानिक व्यवहार हा या बाकीच्या सर्व व्यवहारांमध्ये चाललेला असतो, त्यांच्याशी संबंधित असतो, त्यांच्यात गुंतलेला व लडबडलेला असतो, हे लक्षात घ्यायला हवे. सुटी बुद्धी नव्हे तर जिवंत अख्खी माणसे विज्ञान

व्यवहार करत असतात. साहजिकच वेगवेगळ्या माणसांची जीवनदृष्टी वेगवेगळी असते. खराखुरा वैज्ञानिक दृष्टिकोन काही विशिष्ट, निकोप अशा भाववृत्तींशी, कलादृष्टीशी, नीतिमूल्यांशी संलग्न असतो, सुसंवादी असतो. ज्ञान प्राप्त करून घेण्याची ही दृष्टी एका विशिष्ट जीवनदृष्टीचा भाग असते. एका शब्दात सांगायचे तर तो माणुसकीशी जोडलेला असतो.

दुसरी गोष्ट, विज्ञानाचा ज्ञानप्राप्तीचा हा उद्योग एक सामाजिक व्यवहार असतो, समाजात चाललेला असतो. वैज्ञानिक व्यक्ती, संस्था, विद्यापीठे, नियतकालिके यांच्याद्वारा चाललेला असतो. आणि त्या समाजात राहणाऱ्या सर्व माणसांच्या जीवनाशी त्याचा संबंध असतो. तो कसा? प्रत्येक माणूस विचारवंत असतो. तो जगताना भोवतालच्या जगाचे ज्ञान करून घेत असतो, ते साठवत असतो, त्याची इतरांशी देवाणघेवाण करत असतो. कुटुंबात, शाळेत, रस्त्यावर, कामाच्या जागी. साधा सुतार, लोहार, शेतकरी, यंत्र चालवणारा कामगार, स्वयंपाक करणारी बाई, अशा सगळ्यांजवळ एका स्वरूपात ज्ञान असते (सामान्य ज्ञान व तंत्र). इंजिनियर लोकांकडे ते वेगळ्या स्वरूपात असते (तंत्रज्ञान). खास ज्ञानप्राप्तीचेच काम करणाऱ्या शास्त्रज्ञांकडे ज्ञान वेगळ्या स्वरूपात असते (विज्ञान). एकंदर सामाजिक जीवनामध्ये या सगळ्या रूपांमधल्या ज्ञानांमध्ये सतत घुसळण व देवाणघेवाण होत असते. साहजिकच ही सगळी ज्ञानक्रिया या समाजातले अर्थकारण, समाजकारण, राजकारण, वैचारिक व सांस्कृतिक जीवन, या सगळ्या व्यवहारांच्यामध्ये चाललेली असते. म्हणजे सामाजिक ज्ञानक्रियेचा एक भाग असणाऱ्या विज्ञानाचे कार्यही या इतर सामाजिक व्यवस्था व प्रक्रियांमध्ये चाललेले असते, त्यांच्यात गुंतलेले असते. या सगळ्यांची व विज्ञानाची परस्परक्रिया चालू असते. काही स्वरूपाचे सामाजिक जीवन विज्ञानाच्या व्यवहाराला पोषक असते तर काही घातक किंवा अडथळे निर्माण करणारे असते. उदाहरणार्थ चर्चने पोथीनिष्ठपणे आधुनिक विज्ञानाच्या विकासाला केलेला विरोध असो, जातिसंस्थेमुळे सिद्धांतन व श्रम व्यवहारांमध्ये पडलेली दरी असो, औषध कंपन्यांमुळे संशोधनाला लागणारी भलतीच वळणे असोत. उलट वैज्ञानिक दृष्टिकोन हा काही सामाजिक मूल्यांची सुसंगत असतो. विज्ञानाला समाजात मान असणे, त्याला साधनसामुग्री व पैसा उपलब्ध होणे, चिकित्सक जिज्ञासू शोधवृत्तीला तसेच खुल्या व मुक्त चर्चेला वाव आणि प्रोत्साहन असणे, विज्ञानाचा वापर युद्ध व स्वार्थ यांच्यासाठी न होता समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी व्हावा असे वाटणे, इत्यादी गोष्टींशी त्याचे जुळते.

सारांश, विज्ञानाचा ज्ञानव्यवहार हा समग्र मानवी मनोव्यापारांचा, संपूर्ण जाणीव-विश्वाचा एक भाग असतो. तसेच तो प्रचलित सामाजिक जीवनाचा एक भाग असतो. या दोन्हीचे भान वैज्ञानिक दृष्टिकोन समजून घेताना व बाळगताना ठेवायला हवे. याची थोडीशी आणखी चर्चा आपण नंतर करणार आहोत.

पण हे सर्व जरी खरे असले तरी खुद्द विज्ञानाची सगळी धडपड ही वास्तवाचे वस्तुनिष्ठ, यथार्थ, बिनचूक ज्ञान सुनिश्चितपणे व अचूकपणे मिळवण्याची असते आणि त्यासाठी अत्यंत तर्ककठोर बुद्धी वापरली जात असते, हे सुद्धा तितकेच खरे आहे! वैज्ञानिक कार्यामध्ये कसलीही भावुकता किंवा आवड-निवड, मूल्ये आणि तत्त्वज्ञान, स्वार्थ व हितसंबंध, राजकारण व पक्षपात, वगैरे कशालाही अजिबात थारा नसतो. याकरताच एरवीच्या आपल्या ज्ञान व्यवहारापेक्षा वेगळी अशी वैज्ञानिक विचारपद्धती तेथे वापरली जात असते. तिचे तपशीलवार विवेचन येथे करावयाचे नाही, फक्त तिचे काही निकष, तिला आधारभूत काही तत्त्वे आणि तिच्याबरोबर जोडून असलेल्या काही प्रवृत्ती यांची ओळख खाली करून घ्यायची आहे.

**वैज्ञानिक दृष्टिकोन – तर्कशुद्धतेची व प्रयोगशीलतेची गरज**

(१) आपला सर्व विचार आणि वैज्ञानिक विचारही संकल्पनांमध्ये (*कन्सेप्ट्स*मध्ये) होत असतो. विज्ञानात कोणत्याही विषयाचे ज्ञान करून घेत असताना प्रत्येक संकल्पनेचा अर्थ काटेकोरपणे सुनिश्चित, नेमका व स्थिर करणे आवश्यक असते. तसेच ही संकल्पना व्यक्त करणाऱ्या पारिभाषिक शब्दांची नेमकी व्याख्या करणेही आवश्यक असते. रोजच्या जीवनात आपण बहुतेक वेळा संकल्पना सैलपणे व ढोबळमानाने वापरत असतो, पण विज्ञानात असा सैलपणा वा भोंगळपणा चालत नाही. उदाहरणार्थ कागद म्हणजे काय हे आपल्या सगळ्यांना माहीत आहे, पण कागद या शब्दाची व्याख्या तुम्ही करू शकाल काय? बल, शक्ती, ऊर्जा किंवा फोर्स, पॉवर, एनर्जी यांच्यातला नेमका फरक सांगू शकाल काय? विज्ञानात असे चालत नाही.

(२) या संकल्पनांची काहीएक जुळणी अथवा रचना करून आपण एखादा विचार किंवा सिद्धांत बनवतो. हा सिद्धांत म्हणजे वास्तव जगाच्या एखाद्या तुकड्याचे वर्णन करणारा एक ज्ञानाचा तुकडा असतो. विज्ञानात तो बनवताना केलेली रचना काटेकोरपणे तर्कशास्त्राच्या (किंवा त्याचेच रूप असलेल्या गणितशास्त्राच्या) नियमांनुसार बनवलेली असायला लागते. ती सुसंगत असावी व ती तर्कशुद्ध असावी, तिच्यात कोणतीही संदिग्धता नसावी, हा वैज्ञानिक पद्धतीचा दंडक आहे. संकल्पनांची व्याख्या कशी करायची, त्यांचे एकमेकींशी संबंध कसे जोडायचे, संकल्पना अमूर्ततेच्या कोणत्या पातळीवर आहे ( उदाहरणार्थ : वस्तू – सजीव वस्तू – प्राणी – सस्तन प्राणी – कुत्रा – टिपू ) याची नीट समज ठेवून, अमूर्त व मूर्त पातळींवरच्या संकल्पना एकत्र कशा हाताळायच्या, एका पातळीवरून दुसरीवर कसे जायचे वगैरेबाबत हे तर्कशास्त्राचे नियम असतात. ते पाळले तरच तुमच्या सिद्धांताचे बांधकाम पक्के व सुव्यवस्थित होते.

दीडदोनशे वर्षांपूर्वी संकल्पना 'सुनिश्चित' असायला पाहिजे म्हणजे काय याची काहीशी यांत्रिक, ताठर व आकारिक (फॉर्मल) समज प्रचलित होती. आधुनिक विज्ञानाच्या प्रगतीनंतर गुंतागुंतीचे व बदलते वास्तव आकळू शकणाऱ्या सिद्धांतनाची गरज वाढू लागल्याने जुने क्लासिकल फॉर्मल तर्कशास्त्राचे नियम बदलले. संकल्पना लवचीक, प्रवाही, कधीकधी अंतर्विरोध पोटात सामावून घेणाऱ्यासुद्धा बनल्या. जास्त व्यामिश्र बनल्या. त्याचप्रमाणे तर्कशास्त्र व गणित हीसुद्धा निव्वळ एकदिश, यांत्रिक, ताठर न रहाता वेगवेगळ्या प्रकारे पुष्कळ प्रगत होत गेली. हे फक्त येथे नोंदवून ठेवूया.

(३) आपण बनवलेल्या सिद्धांतात वास्तवाचे यथार्थ व समर्पक स्पष्टीकरण असायला हवे, तो वास्तवाशी जुळणारा हवा, आपले ज्ञान वस्तुनिष्ठ हवे. यासाठी मांडला गेलेला सिद्धांत विज्ञानात प्रयोगाद्वारे वास्तवाशी पडताळून पाह्यला जातो व मग त्यातून हाताशी येणाऱ्या पुराव्यानिशी तो सिद्ध होतो, त्याची सत्यता ठरते. काही वेळा प्रयोग करणे अशक्य असते (उदाहरणार्थ, खगोलशास्त्रात), तेव्हा पुन्हा निरीक्षणे करून ही सिद्धता केली जाते व त्यानंतरच त्याला मान्यता मिळते. समाजविज्ञानातही प्रयोगपद्धतीचा तसा अवलंब करता येत नसल्याने दीर्घ ऐतिहासिक–व्यावहारिक प्रक्रियेद्वारेच पडताळा मिळू शकतो.

याबाबत सुद्धा काही गोष्टी लक्षात घ्यायला हव्यात. एकतर पूर्वीच्या मानाने 'पडताळणी करणे' हे जास्त प्रगल्भपणे समजून घ्यायला हवे. काही सिद्धांत प्रयोग किंवा निरीक्षणांनी ताबडतोब निखालसपणे सिद्ध होत नाहीत. अनेक वर्षे मध्ये जावी लागतात. दरम्यान त्याबाबत शास्त्रज्ञांमध्ये एकमतही नसते, अशा वेळी शास्त्रज्ञांच्या परिवारातील बहुमतानेच 'सत्य' ठरत असते. दुसरे म्हणजे आज खरा ठरलेला सिद्धांतसुद्धा पन्नास वर्षांनी चुकीचा किंवा निदान अपुरा ठरतो. सत्य हे नेहमीच सापेक्ष असते. त्रिकालाबाधित केवल सत्य

असे काही नसते. तसे ते सांगत आहोत असा दावाही विज्ञान कधी करत नाही. ते नम्र असते. जसजसे प्रत्यक्ष मानवजीवन विकसित होत जाते तसतसे माणसाचे जगाचे ज्ञान विकसित होत जाते, बदलत जाते. पण ते जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ व खरे असण्याचा एकमेव निकष हाच असतो की, सिद्धांतन व प्रत्यक्ष प्रयोग-व्यवहार यांच्या दरम्यान विज्ञानाच्या ज्ञानक्रियेचे चक्र सतत फिरत राहणे. माणसाचे प्रत्यक्ष जगणे हेच विज्ञानाचे मूळ व फळ आहे, आरंभ व शेवट आहे. सिद्धांत पुन्हा वास्तवाला सामोरे नेऊन, त्याच्याशी भिडवून त्यांचे खरेपण, त्यांची वस्तुनिष्ठता जोखून घ्यावी लागते.

**वैज्ञानिक दृष्टिकोन – काही गृहीत तत्त्वे**

(४) वैज्ञानिक पद्धत वापरली जाते तेव्हा त्यात काही गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. अशा गोष्टी की, ज्या कधीही प्रयोग वा निरीक्षणांद्वारे सिद्ध होऊ शकत नाहीत! पण ही गृहीततत्त्वे विज्ञानाला आधारभूत व आवश्यक असतात. तशी काही आता आपण पाहू.

उदाहरणार्थ हे विश्व नियमबद्ध आहे, त्यातल्या घडामोडी निश्चित अशा नियमांनुसार घडत असतात असे विज्ञान गृहीत धरत असते. आणि हे नियम शोधून काढण्याचा तर विज्ञानाचा प्रयत्न असतो. आपण म्हणतो दगड टाकला तर तो खाली पडतो. कारण तो निसर्गाचा नियम आहे, गुरुत्वाकर्षणाचा. तो नियम खरा कशावरून? तर आम्ही पुणे लंडन टोकियो वगैरे दहा ठिकाणी गेली दहा वर्षे प्रयोग करून पाहिले आहे व तो सिद्ध केला आहे. आणि उद्या मुंबईत करून पाहिले तरी असेच होईल. पण यामध्ये असे गृहीत धरलेले आहे की, निसर्ग नियमबद्ध आहे, तो नेहमी नियमानुसार चालतो. पण हे खरे कशावरून? हे काही तुम्ही सिद्ध केलेले नाही. आणि ते करताच येणार नाही. कारण त्यासाठी विश्वातल्या प्रत्येक स्थळी व काळाच्या प्रत्येक क्षणी दगड खाली टाकून पाहावा लागेल!

तेव्हा भौतिक विश्व काही निश्चित नियमांनुसार नांदते, चालते व बदलते हे विज्ञानाला पायाभूत असणारे (पण विज्ञान सिद्ध करू शकत नसलेले) एक गृहीततत्त्व आहे. आणि ते वैज्ञानिक दृष्टिकोनाचा भाग आहे. पण मग ते खरे का मानायचे? त्याला एवढेच उत्तर आहे की, गेल्या पाच हजार वर्षांच्या अनुभवावरून विश्व तसे आहे असे दिसते आहे. (कोणी म्हणेल की, पाच हजार वर्षांच्या निरीक्षणावरून हे तत्त्व 'सिद्ध' झाले आहे असे का म्हणू नये? पण ते बरोबर नाही. मुळातच ज्या प्रकारे हा प्रश्न विचारला गेला आहे व ज्या प्रकारे त्याचे उत्तर म्हणून हे गृहीततत्त्व मांडले गेले आहे, त्या विधानाचा जो फॉर्म आहे, तो वैज्ञानिक व्यवहाराच्या कक्षेबाहेरचा आहे. ते तत्त्वज्ञानाच्या प्रांतातले विधान आहे. असो.)

विश्व नियमांनुसार चालते असे म्हणताना 'नियमानुसार' म्हणजे काय हेसुद्धा यांत्रिकपणे, एकदिश, ठोक नियतीवादी प्रकारे समजून घेता कामा नये. अमुक कारणाच्या परिणामी नेमके अमुकच कार्य घडेल असे नेहमी शंभर टक्के सांगता येतेच असे नाही. काही वेळा संभाव्यताच सांगता येते. यंत्राचे नियमपालन, इलेक्ट्रॉन्स वा फोटॉन्सचे नियमपालन, सजीव सृष्टीचे नियमपालन (अन् समाजजीवनाचे नियमपालन तर अगदीच) वेगवेगळे असते. त्यांचे वेगळ्या प्रकारे संशोधन व सिद्धांतन केले पाहिजे. गेल्या शतकातल्या विज्ञानाच्या विकासाने ही गोष्ट आपल्यावर अधिकाधिक ठसवली आहे.

ही 'गृहीत तत्त्वा'ची कल्पना जरा तपशीलवार मांडली, कारण अशीच काही तत्त्वे पुढे अगदी थोडक्यात मांडली आहेत. तीही (विज्ञानाने सिद्ध न केलेली!) गृहीततत्त्वे आहेत, विज्ञानाच्या कार्याला आवश्यक आहेत, आधारभूत आहेत, मार्गदर्शक आहेत.

(५) विज्ञान असेही गृहीत धरते की, आपण ज्याचे ज्ञान मिळवू पहातो ते भौतिक विश्व मानवी जाणिवेच्या बाहेर, स्वतंत्रपणे अस्तित्वात आहे. त्याचे अस्तित्त्व माणसाच्या बुद्धीच्या वा जाणीवेच्या असण्यावर

अवलंबून नाही. उलट माणसाची जाणीव त्याच्या मेंदूवर म्हणजे भौतिक विश्वावर अवलंबून आहे. विश्व हे मला, किंवा आपल्या सगळ्यांना, किंवा कोणा सुपरमाइंडला पडलेले स्वप्न नाही किंवा झालेला भास अथवा भ्रम नाही. ते तिथे आधी आहे आणि त्याच्यात आपण आहोत व विचार करणारे आहोत. विज्ञान ही गोष्ट गृहीत धरते हे कोणालाही जरा विचार केला तरी कळून येईल. आपण जिचा अभ्यास करतो आहे ती वस्तू खरोखर तिथे अस्तित्त्वात आहे की, मुळी नाहीच आहे, अशा शंका आपण काढत बसलो तर आफतच होईल. तसेच हे गृहीत धरले नाही तर 'वस्तुनिष्ठ' ज्ञान याला काही अर्थच रहाणार नाही. त्याचप्रमाणे, व्यक्तिश:देखील मी कल्पना करीन तसेही बाहेरचे जग असत नाही. मी असो किंवा नसो, विश्व स्वतंत्रपणे तेथे नांदत आहे. असे नसेल तर माझे ज्ञान माझ्यापुरते खरे असेल, व्यक्तिगणिक जगाचे ज्ञान वेगवेगळे असेल. परंतु विज्ञान निर्माण करते ते ज्ञान वस्तुनिष्ठ, सुनिश्चित व सार्वत्रिक (*ऑब्जेक्टिव्ह, सर्टन, युनिव्हर्सल*) असते. कारण विश्व आपल्या बाहेर स्वतंत्रपणे अस्तित्त्वात आहे आणि ते सर्वांना एकच आहे, असे विज्ञान गृहीत धरत असते.

जे भौतिक विश्वाविषयी खरे आहे तेच सामाजिक विश्वाविषयीसुद्धा खरे आहे. मात्र येथे असेही लक्षात ठेवले पाहिजे की, ज्या अर्थाने भौतिक वास्तव 'मानवी जाणीवेच्या बाहेर स्वतंत्रपणे अस्तित्त्वात' असते त्या अर्थाने सामाजिक वास्तव 'मानवी जाणीवेच्या बाहेर स्वतंत्रपणे अस्तित्त्वात' असू शकत नाही. कारण माणसांची जाणीवयुक्त कृतिशीलता सामाजिक वास्तव घडवण्यामध्ये सहभागी असते. पण तरीसुद्धा वेगळ्या अर्थाने ते वास्तव संशोधकाच्या जाणीवेच्या बाहेर स्वतंत्रपणे नांदत असतेच. त्यामुळे विज्ञान शोधून काढते ते वस्तुनिष्ठ नियम समाजाला लागू पडतातच, फक्त ते नियमपालन निसर्गसृष्टीपेक्षा वेगळ्या प्रकारे घडत असते.

(६) आणि अर्थातच विज्ञान असेही गृहीत धरते की, माणसाला बुद्धीचा वापर करून बाहेरच्या या जगाचे ज्ञान करून घेता येते! असे मानले नाही तर काय होईल? एखादा म्हणेल तुम्ही खूप सिद्धांत रचलेत हो, पण मुळात हे विश्व अज्ञेय आहे, ते बुद्धिगम्यच नाही. तुमचे सिद्धांत तुमच्यापुरते म्हणजे माणसापुरते खरे असतील पण पलीकडच्या, त्या तिथल्या, वास्तवाशी त्यांचा काहीएक संबंध नाही. पण याउलट, वैज्ञानिक दृष्टी असे मानते की, बाहेर असलेल्या विश्वाचे ज्ञान माणसाला होऊ शकते. आणि चुकतमाकत पण निश्चितपणे बाहेरच्या विराट वास्तवाचे अधिकाधिक यथार्थ व समृद्ध ज्ञान माणूस क्रमाक्रमाने प्राप्त करून घेत चालला आहे. माणूस आणि निसर्ग यांच्यातला हा रोमान्स प्राचीन काळापासूनचा आहे आणि तो चालूच रहाणार आहे.

मानव आणि बाहेरचे भौतिक विश्व यांच्यामध्ये ही जी ज्ञानक्रिया चालू असते ती दोन्ही बाजूंनी चालणारी असते, ती परस्परक्रिया असते. म्हणजेच माणसाच्या निष्क्रिय मनामध्ये एखाद्या आरशात पडावे तसे विश्वाचे प्रतिबिंब पडत नसते, त्याची बुद्धी सिद्धांताची सक्रीय निर्माती असते. पण उलट, माणूस संकल्पनांची आपल्याला हवी तशी मनमानी निर्मिती व रचना करतो असेही नसते, तर ही निर्मिती बाहेरच्या विश्वाकडून नियत होत असते. वेगळ्या शब्दात सांगायचे तर या ज्ञानक्रियेत जग आणि माणूस परस्परांना सामोरे जातात, जणू एकमेकांच्या विरूद्ध उभे ठाकतात, त्यांच्यात अंतर्विरोध वा ताण तयार होतो, संघर्ष चालतो, त्याचे निराकरण होते, आणि नवीन ज्ञानाच्या रूपात त्यांच्यात एकात्मता तयार होते व नांदते. वेगळ्या शब्दात सांगायचे तर ही क्रिया द्वंद्वात्मक असते.

**वैज्ञानिक दृष्टिकोन – आणखी काही गृहीततत्त्वे**

(७) त्याचबरोबर वैज्ञानिक त्याच्या व्यवहारामध्ये हे जाणून असतो की, जगातल्या सगळ्या वस्तूंचे इतर वस्तूंशी संबंध असतात. प्रत्येक वस्तूचे असणे म्हणजे

तिचे इतर वस्तूंशी संबंधित असणेच असते. आपण म्हणतो हा समोरचा कागद एक वस्तू आहे आणि तिला काही गुणधर्म आहेत. पण खरे म्हणजे कागद पांढरा आहे याचा अर्थ माझ्या डोळ्यांचा पडदा व कागद यांच्यात विशिष्ट प्रकारचा संबंध आहे! त्याचे वजन दहा ग्रॅम आहे याचा अर्थ त्याचा व पृथ्वीचा विशिष्ट संबंध आहे. मी आहे याचा अर्थ माझा रंग असा आहे, वजन इतके आहे, मी यांची मुलगी आहे, त्याची बहीण आहे, अमुक कंपनीची मॅनेजर आहे, वगैरे वगैरे. माझे सगळे संबंध तोडून टाकले तर मी असे काही उरतच नाही. (तुम्ही तो मानत असाल तर 'आत्मा' उरतो!) सारांश, वस्तूंकडे स्वतंत्र अलग स्वयंसिद्ध गोष्टी म्हणून न बघता, सर्व वस्तू परस्परसंबंधांच्या जाळ्यांनी जोडलेल्या असतात असे पाहायला हवे. किंवा उलट असे म्हणा की, परस्परसंबंधांच्या जाळ्यांच्या गाठींच्या जागी वस्तू असतात. आणि हे संबंधही कसे असतात? दोन स्वयंसिद्ध स्वतंत्र वस्तू आहेत व त्यांच्यात बाहेरून संबंध जोडला आहे असे नसते, तर त्या वस्तूंचे मुळातले असणेच ह्या संबंधांवर अवलंबून असते, म्हणजे हे संबंध आंतरिक असतात. वस्तूचा अभ्यास करणे म्हणजे तिच्या संबंधांचा अभ्यास करणे असते. अशा दृष्टीने जगाकडे पहाणे आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीने तर खूपच महत्त्वाचे बनले आहे.

(८) त्याचप्रमाणे विज्ञान असे मानत असते की, विश्वातील प्रत्येक गोष्ट ही खरे तर एक प्रक्रिया असते. एकतर तिच्या आत सतत काहीतरी चालू असते, घडत असते. तिच्या अंतर्गत घटकांमध्ये परस्परक्रिया चालू असतात. ती एक क्रियाप्रक्रियांचे गाठोडे असते. त्या अर्थाने ती सतत गतिमान असते. उदाहरणार्थ, मानवी शरीरात प्रत्येक क्षणी चयापचयाच्या, चलनवलनाच्या भौतिक, रासायनिक, जैविक प्रक्रिया होत असतात हे तर सरळच कळते. निष्क्रिय वाटणाऱ्या दगडातसुद्धा अणुपरमाणू इलेक्ट्रॉन्सच्या हालचाली चालू असतात. आकाशगंगेतसुद्धा चालू असतात. त्याचप्रमाणे, वस्तू सतत बदलतही असते, वेगवेगळ्या रूपांमध्ये तिची अवस्थांतरे होत असतात. माणूस अर्भक, बालक, किशोर, कुमार, प्रौढ, वृद्ध अशा अवस्थातून जात असतो, त्याचा हा इतिहास घडत असतो. त्याहीपलिकडे पहाता येते : बांबूची झाडे – लगदा – कागद म्हणून ताव, वहीचे पान वगैरे जीवनक्रिया – रद्दी – कचरा – खत असा या कागदाचा इतिहास आहे. त्या इतिहासाचे संशोधन केले, विश्लेषण केले तर कागद म्हणजे काय हे मला जास्त चांगले समजते. अशा ऐतिहासिक दृष्टीने पहाणे विज्ञानासाठी अधिक फलदायी ठरते. आधुनिक विज्ञान, त्यातले समाजविज्ञान तर सोडाच, पण बरेचसे मूलगामी निसर्गविज्ञानसुद्धा वस्तू म्हणजे प्रक्रिया असते या गृहीततत्त्वाशिवाय पाऊलभरही पुढे जाणार नाही.

आणि आधी वर म्हटल्याप्रमाणे, प्रक्रिया घडत असते याचाच अर्थ असाही होतो की, वस्तूच्या अंतर्गत घटकांचे एकमेकाशी असणारे संबंध बदलत असतात आणि या गाठोड्याचे इतर वस्तूंशी असलेले संबंध बदलत असतात.

(९) विज्ञानाच्या दृष्टीने एक गोष्ट पक्की गृहीत धरलेली असते की, हे विश्व स्वत:हून आहे, स्वनियमित आहे. बाहेरून कोणत्याही शक्तीने ते निर्माण केलेले नाही व चालवलेले नाही. विश्व आणि त्यातील प्रत्येक वस्तू नांदते, चालते व बदलते ती स्वयंगतीने.

म्हणजे वर म्हटल्याप्रमाणे वस्तूमध्ये जी गतिमत्ता असते, जे बदल होत असतात, त्यांची प्रेरक शक्ती, त्यांच्यामागचे कारण, तिच्या अंतर्गतच असते. तिच्या अंतर्गत चाललेल्या प्रक्रियांमुळेच, अनेक घटकांची बनलेली अमुकएक वस्तू म्हणून एकात्मरित्या ती सापेक्षत: स्थिर रूपात नांदत असते. आणि हे तिचे आजचे स्वरूप नष्ट होऊन दुसऱ्या कशात तरी तिचे रूपांतर होण्यासाठी कारणीभूत असणारे ताणतणाव, अंतर्विरोध, संघर्ष हे सुद्धा तिच्या अंतर्गत प्रक्रियांमध्येच

असतात. बाह्य परिस्थितीतल्या घटकांचा काही परिणाम या प्रक्रियांवर होत असतो व तशी वेळ आल्यावरच रूपांतर घडते हे खरे. पण मूळ कारण अंतर्गतच असते. ते जास्त जास्त प्रबळ होत जाते. विज्ञानात असेच मानावे लागते. ज्यांना अणुशास्त्रातील किंवा सूक्ष्मजीवशास्त्रातील प्रक्रिया माहिती असतील त्यांना हे जास्त परिचयाचे वाटेल. पण अगदी बर्फ – पाणी – वाफ असा अवस्थांमधला बदलसुद्धा खोलात जाऊन, परमाणूंच्या पातळीवर, नीटपणे समजून घेतला तरी या म्हणण्यातला सखोल अर्थ कळून येईल.

विश्वातील घटना स्वयंगतीने घडतात, त्याच्या स्वत:च्या अंतर्गत प्रेरणांनी, शक्तींनी व कारणांमुळे घडतात. याचाच अर्थ त्याच्या बाहेर कुणी एक ईश्वर नसतो किंवा अन्य कुठल्या रूपातले जाणीवयुक्त चैतन्य, ब्रह्म, सुपरमाइंड नसते, किंवा त्या दैवी शक्तीचा पृथ्वीवर अवतरलेला दूत नसतो की, जो विश्वव्यापारामध्ये हस्तक्षेप व ढवळाढवळ करू शकेल. पण हेसुद्धा लक्षात ठेवले पाहिजे की, हे विश्व जाणीवेच्या बाहेर स्वतंत्रपणे अस्तित्त्वात आहे, ते नियमबद्ध आहे व त्याचे ज्ञान माणसाला होऊ शकते, ही सर्व विज्ञानाला पायाभूत अशी वैज्ञानिक दृष्टिकोनाने मानलेली गृहीत तत्त्वे आहेत. कोणी जर असे म्हटले की, तुमचे बरोबर आहे पण खुद्द ईश्वराने विश्व निर्माण केले आहे, आणि ते असे बनवले आहे की, ते मानवी मनाच्या बाहेर असावे, स्वत:च्या नियमानुसारच चालावे आणि माणसाला त्याचे ज्ञान व्हावे, तर? याला उत्तर एवढेच आहे की, विज्ञानाला असे गृहीत धरण्याची गरज वाटत नाही, एवढेच नव्हे ते बऱ्याचदा घातकही ठरते. एका मोठ्या फ्रेंच शास्त्रज्ञाने नेपोलियनला आपला नवा ग्रंथ अर्पण केला. तेव्हा नेपोलियन म्हणाला हे सगळे चांगलेच आहे, पण तुम्ही कुठेही तुमच्या ग्रंथात ईश्वराचा उल्लेखसुद्धा केलेला नाही? त्यावर शास्त्रज्ञ उत्तरला, महाराज मला माझ्या सिद्धांताच्या मांडणीत त्या हायपॉथिसिसची गरज वाटली नाही. पण एवढेच. देव नाही असे निखालसपणे विज्ञान सिद्ध करू शकत नाही. किंवा आहे असेही! कारण आधी म्हटल्याप्रमाणे हे प्रश्न विज्ञानाच्या कार्यकक्षेच्या बाहेरचे आहेत.

टीप : वस्तूंची परस्पर-संबंधितता, त्यांचे प्रक्रियास्वरूप असणे व अंतर्गत अंतर्विरोधांमुळे बदलणे या वरील दोन्ही-तिन्ही मुद्द्यांवरून पुढे गेल्यास असे लक्षात येते की, या दृष्टीने तर्कशास्त्रातल्या काही बाबींकडे विशिष्ट रीतीने पहावे लागते आणि तसे पहाणे हे वैज्ञानिक कार्यामध्ये जास्त फलदायी ठरते. एकच उदाहरण घ्यायचे तर : अनेक अवयव, घटक वा पैलू यांनी बनलेल्या वस्तूची समग्र एकात्मता आणि तिच्या प्रत्येक भागाचे स्वतःचे असे वेगळे स्वायत्त वैशिष्ट्यपूर्ण असणे घ्या. यांच्याकडे कसे पहायचे? समग्र वस्तू म्हणजे तिच्या भागांची केवळ बेरीज नसते व प्रत्येक भाग पूर्ण वस्तूचे सर्व गुण असणारा केवळ एक तुकडा नसतो. या गोचीचा विचार कसा करायचा? (whole and parts चा संबंध). किंवा दुसरे घ्या. दिसते तसे नसते म्हणूनच विज्ञानाची गरज लागते. वरवर दिसणाऱ्या, आढळाला येणाऱ्या गोष्टींचे स्पष्टीकरण त्यांच्या मागे, खोलवर आतमध्ये काय घडते आहे त्यावरून विज्ञानात केले जाते. पण मग पृष्ठभागीय वास्तव खोटे असते व अंतस्थ वास्तवच खरे असते का? ब्रह्म सत्य जगन् मिथ्या सारखे? का उलट पंचेंद्रियांचा अनुभवच खरा बाकी सगळे मनाचे खेळ ? का दोहोत काही वेगळे, द्वंद्वात्मक नाते असते? (surface reality and inner reality चा संबंध). ह्याच तऱ्हेने आंतरिक व बाह्य (internal and external), अमूर्त व मूर्त (abstract and concrete), एकात्मता व संघर्ष (unity and struggle), आशय व आकार (content and form) अशा अनेक गोष्टींचा विचार करण्याची एक विशिष्ट दृष्टी प्रगल्भ वैज्ञानिक दृष्टिकोनात समाविष्ट आहे. पण तो तपशीलाचा भाग या लेखाचा विषय नाही.

**वैज्ञानिक दृष्टीशी संलग्न वृत्ती**

(१०) आत्तापर्यंत पाहिलेल्या पद्धतीवजा आणि गृहीततत्त्ववजा गोष्टींबरोबरच वैज्ञानिक दृष्टीमध्ये काही वृत्तींचाही समावेश अनिवार्यपणे असतो. प्रत्येक गोष्टीविषयी असे का, असे कशावरून, अशी सतत प्रश्न विचारणारी चौकस जिज्ञासू वृत्ती ही तर मुळातच विज्ञानाला हवी. त्याचाच एक भाग म्हणजे शंकेखोर, प्रत्येक सांगितलेला सिद्धांत अथवा स्पष्टीकरण तपासून पहाण्याची दृष्टीही हवी. त्याशिवाय आहे ते ज्ञान तपासून पाहणे आणि नवेनवे ज्ञान निर्माण करणे शक्यच होणार नाही. ज्ञान साचून जाईल, साचेबंद होईल, त्याचा प्रवाह खेळता रहाणार नाही व ते कदाचित नासूनही जाईल.

त्याचबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे विज्ञानाला मुक्त व खुल्या (फ्री व ओपन) चर्चेच्या वातावरणाची आत्यंतिक गरज असते. पूर्वीप्रमाणे एकेकट्या शास्त्रज्ञाने अभ्यासिकेत वा प्रयोगशाळेत बसून काम करण्याचे दिवस तर कधीच गेले. विज्ञानाचे कार्य हे आता सरळच सामुदायिकरित्या, एका मोठ्या परिवाराद्वारे चाललेले असते. (पूर्वीही ते मूलत: असेच होते, परंतु अप्रत्यक्षपणे.) त्यामुळे शास्त्रज्ञांमध्ये खुल्या व मुक्त वैचारिक देवाण-घेवाणीचे वातावरण असायला हवे, त्यांच्यामध्ये सत्तेचा दबाव आणणारी उतरंड असण्याऐवजी समता व लोकशाही असायला हवी. अहंकार व स्पर्धा यांच्या ऐवजी नम्रता व सहकार्य हवे. नफ्याऐवजी लोकहिताची प्रेरणा असायला हवी. या सगळ्याचा आग्रहसुद्धा वैज्ञानिक जीवनदृष्टीचा अविभाज्य भाग असतो. तसेच या स्वातंत्र्यावर, मोकळेपणावर आणि इतर मूल्यांवर व्यापक सामाजिक जीवनातील धर्मसत्ता, राज्यसत्ता, अर्थसत्ता किंवा अन्य कोणत्याही शक्तींकडून बंधने येणे किंवा घाला घातला जाणे वैज्ञानिक जीवनदृष्टीला मान्य होणे शक्य नसते. आणि ते कोणत्याही बाह्य कारणांसाठी नव्हे तर खुद्द विज्ञानाचे कार्य चांगले चालावे याकरता आवश्यक असते. अनेक देशांमधला या संदर्भातला अनुभव हेच दाखवतो.

(११) आणि शेवटी सांगायचा परंतु महत्त्वाचा मुद्दा म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोन माणुसकीशी नाते सांगणारा असतो. विज्ञानाचे कार्य, त्याची ज्ञानक्रिया, जर निकोपपणे व समर्थपणे चालायची असेल तर मुळात त्यासाठीच हे आवश्यक असते. जातधर्मवंशलिंगराष्ट्र निरपेक्षपणे सर्व मानवांना सुखाचे व समृद्धीचे, स्वयंविकासाच्या संधीचे व प्रोत्साहनाचे, सौंदर्यपूर्ण व नीतिमान, स्वातंत्र्याचे व आनंदाचे जीवन लाभावे याकरता माणसाने जगाचे ज्ञान करून घ्यायला हवे आणि वापरायला हवे, आणि या व्यापक संदर्भातच विज्ञानाकडे पाहिले जायला हवे. याचे तीव्र भान खऱ्याखुऱ्या वैज्ञानिक जीवनदृष्टीत असते आणि असायला हवे. आजवरचा इतिहास पाहिला तर विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर मानवतेच्या विकासासाठी झाला आहे तसाच अमानुषपणे सत्तेसाठी, नफ्यासाठी, युद्धांसाठी मानवतेविरूद्धही झालेला आहे. काही लोक याचा दोष मूळ विज्ञानालाच देतात, पण ते बरोबर नाही. विज्ञान हा एक सामाजिक व्यवहार आहे, ते कधीच 'शुद्ध' व 'तटस्थ' नसते, असू शकत नाही. त्याला काय स्वरूप येईल व त्याचा वापर कसा होईल ते त्या त्या समाजव्यवस्थेवर अवलंबून असते व मुख्यत: तिच्यातल्या सत्ताधारी गटांच्या हातात असते. म्हणूनच खरीखुरी वैज्ञानिक दृष्टी याबाबत सजग असते.

कुणाला असे वाटेल की, तर्कशुद्ध वस्तुनिष्ठ बुद्धीने ज्ञाननिर्मिती करणाऱ्या विज्ञानाला अशा प्रकारे मानवी मूल्ये चिकटवणे हे कृत्रिम आहे, पण ते तसे नाही. वस्तुनिष्ठ वैज्ञानिक ज्ञानक्रिया व मानवी नीतिमूल्यांची जोपासना यांच्यात अनिवार्य आंतरिक संबंध असतो. (तसेच विज्ञान आणि सौंदर्यमूल्यांची आस धरणारी कला यांच्यातल्या संबंधांविषयी सुद्धा सांगता येईल.) याचे जास्त खोलात जाऊन तात्त्विक स्पष्टीकरण करणे येथे शक्य नाही. पण विज्ञानाचा मूळ उद्देश मानवहित आहे आणि सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी विज्ञान

व तंत्रज्ञानाचा वापर झाला पाहिजे या मूल्याशी खरीखुरी वैज्ञानिक जीवनदृष्टी बांधिलकी मानत असते.

**वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहार**

आत्तापर्यंत वैज्ञानिक दृष्टिकोनाचे जे स्वरूप सांगितले त्याविषयी आणखी काही आजूबाजूच्या गोष्टी सांगणे जरूरीचे आहे.

पहिली गोष्ट विज्ञानाला सर्वसाधारणपणे हे सगळे विवेचन लागू पडते. पण अगदी निसर्ग विज्ञानांमध्येसुद्धा फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी वगैरेंचा प्रत्येकाचा व्यवहार वेगवेगळ्या विशिष्ट पद्धतीने चाललेला असतो, आपल्या वेगळ्या संकल्पना व पद्धती वापरून चाललेला असतो. कारण प्रत्येकाची अभ्यासाची विषयवस्तू वेगळी असते, उद्देश वेगळा असतो. एक वस्तूचे भौतिक गुणधर्म अभ्यासत असते तर एक रासायनिक आणि एक जैविक. (अर्थात आज जास्तजास्त प्रमाणात बायोकेमिस्ट्री, बायोफिजिक्स अशी जोडविज्ञाने अपरिहार्यपणे जन्मली आहेत हे वेगळे.) समाजाचे विश्लेषण करणाऱ्या वैज्ञानिकांना तर एका वेगळ्या प्रकारच्या वास्तवाला सामोरे जावे लागते व त्यानुसार वैज्ञानिक पद्धती वेगळ्याच प्रकारे वापरावी लागते. कारण तेथे मानवी जाणीव-कृतिशीलता आणि भौतिक-सामाजिक वास्तव यांच्यातला संबंध निसर्ग मानव संबंधांपेक्षा वेगळा असतो. प्रश्न जास्त गुंतागुंतीचे असतात. उदाहरणार्थ एखाद्या समाजवैज्ञानिकाने लिहिलेल्या पुस्तकाचा, ते फार जास्त वाचले गेले तर, त्या समाजावर परिणाम होऊन त्याने अतिउत्साहाने मांडलेले सगळे अंदाज चुकीचे ठरू शकतात! मानसशास्त्रात पेशंट व सायकिॲट्रिस्ट (विषय व विषयी) यांच्यातले नाते व परस्पर संवाद यांना संशोधनामध्ये एक वेगळे स्थान असते. असे जरी असले तरी सर्व वैज्ञानिक व्यवहारांमध्ये वर मांडलेला सर्वसाधारण वैज्ञानिक दृष्टिकोन समाईक असतो आणि महत्त्वाचा असतो हे खोटे ठरत नाही.

आणखीही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. आजच्या समाजात प्रत्यक्षात विज्ञानाचे कार्य या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारे आणि त्याच्या 'धाका'खालीच चाललेले असते. प्रत्येक चांगला शास्त्रज्ञ हेच करत असतो. मग तो स्वतः जाणीवपूर्वक, समजून उमजून ही दृष्टी मान्य करत असो वा नसो. निसर्गविज्ञानामध्ये तर हे अपरिहार्यपणे घडतच असते. तेथे, उदाहरणार्थ, जरी शास्त्रज्ञ देवपूजा करून प्रयोगशाळेत आला असला किंवा अंधश्रद्धाळू असला तरीसुद्धा त्याच्या संशोधनात ईश्वराला शिरायला मुळीच वाव मिळत नाही. समाजविज्ञानामध्ये मात्र हे जरा अवघड असते, अवैज्ञानिक विचारांचा शिरकाव होऊ शकतो. खरे तर प्रत्येक विज्ञाननिष्ठ माणसाने व शास्त्रज्ञाने वैज्ञानिक पद्धतीचा तात्त्विक पाया स्पष्टपणे समजून घेऊन ती वापरणे हे शहाणपणाचे होईल. पण त्याऐवजी यांच्यापैकीसुद्धा बरीच माणसे दुभंगलेली व सामान्य माणसाप्रमाणेच गोंधळलेली जीवनदृष्टी बाळगून असतात.

**वैज्ञानिक दृष्टीविषयी काही सदोष कल्पना**

वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या बाबतीत बऱ्याचदा काही चुकीच्या कल्पना लोक बाळगून असतात. काही लोकांना असे वाटते की, प्रश्न विचारणारी चौकस वृत्ती ठेवून, बुद्धी प्रमाण मानून, तर्कशुद्ध विचार करणे एवढीच विज्ञानाची पायाभूत तत्त्वे आहेत. इतर काहीजण पंचेंद्रियांना येतात त्या अनुभवांना प्रमाण मांडण्यावर एकांगी भर देतात. तर काहीजण वस्तुतथ्यांवर म्हणजे फॅक्ट्सवर भर देतात. बरेच लोक असेही मानतात की, वस्तूच्या अनुभवातून मिळणाऱ्या माहितीचे, निरीक्षणातून मिळणाऱ्या वस्तुतथ्यांचे, बुद्धी वापरून तर्कशुद्ध विश्लेषण करणे आणि तयार झालेले सिद्धांत प्रयोगांनी खणखणीत पुराव्याने पडताळून पहाणे म्हणजे झाले विज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे हा एवढाच. थोडक्यात, बुद्धिप्रामाण्यवाद किंवा विवेकवाद,

अनुभवप्रामाण्यवाद आणि प्रत्यक्षवाद (अनुक्रमे *रॅशनॅलिझम, एम्पिरिसिझम, पॉझिटिव्हिझम*) यांच्यापैकी एका तात्त्विक भूमिकेला किंवा त्यांच्या मिश्रणाला हे लोक विज्ञानाचा तात्त्विक पाया मानतात. परंतु हे अपुरेच नव्हे तर चुकीचे सुद्धा आहे. याचे तपशीलवार विवेचन करणे येथे शक्य नाही. पण एकच उदाहरण घ्यायचे म्हणजे, फॅक्ट्स् म्हणजे तरी काय? तुमचा संशोधनामागचा उद्देश काय आहे, तुम्ही काय शोधता आहात, डोळ्यांनी, मायक्रोस्कोपनी का इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोपनी कशाने पहाता आहात, अशा अनेक गोष्टींवरून तुम्हाला काय 'वस्तुतथ्ये' आढळाला येतात हे ठरत असते. किंवा, 'विवेकनिष्ठ विचार करणे' म्हणजे काय याविषयीच्या आपल्या कल्पनाही गेल्या शंभर दोनशे वर्षांत बदलत गेल्या आहेत.

आणखी एका सदोष दृष्टिकोनाचा उल्लेखसुद्धा अत्यावश्यक आहे. विज्ञान हा ज्ञानप्राप्तीचा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे आणि विज्ञान माणसाला जग हवे तसे बदलण्याची प्रचंड शक्ती देते हे सगळे खरेच आहे. पण काही लोक यामुळे विज्ञानाने अति भारावून जातात, त्याचे स्तोम माजवतात, त्याच्या बाकी सगळ्या बाजू व संदर्भ विसरून जातात. जणू विज्ञान हा धर्म असावा, शास्त्रज्ञ त्याचे पुरोहित किंवा शास्त्रीपंडित असावेत, संशोधन संस्था म्हणजे देवळे असावीत आणि सर्वसामान्य जनता अज्ञानी भोळीभाबडी भक्तगण असावी, असा हा दृष्टिकोन असतो. विज्ञान-तंत्रज्ञानाने सगळे प्रश्न सुटतील व दुख:मुक्ती लाभेल असेही त्यांना वाटत असते. याला विज्ञानवाद व तंत्रज्ञानवाद (*सायंटिसिझम* व *टेक्नोक्रॅटिझम*) असे म्हणतात. या भूमिकेमध्ये एक अभिजन शास्त्रज्ञाची भूमिका असते. आणि बऱ्याचदा हे लोक वर उल्लेखलेल्या चुकीच्या तात्त्विक कल्पनांचा वैज्ञानिक दृष्टीच्या, *सायंटिफिक टेंपर*च्या नावाखाली जप करत असतात. परंतु खरा वैज्ञानिक दृष्टिकोन हा फार वेगळाच नव्हे तर याच्या विरुद्ध आहे हे आपल्या आत्तापर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट व्हावे. असला विज्ञानवाद हा आजच्या समाजातील सत्ताधारी मंडळींच्या हिताचा आहे. तो अभिजनवादी आहे, जनवादी नाही.

आणखी एक चुकीची विज्ञानाविषयीची धारणा आपल्या समाजात दिसून येते. खरे तर मानवजातीच्या जन्मापासून विज्ञानाचा जन्म झाला आणि पुढे भारत, ग्रीस, इजिप्त, चीन, अरब देश, नंतर युरोप अशा जगभरातील अनेक संस्कृतींच्या छत्रांखाली विज्ञानाचा विकास झाला. युरोपात चारशे वर्षांपूर्वी झालेल्या वैज्ञानिक क्रांतीनंतर आजचे आपले आधुनिक विज्ञान व तत्जन्य वैज्ञानिक दृष्टिकोन साकारलेला आहे. हे सर्व पूर्वी कुठेच नव्हते, भारतातही नव्हते. हे मान्य करण्याने पूर्वीच्या भारतातील विज्ञानाच्या गौरवशाली इतिहासाला बाधा पोचते असे मानायचे काही कारण नाही. प्राचीन काळापासून मध्ययुगापर्यंत भारतात गणित, खगोलशास्त्र इत्यादी शास्त्रे व इमारती आणि जहाज बांधणी, धातुकाम वगैरे तंत्रज्ञान यांचा विकास झालेला होता. पण यावरून हे खरे ठरत नाही की, काही लोक प्रतिपादन करतात त्याप्रमाणे अगदी वेदांपासून प्राचीन भारतात आज मानवाला ज्ञात असलेले सर्व विज्ञान-तंत्रज्ञान होते. एखाद्या दैवी, आध्यात्मिक वा चमत्कारी शक्तीवर विश्वास ठेवल्याखेरीज असे मानणे शक्यही नाही! अर्थातच या कल्पनांमागे कसलाही टिकण्याजोगा पुरावा नसतो, बनावट पुरावा असतो. विज्ञान-तंत्रज्ञानाविषयी व त्याच्या विकासाच्या प्रक्रियेविषयी फक्त काही ओबडधोबड कल्पना असतात आणि वैज्ञानिक विचारपद्धती व दृष्टिकोन यांची समज जवळपास शून्य असते हे सांगायची गरज नाही.

आजच्या आपल्या समाजात विज्ञानाविषयीच्या या व इतरही अनेक कमीअधिक चुकीच्या वेगवेगळ्या धारणा नांदत आहेत. आणि त्या काहीएका विशिष्ट विचारसरणींशी आणि साहजिकच एकेका सामाजिक-राजकीय प्रवाहांशीही जोडलेल्या आहेत. नमूद करण्याची खेदाची गोष्ट अशी की, देशात एकीकडे अत्याधुनिक

विज्ञान-तंत्रज्ञानावर काम चालू असताना, या सदोष आकलनांचेच अधिराज्य आज जनमानसावर बहुतांशी आहे. आणि खऱ्याखुऱ्या वैज्ञानिक पद्धतीचा वापर आणि दृष्टिकोनाचा प्रभाव फारच थोडा आहे.

**वैज्ञानिक दृष्टिकोनाचा थोडासा इतिहास**

या लेखात आपण खऱ्याखुऱ्या वैज्ञानिक पद्धतीची व दृष्टिकोनाची थोडक्यात ओळख करून घेण्याचा प्रयत्न केला. पण खरे म्हणजे त्याबद्दल अधिक स्पष्टता विज्ञानविषयक तात्त्विक विचारमंथनाच्या ('फिलॉसॉफी ऑफ सायन्स'च्या) इतिहासाचा अभ्यास करूनच आपल्याला येऊ शकेल.

तसे पाहिले तर माणसाच्या एकंदर ज्ञानव्यवहाराचा आणि विज्ञानाच्या व्यवहाराचा तात्त्विक शोध प्राचीन काळापासून घेतला गेला आहे. ॲरिस्टॉटलसारखे ग्रीसमधले तत्त्वज्ञ असोत किंवा भारतातली दर्शने, विशेषतः सांख्य, न्याय-वैशेषिक, बौद्ध अशी दर्शने असोत. विश्वाचे स्वरूप काय आहे (सत्ताशास्त्र), माणसाला त्याचे ज्ञान होते ती प्रक्रिया काय असते, सत्य म्हणजे काय (ज्ञानमीमांसाशास्त्र), तर्कशास्त्र, यांचा पुष्कळ विचार झालेला आहे.

सुमारे पंधराव्या सोळाव्या शतकात युरोपात सुरू झालेल्या नव्या युगात कोपर्निकस, गॅलिलिओ, न्यूटन वगैरेंच्या कामातून विज्ञानात एक क्रांती घडून आली आणि नंतर आधुनिक विज्ञानाची झपाट्याने प्रगती झाली. आधी प्रामुख्याने यंत्रशास्त्र किंवा गतिशास्त्र (मेकॅनिक्स), खगोलशास्त्र, *क्लासिकल फिजिक्स, केमिस्ट्री, बायॉलॉजी* यांचा विकास झाला. वैज्ञानिक दृष्टिकोन हा प्रत्यक्ष विज्ञानाच्या विकासाला समांतररित्या विकसित झालेला आहे. चर्चप्रणित धर्माधिष्ठित तत्त्वज्ञानाविरोधात देकार्त, ह्यूम, कांट, मिल, कोम्त व इतर तत्त्वज्ञांनी नव्या विज्ञानाच्या व्यवहाराचा विचार केला. विवेकवाद, अनुभवप्रामाण्यवाद, प्रत्यक्षवाद, यांत्रिक भौतिकवाद किंवा जडवाद यांची मांडणी झाली. तर्कशास्त्रात प्रगती झाली, हेगेलसारख्यांनी द्वंद्वात्मक पद्धती विकसित केली.

एकोणिसाव्या शतकात कार्ल मार्क्सने तत्कालीन निसर्गविज्ञान व समाजविज्ञान यांचा असाच तात्त्विक पातळीवर विचार करून वैज्ञानिक पद्धती व वैज्ञानिक दृष्टिकोन यांची मुळांपासून नवी मांडणी केली. एका अर्थाने विज्ञानाच्या इतिहासातल्या पहिल्या क्रांतीनंतर आता ही दुसरी क्रांती घडून आली. हे कसे घडले? मार्क्सचा व त्याचा मित्र एंगल्स यांचा तत्कालीन निसर्गविज्ञानांचा अद्ययावत अभ्यास होता. परंतु मार्क्सने स्वत: मात्र समाजविज्ञानात संशोधन केले व नवे सिद्धांत मांडले, भांडवलशाही समाजाचे व विशेषत: त्यातील अर्थव्यवस्थेचे वैज्ञानिक विश्लेषण त्याने केले. पण ते काम त्याला निसर्गविज्ञानांवरून उभी झालेली वैज्ञानिक पद्धती वापरून करायचे होते. त्यासाठी त्याला ही पद्धती खोलात जाऊन तात्त्विकदृष्ट्या समजून घ्यावी लागली व म्हणून तिची नव्याने मांडणी करून घेण्याची गरज भासली. सारांशाने जडवादी आणि द्वंद्वात्मक असे या नव्या वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या तात्त्विक पायाचे वर्णन करता येईल. (तसे हे दोन्ही पैलू एकमेकात अलग न करता येण्याजोगे गुंतलेले आहेत, पण ढोबळमानाने वरील विवेचनातील ३,४,५,६,९ ह्या मुद्द्यांना जडवादी पैलू आणि १,२,७,८,९ ह्यांना द्वंद्वपद्धतीचे पैलू म्हणता येईल.)

साहजिकच, पूर्वीचा म्हणजे प्राचीन काळातला चार्वाक वा काही ग्रीकांचा, किंवा आधुनिक काळातला विश्वाला यंत्ररूप मानणारा ओबडधोबड जडवाद आणि खऱ्या वैज्ञानिक दृष्टीतला आधुनिक जडवाद यांच्यात जमीनअस्मानाचा फरक आहे. तसेच प्राचीन बौद्ध, ग्रीक किंवा हेगेल याची द्वंद्वपद्धती आणि वैज्ञानिक द्वंद्वपद्धती यांच्यातही फार मोठा मूलभूत फरक आहे. (जडवाद, जडवस्तुवाद, भौतिकवाद, किंवा काही भारतीय भाषांमध्ये वस्तुवाद, हे शब्द इंग्रजीतील मटिरियॅलिझमसाठी वापरले जातात आणि द्वंद्वात्मक

पद्धती किंवा द्वंद्वपद्धती हा शब्द डायलेक्टिक्ससाठी.) या लेखात याच मार्क्सप्रणित वैज्ञानिक पद्धतीची व दृष्टिकोनाची थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

टीप : या वैचारिक क्रांतीला आणखी एक पैलू आहे, त्याचा केवळ उल्लेखच येथे करता येईल. तर्कनिष्ठ मूल्यविरहित निपक्षपाती व समोरच्या वास्तवाचे ज्ञान मिळवू बघणारे ते विज्ञान. अत्यंत सर्वसाधारण पातळीवर संकल्पनांच्या हवेतल्या अमूर्त तत्त्वांना विचारात पकडू पहाणारे ते तत्त्वज्ञान. आणि प्रत्यक्ष जीवनाला ज्ञानाबरोबर मूल्येही सांगून साक्षात मार्गदर्शन करणारी व (सार्वत्रिकतेचा दावा करत असली तरी) समाजातल्या एखाद्या समूहाची पक्षपाती असणारी ती विचारसरणी. हे तीन सामाजिक जाणीवांचे आकार असतात व ते एकमेकांना फटकून असतात, एकाने दुसऱ्याच्या क्षेत्रात अतिक्रमण करायचे नसते, असे साधारणत: मानले जाते. मार्क्सची दृष्टी या तिन्हीच्या पलिकडे जाणारी आहे, तिन्हीच्या चौकटी मोडून टाकणारी आहे. आणि त्यामुळे एकाचवेळी ती निखालसपणे वैज्ञानिक आहे, तिला विश्वदृष्टीचा भक्कम तात्त्विक पाया आहे, आणि ती बिनदिक्कतपणे सर्वहारा जनतेचा पक्षपात करणारी आहे. आणि हे त्याला शक्य झाले आहे याचे रहस्य तो विचार व कृती, सिद्धांतन आणि व्यवहार (*थिअरी* व *प्रॅक्टिस*) यांच्यात द्वैत न मानता द्वंद्व मानतो यात आहे.

वर म्हटल्याप्रमाणे आधी प्रामुख्याने यंत्रशास्त्र किंवा गतिशास्त्र (*मेकॅनिक्स*), खगोलशास्त्र, *क्लासिकल फिजिक्स*, *केमिस्ट्री* यांचा विकास झाला होता. नंतर, एकोणिसाव्या शतकात डार्विनने उत्क्रांतिवादाची मांडणी केली. विसाव्या शतकामध्ये सापेक्षतावाद, *क्वांटम फिजिक्स*, नवीन खगोलशास्त्र व विश्वरूपशास्त्र, *मॉलिक्युलर बायोलॉजी, जेनेटिक्स* इत्यादी शास्त्रे आली. वैद्यकशास्त्र, शेतीशास्त्र प्रगत झाली. संगणक शास्त्र आले. या सगळ्याच्या परिणामी एक जास्त समृद्ध आणि विकसित अशी वैज्ञानिक पद्धती वापरली जाऊ लागली. एक सामाजिक व्यवहार म्हणूनही विज्ञानाचे नवेनवे बरेवाईट आविष्कार समोर येत गेले. या सर्वाचा अन्वयार्थ लावण्यासाठी विसाव्या शतकात कून्ह, पॉपर, लॅकाटोस, फेराबँड इत्यादींनी विज्ञानाच्या कार्याचा तात्त्विक विचार केलेला आहे. अगदी अलिकडे उत्तर-आधुनिकता ओलांडून सत्याच्या पलिकडे (*पोस्टट्रूथ*)पर्यंत मंडळी जाऊन पोचलेली आहेत.

पण ह्या सर्व नवीन विचारमंथनातून उभ्या झालेल्या समस्यांना कवेत घेत, त्या वादांमध्ये तावून सुलाखून, मूलत: मार्क्सने मांडलेली वैज्ञानिक पद्धती व तिच्यामागची तात्त्विक दृष्टीच आजसुद्धा सर्वात यथार्थ व सक्षम ठरत आली आहे असे मला तरी वाटते. त्याने स्वत: विसावे शतक व त्यातील विज्ञानाचा विकास प्रत्यक्षात न पहाताही हे खरे आहे हा त्याच्या द्रष्टेपणाचा भाग आहेच. पण गेल्या त्याने मांडलेली विज्ञानदृष्टी गेल्या दीडशे वर्षांमध्ये इतर अनेकांच्या योगदानाने विकसित होत गेली आहे आणि अधिक समर्थ व समर्पक बनत गेली आहे हासुद्धा भाग अर्थातच आहे. याहीपुढे विज्ञानाचा जसाजसा विकास होत जाईल तसतशा या वैज्ञानिक दृष्टिकोनातील त्रुटी लक्षात येतील, तो आणखी विकसित होत जाईल आणि आज सांगताही येणार नाही अशी नवीनवी रूपे घेईल यात काहीच संशय नाही. कारण विज्ञान हा काही धर्म नाही, त्याची पोथी होत नाही, तो एक खुला संशोधन प्रकल्प, *ओपन रिसर्च प्रॉजेक्ट* आहे. या लेखात याच मार्क्सप्रणित वैज्ञानिक पद्धतीची व दृष्टिकोनाची थोडक्यात ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात तो थोडक्यात असल्याने या विवेचनाला मर्यादाही आहेत.

**वैज्ञानिक दृष्टिकोन जगणे**

अगदी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे वैज्ञानिक दृष्टिकोन एकीकडे माणसाच्या समग्र मनोव्यापाराचा, एकूण जाणीवेचा भाग आहे आणि दुसरीकडे त्याच्या समग्र

सामाजिक जीवनाचा भाग आहे. पण हा व्यापक संदर्भ जरी बाजूला ठेवला तरी, केवळ एक शास्त्रज्ञ किंवा विज्ञानप्रेमी म्हणूनसुद्धा, फक्त अभिजन वृत्तीचा *करियरिस्ट स्पेशालिस्ट* शास्त्रज्ञ वा इंजिनियर किंवा उथळ आंधळी विज्ञान-भक्ती करणारा विज्ञानप्रेमी म्हणून जगणे हे काही खरे नाही. एकीकडे वैज्ञानिक दृष्टिकोन आपण समग्रतेने समजूनउमजून घेऊन वापरला पाहिजे, चिकित्सक जिज्ञासू वस्तुनिष्ठ दृष्टी ठेवायला पाहिजे. ती वृत्ती अंगी बाणवली पाहिजे. रोजच्या जीवनात विचार करताना, जग व समाज प्रत्यक्ष समजून घेताना, वैज्ञानिक पद्धत वापरली पाहिजे. आणि दुसरीकडे, विज्ञानाचा प्रत्यक्ष व्यवहार माणुसकीला साजेसा कसा होईल, तो सामाजिक पातळीवर जनहिताला पोषक व पूरक कसा होईल, याचा विचार विज्ञानशाळेत आणि बाहेरही केला पाहिजे. सत्ताकांक्षा, नफेखोरी, स्वार्थ यांच्या दावणीशी विज्ञानाला बांधणाऱ्या गोष्टींशी असहकार करून, जनवादी विज्ञानाची बांधिलकी मानून, प्रत्यक्षात त्यासाठी सक्रीय असणारा विज्ञाननिष्ठ माणूस बनले पाहिजे. कारण खराखुरा वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगणे याचा अर्थ आतून बाहेरून समंजस वैज्ञानिक होणे आणि जनवादी वैज्ञानिक होणे हाच आहे.

पण व्यापक अर्थाने, खराखुरा वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी रूजवण्याचा प्रश्न हा भोवताली अफाट पसरलेल्या वस्तुजाताचे आणि अनेक रूपांनी फुलणाऱ्या मानवजीवनाचे भान फक्त बुद्धीने नव्हे तर स्वतःच्या संपूर्ण असण्यानिशी ठेवण्याचा असतो. एक अख्खी जीवनदृष्टी उराशी बाळगून जगण्याचा तो प्रश्न असतो. या परिपूर्ण जीवनदृष्टीकडे एकीकडून पाहिले की, निखळ ज्ञानपिपासू, तर्कनिष्ठ, बुद्धिवादी वैज्ञानिक दृष्टिकोन हे तिचे अंग दिसते. तिच्याकडे दुसरीकडून बघितले तर माणुसकीशी बांधिलकी सांगणारा कलानीतीमूल्यांनी नटलेला मानवतावादाचा चेहरा दिसतो. तिसरीकडून लक्षपूर्वक पाहिले की, आजच्या अमानुष व अवैज्ञानिक समाजाच्या पलीकडे पहाणारा, त्याच्या गाभ्याशी असलेल्या भांडवलशाहीविरूद्ध उभा ठाकलेला, क्रांतिकारक समाजवाद दिसतो. ही वैज्ञानिक मानवतानिष्ठ समाजवादी समग्र जीवनदृष्टी तात्त्विक आणि आत्मिक पातळीवर आत्मसात झाली पाहिजे. आत्मिक (*स्पिरिच्युअल*) हा शब्द कोणाला धर्माच्या वासामुळे खटकत असेल तर असे म्हणा की, केवळ बुद्धीनेच नव्हे तर स्वतःच्या मूळ असण्याच्या आंतरिक गाभ्यापर्यंत ही जीवनदृष्टी माझी झाली पाहिजे. आणि त्याहीपेक्षा महत्त्वाची, जीवनाला खरा अर्थ देणारी बाब म्हणजे माझे प्रत्यक्ष जगणे तिच्या आधारे, तिच्या अनुसार झाले पाहिजे.

●


परिवर्तनाचा वाटसरूस हार्दिक सदिच्छा!

# पुणे महानगरपालिका कामगार युनियन

स्थापना : १० डिसेंबर १९४३ (मान्यताप्राप्त)

**कॉ. उदय भट** — अध्यक्ष
**कॉ. मुक्ता मनोहर** — जनरल सेक्रेटरी
**कॉ. चंद्रकांत गमरे** — कार्याध्यक्ष

श्रमिक, फा. प्लॉ. नं. ८२२, शिवाजीनगर,
पुणे ४११०५२
फोन : ०२० २५५३ ४६५२

ट्रेड युनियन सेंटर
१०१, शिवाजीनगर, पुणे ४११००५
फोन : ०२० २५५३३५६०




'वैज्ञानिक दृष्टिकोन' या सुधीर बेडेकरच्या लेखाला दोन संदर्भ आहेत. एक म्हणजे २० ऑगस्ट, डॉ. नरेंद्र दाभोळकर शहीद दिन हा 'वैज्ञानिक दृष्टिकोन दिन' म्हणून २०२०पासून भारतभरातील लोकविज्ञान चळवळी पाळतात. या स्वागतार्ह उपक्रमामुळे एकूणच वैज्ञानिक विचारपद्धती व वैज्ञानिक दृष्टिकोन याबाबत पुरोगामी, लोकशाही वर्तुळामार्फत समाजामध्ये अधिक सखोल विचार व चर्चा होऊ लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर वैज्ञानिक विचारपद्धती व वैज्ञानिक दृष्टिकोन याबाबत मार्क्सवादी समज एका बाजूला तर व्यापक, पुरोगामी विज्ञानवादी वर्तुळात व लोकविज्ञान चळवळीत असलेली वैज्ञानिक दृष्टिकोनाबाबतची समज दुसऱ्या बाजूला... या दोघांत काय समाईक आहे आणि काय नाही हे समजावून घेण्याची आणि त्या बाबत चर्चा होण्याची गरज आहे. सुधीरचा हा लेख त्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. दुसरा संदर्भ म्हणजे मूलभूत मार्क्सवाद, मार्क्सवादी विश्लेषण पद्धती यांची तोंड-ओळख करून देणारे जे काही साहित्य मराठीत व इंग्रजीत उपलब्ध आहे त्यात वैज्ञानिक विचारपद्धतीबद्दल, त्यातील द्वंद्वात्मक भौतिकवादी पद्धतीबद्दल असलेली मांडणी अवघड, काहीशी अनाकलनीय व अनेकदा चुकीची असते. सुधीरचे लेख हे त्याला एक सरस पर्याय मांडायच्या दृष्टीने खूप महत्त्वाचे आहेत असे मला वाटते. म्हणूनही त्या बाबत चर्चा व्हायला हवी.

### वैज्ञानिक विचारपद्धती व वैज्ञानिक दृष्टिकोन मधील फरक

वर उल्लेखिलेला पहिला संदर्भ थोडा समजावून घेऊया. अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील, लोक विज्ञान-चळवळीतील कार्यकर्ते तसेच विज्ञान-विरोधी वातावरणाला/दृष्टिकोनाला विरोध करणारे फासीवाद विरोधी, विज्ञानवादी लोक असे अनेक जण विज्ञान, तंत्रज्ञान, वैज्ञानिक विचारपद्धती व वैज्ञानिक दृष्टिकोन हे शब्द वारंवार वापरत असतात. सुधीरच्या या लेखात काही प्रमाणात या संज्ञांचा अर्थ नेमकेपणाने व त्यातल्या त्यात सुलभपणे मांडला आहे. 'वैज्ञानिक दृष्टिकोन - तर्कशुद्धतेची व प्रयोगशीलतेची गरज' या शीर्षकाखाली त्याने मांडलेले पहिले तीन मुद्दे हे वैज्ञानिक विचारपद्धतीबद्दलचे आहेत. खरं तर या तीन मुद्यांसाठी 'वैज्ञानिक विचारपद्धती'ची महत्त्वाची सूत्रे असे शीर्षक सुधीरने दिले असते तर बरे झाले असते. ही सूत्रे थोडक्यात सांगायची तर प्रत्यक्ष जीवनक्रिया - अनुभव, निरीक्षण - वस्तुतथ्ये म्हणजे फॅक्ट्स - आडाखे,

अनंत
फडके
anant.phadke@gmail.com

# सुधीर बेडेकरकृत मांडणीचे महत्त्व

हायपॉथिसिस – विशिष्ट प्रकारे नियोजित कृती म्हणजे प्रयोग – त्यांची निरीक्षणे – त्यांची संगती लावणे, विश्लेषण करणे, त्यांच्या मागचे कार्यकारण भाव व नियम शोधणे, सिद्धांतांच्या रूपात ते मांडणे – पुन्हा ते पडताळून पहाणे, पुराव्यानिशी सिद्ध करणे, ----- अशी सुधीरने या लेखात मांडली आहेत. या वैज्ञानिक कसोट्या, पथ्ये वैज्ञानिकाने पाळायची असतात. एखाद्या वैज्ञानिकाने त्यातील एखादे पथ्य पाळले नाही तर त्या कारणासाठी त्याला प्रश्न विचारले जातात.

'वैज्ञानिक दृष्टिकोन – काही गृहीत तत्त्वे' या उपशीर्षकाखाली सुधीरने त्यानंतर मांडलेले पुढील तीन मुद्दे (मुद्दे क्र ४ ते ६) म्हणजे तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाची महत्त्वाची गृहीत-कृत्ये आहेत. ती सिद्ध करायची गोष्ट नाही. उदा. मानवी जाणिवेच्या पलिकडे भौतिक जग अस्तित्त्वात आहे का ते मानवाने कल्पिलेले देवाने निर्माण केलेले आहे? हा प्रश्न विज्ञानाच्या क्षेत्रातला प्रश्न नाही तर तो तत्त्वज्ञानात्मक प्रश्न आहे. आधुनिक वैज्ञानिक दृष्टिकोनात त्याचे भौतिकवादी उत्तर गृहीत धरले असते. आपण पहात असलेली समोरची एखादी वस्तु वा एखादे रसायन वा एखादा प्राणी हे मानवी जाणीवेच्या, इच्छेच्या पलिकडील वास्तव आहे. ते सिद्ध करायची गरज आधुनिक विज्ञानाला नाही; आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीने ते एक गृहीत आहे. असा भौतिकवादी दृष्टिकोन हा आधुनिक विज्ञानाचा तत्त्वज्ञानात्मक पाया आहे. हा मुद्दा मांडताना सुधीर म्हणतो – विश्वातील घटना स्वयंगतीने घडतात, त्याच्या स्वत:च्या अंतर्गत प्रेरणांनी, शक्तींनी व कारणांमुळे घडतात. याचाच अर्थ त्याच्या बाहेर कुणी एक ईश्वर नसतो किंवा अन्य कुठल्या रूपातले जाणीवयुक्त चैतन्य, ब्रह्म, सुपरमाइंड नसते, किंवा त्या दैवी शक्तीचा पृथ्वीवर अवतरलेला दूत नसतो की, जो विश्वव्यापारामध्ये हस्तक्षेप व ढवळाढवळ करू शकेल. पण हेसुद्धा लक्षात ठेवले पाहिजे की, हे विश्व मानवी जाणीवेच्या बाहेर स्वतंत्रपणे अस्तित्त्वात आहे, ते नियमबद्ध आहे व त्याचे ज्ञान माणसाला होऊ शकते, ही सर्व विज्ञानाला पायाभूत अशी वैज्ञानिक दृष्टिकोनाने मानलेली गृहीत तत्त्वे आहेत.

हे गृहीत-तत्त्व युरोपमधील 'रेनेसाँ'च्या प्रदीर्घ प्रक्रियेमध्ये बऱ्याच चर्चा, वाद, इ. मधून तावून-सुलाखून मान्य झालेले आहे. म्हणून लोकविज्ञान संघटनेने १९८०मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'लोकविज्ञान चळवळ कशासाठी' या पुस्तिकेत वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय हे मांडताना हे म्हटले होते –

१) आपल्या भोवती जे भौतिक जग आहे ते

निश्चित अशा वस्तुनिष्ठ नियमांनुसार चालते. प्रत्येक घटनेमागे एक भौतिक कारणपरंपरा असते.

२) या कारणपरंपरांचे व नियमांचे आकलन मानवाला होऊ शकते व वैज्ञानिक विचारपद्धती हाच असे आकलन करून घेण्याचा योग्य व सर्वोत्तम मार्ग आहे. विश्वव्यापारामागे काही तरी एक गूढ अतिभौतिक दैवी शक्ती आहे असे न मानता किंवा ग्रंथप्रामाण्य वा व्यक्तिप्रामाण्य न मानता या विचारपद्धतीतून मिळणारे ज्ञान हेच खरे व खात्रीलायक ज्ञान असते.

३) या वैज्ञानिक शोध प्रक्रियेतून ताबडतोबीने सर्व उत्तरे मिळतीलच असे नाही. काही प्रश्न आज अनुत्तरित राहतील, काही उत्तरे ही अपुरी वा चुकीची होती हे विज्ञान जास्त विकसित झाल्यानंतर वैज्ञानिकांच्या लक्षात येते. त्यामुळे भौतिक जगाचे वास्तविक अस्तित्त्व, त्याचे वस्तुनिष्ठ यथार्थ ज्ञान मिळवण्याचा वैज्ञानिक विचारपद्धती हाच एकमेव खात्रीलायक मार्ग आहे.

वरील विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन हा एक तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन आहे, एक डोळस विश्वास आहे. एखाद्या ठोस वैज्ञानिक सिद्धांताप्रमाणे त्याचा खरेखोटेपणा ताबडतोबीने तपासता येत नाही. पण आजवरच्या प्रदीर्घ मानवी इतिहासक्रमात त्याचा खरेपणा सिद्ध झालेला आहे.

डॉ. दाभोळकर अशाच प्रकारची मांडणी करत असत. हे सर्व सांगायचे कारण म्हणजे सुधीरने मांडलेली ही तत्त्वे म्हणजे भूमिका ही काही खास वेगळी मार्क्सवादी भूमिका नाही. सर्व 'विज्ञानवादी' लोकांमधील समाईक अशी ही भूमिका आहे.

**भौतिकवादी द्वंद्वात्मक विचार-पद्धतीतील तत्त्वे**

'वैज्ञानिक दृष्टिकोन - आणखी काही गृहीततत्त्वे' या उपशीर्षकाखाली सोबतच्या लेखात सुधीरने मांडलेले पुढील तीन मुद्दे (मुद्दे क्र. ७ ते ९) हे तत्त्वज्ञानात्मक स्वरूपाची गृहीत-कृत्ये आहेत. ती द्वंद्वात्मक विचारपद्धतीचा भाग आहेत. नेहेमीच्या वैज्ञानिक विश्लेषणात, विचारपद्धतीत त्यांचा फारसा वापर होत नाही. विशेषत: मुद्दा क्रमांक ९मधील 'अंतर्विरोध' या संकल्पनेबाबत हे खरे आहे. उदा. वैज्ञानिक मांडणीमध्ये परस्पर-विरोधी विधाने आली तर अशी मांडणी वैज्ञानिक मांडणीत बसत नाही असे सामान्यत: समजले जाते. पण द्वंद्वात्मक पद्धतीने बघितले तर दोन अंतर्विरोधी प्रक्रिया एकमेकांना भिडणे व त्यातून एकूण प्रक्रिया विकसित होऊन ती वरच्या पातळीवर एकात्म होऊन विकास घडतो हे लक्षात येते. हा थोडासा गुंतागुंतीचा मुद्दा सध्या इथेच सोडून देऊ. सुधीर बेडेकरने 'समाजवादाचे तत्त्वज्ञान' या मागोवा प्रकाशनाच्या पुस्तिकेला (१९८१) लिहिलेल्या प्रस्तावनेतील शेवटच्या तीन पानात याबद्दल काही स्पष्टीकरण दिले आहे, ते जिज्ञासू वाचकांनी बघावे. (माझ्याकडे त्याची सॉफ्ट कॉपी आहे).

१९व्या शतकापर्यंत निसर्ग-विज्ञानात जेवढा विकास झाला होता त्यामध्ये या द्वंद्वात्मक पैलूबाबत निसर्ग-विज्ञानाच्या चर्चेत समावेश होण्याची फारशी गरज नव्हती. पण विसाव्या शतकात न्यूटन प्रणित वैज्ञानिक चौकटीच्या पलिकडे जाणारी जी प्रगती झाली (quantum physics, relativity इ.) त्यात निर्माण झालेल्या प्रश्नांची उकल करण्यासाठी या द्वंद्वात्मक समजेची मदत होते. पण असे अपवाद वगळता निसर्ग-विज्ञानाचा अभ्यास करताना द्वंद्वात्मक विचार-पद्धतीची गरज पडत नाही. सामाजिक वास्तवाची उकल करण्यासाठी मात्र या द्वंद्वात्मक मुद्यांची गरज मार्क्सच्या काळापासून स्पष्ट होती. हा मुद्दा या लेखात सुधीरला अधोरेखित करायचा होता. ते झाले नाही. एकंदरित पहाता निसर्ग-विज्ञान व मार्क्स-प्रणित समाज-विज्ञान यांच्यामध्ये काय समाईक आहे व काय नाही व का नाही हे सुधीरच्या इतर लिखाणात असलेले मुद्दे या लेखात अधिक स्पष्टपणे आले असते तर सामान्य जिज्ञासू वाचकाला खूपच मदत झाली असती असे मला वाटते.

प्रश्न असा उभा राहतो की, वरील सर्व गोष्टींचा मार्क्सवादी विचारपद्धतीशी काय संबंध? संबंध असा की, सामाजिक वास्तवाचे वैज्ञानिक विश्लेषण करतांना सुद्धा सुधीरच्या या लेखात मांडलेली सर्व पथ्ये पाळावी लागतात. मार्क्सवादी वैज्ञानिक विचारपद्धती व दृष्टिकोन याची तोंड-ओळख करून देणाऱ्या बहुतेक पुस्तिकांमध्ये हे मांडलेले नसते. त्यामुळे निसर्ग-विज्ञानामध्ये वापरल्या जाणाऱ्या वैज्ञानिक विचारपद्धतीपेक्षा मार्क्सवादी विश्लेषण पद्धती काही तरी वेगळीच गोष्ट आहे असा गैरसमज होतो. मार्क्सवादी वैज्ञानिक विचारपद्धती व दृष्टिकोन याची तोंड-ओळख करून देताना ही पुस्तके आपल्याला अगदी अपरिचित अशा संकल्पनांपासून, द्वंद्वात्मक विचार-पद्धतीतील संकल्पनांपासून सुरुवात करतात. त्यामुळे हा विषय अकारण जास्त अवघड वाटतो.

मार्क्सवादी द्वंद्वात्मक भौतिकवादी विश्लेषण पद्धती म्हणजे काय हे समजावून घेऊ पहाणारे मुळातच फारच थोडे जण असतात. तसा प्रयत्न करणाऱ्या बऱ्याच जणांना ती फारशी समजत नाही. याचे एक कारण म्हणजे त्यांना विज्ञानाची पद्धत म्हणजे जे माहीत असते त्यात व मार्क्सवादी विचारपद्धतीत काय साम्य व काय फरक आहे हे या द्वंद्वात्मक भौतिकवादी विश्लेषण पद्धतीची ओळख करून देणारी पुस्तके सांगत नाहीत. तत्त्वज्ञान व आधुनिक विज्ञान हे ज्ञानाच्या क्षेत्रातील दोन संलग्न पण दोन वेगळे प्रांत का मानले जातात? मार्क्सने तत्त्वज्ञानात्मक प्रश्न एका वेगळ्या चौकटीत नेऊन हे द्वैत या वेगळ्या पातळीवर कसे पार केले (ीरपीलशपव) हे उलगडून न सांगताच द्वंद्वात्मक भौतिकवादी विचार म्हणजे विज्ञानाचे विज्ञान मांडणारे तत्त्वज्ञान आहे असे मांडून या पुस्तकांमध्ये सुरुवात केलेली असते. (उदा. चरीुळीीं झहळश्रीेहिू -प खप-ीवीलींळेप, छशु तळीींरी झींलश्रळलरींळेपी) त्यामुळे सामान्य वाचकाला काही बोध होत नाही. काही तरी भारी विचार आहे असे त्याला वाटते एवढेच! पण त्याचबरोबर असेही होते की, मार्क्सवादी वैज्ञानिक विश्लेषणातील द्वंद्वात्मक भौतिकवादी पैलू भोवती एक प्रकारचे अगम्यतेचे वलय पसरते. त्यामुळे या विचारपद्धतीची समज निर्माण होण्यामध्ये एक अडथळा तयार होतो.

सुधीरची या बाबतची मांडणी काही वेगळी आहे का? तर हो! ती कशी ते थोडक्यात पाहू.

निसर्ग आणि समाज कोणत्या नियमांनुसार चालतात हे द्वंद्वात्मक भौतिकवादी तत्त्वज्ञान व द्वंद्वात्मक ऐतिहासिक भौतिकवाद सांगतो असा दावा अशा पारंपरिक, अधिकृत मार्क्सवादी मांडणीमध्ये असतो. विज्ञानात 'नियम' याचा अर्थ दोन वस्तू किंवा प्रक्रिया यांच्या मधील आंतरिक, अटळ संबंधांचे सूत्र असते की, जे पाळलेच जाते. हे सूत्र वैज्ञानिक अभ्यासातून गवसले की, त्याचा उपयोग करून काही ईप्सित साध्य करून घेता येते. उदा. न्यूटनचे गती-विषयक नियम, किंवा पास्कलचा दाबाविषयीचा नियम वापरुन विशिष्ट परिस्थितीत काय घडेल हे नेमकेपणाने सांगता येते. किंवा नियमांचे पालन करुन काही ईप्सित गोष्टी साध्य करून घेणारी यंत्रे बनवता येतात. द्वंद्वात्मक भौतिकवादी तत्त्वज्ञान हे जर विज्ञानाचे विज्ञान मांडणारे तत्त्वज्ञान आहे तर त्याच्या सहाय्याने निसर्गातील काही गोष्टींचा उलगडा व्हायला पाहिजे, नवीन शोध लागले पाहिजेत. पण तसे झालेले नाहीत. स्टॅलिनच्या राजवटीत असे काही आचरट दावे केले गेले. पण ते उघडे पडले.

द्वंद्वात्मक भौतिकवादी तत्त्वज्ञान हे निसर्गाबाबत काही वैज्ञानिक नियम सांगत नाही पण निसर्गाच्या एखाद्या पैलूबाबत संशोधन करायला दिशादर्शक सूत्र वा तत्त्व म्हणून काम करते असे म्हणून कोणी त्याच्या सहाय्याने नवीन शोध लावले असेही झालेले नाही. सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण करताना मात्र द्वंद्वात्मक ऐतिहासिक भौतिकवादी विचारपद्धतीची सूत्रे वापरुन विश्लेषण केले तर निश्चित अधिक सकस विश्लेषण करता येते असा वारंवार अनुभव येतो. उदा. अंतर्विरोधातून

विकास होतो हे सूत्र सामाजिक वास्तवाच्या विश्लेषणाचे मार्गदर्शक सूत्र म्हणून वापरले तर निश्चित अधिक सरस विश्लेषण करता येते असे दिसते. एवढेच नव्हे तर सामाजिक प्रक्रियेतील अंतर्विरोधाचा विचार न करता केलेले विश्लेषण अपुरे असते व व्यवहाराला मार्गदर्शक म्हणून उपयोगी नसते असा अनुभव येतो. मात्र हे लक्षात घ्यायला हवे की, द्वंद्वात्मक भौतिकवादी तत्त्वे म्हणजे अधिकृत मार्क्सवादात मांडतात त्याप्रमाणे नियम नाहीत तर ती केवळ मार्गदर्शक असतात. ती समाज-वास्तवाच्या विश्लेषणासाठी मार्गदर्शक असतात; विश्लेषणाला पर्याय नसतात. या तुमच्या विश्लेषणात अमुक-अमुक अंतर्विरोध लक्षात घेतलेला नाही व म्हणून ते अशास्त्रीय आहे असे म्हणून तेवढ्या आधारे ते नाकारता येत नाही. द्वंद्वात्मक सूत्र हे मार्गदर्शक तत्त्व म्हणून वापरुन संबंधित विषयातील वस्तुतथ्ये व त्यातील संबंध यांच्या तपशीलात जाऊन आपल्या मुद्याची सिद्धता मांडावी लागते.

द्वंद्वात्मक भौतिकवादी विचार-पद्धती याचा निसर्ग आणि मानवी समाजिक संबंध यांच्या विश्लेषणामधील नेमके स्थान हा वादाचा व न सुटलेला प्रश्न आहे. हा प्रश्न निर्माण होण्याचे कदाचित हे कारण असेल की, आपल्या नित्य-परिचयाच्या निसर्गात विकास होत असताना आपल्याला दिसत नाही. उदा. लोखंड हे आपल्यासाठी आपल्या आयुष्यभरात लोखंडच राहते. त्यात काही विकास होत नाही. समाज मात्र विकसित होत असतो. उदा. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या शासकीय भांडवली समाजात जे अंतर्विरोध होते त्यांच्या विकासातून आजची भांडवलशाही विकसित झाली आहे; ती जागतिक वित्तीय भांडवल व कॉर्पोरेटस यांच्या अधिपत्याखालील अनिर्बंध बाजारवादी स्वरूपाची भांडवलशाही आहे. नैसर्गिक वास्तवाचे वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी द्वंद्वात्मक भौतिकवादी विचार-पद्धती ही आवश्यक, उपयोगी असते का हा वादाचा, गुंतागुंतीचा मुद्दा सध्या बाजूला ठेवू. सुधीरनेही या लेखात त्यावर भाष्य केलेले नाहीय. मात्र हे लक्षात घेतले पाहिजे की, - द्वंद्वात्मक भौतिकवादी विचार म्हणजे विज्ञानाचे विज्ञान मांडणारे तत्त्वज्ञान आहे ही त्याची भूमिका नाही. द्वंद्वात्मक भौतिकवादी तत्त्वे म्हणजे वैज्ञानिक विचार-पद्धतीची गृहीत-कृत्ये, मार्गदर्शक तत्त्वे आहेत असे त्याने म्हटले आहे.

**वैज्ञानिक दृष्टिकोनाबद्दल मार्क्सची वैचारिक क्रांती**

सुधीरने या लेखात मांडलेली पहिली तीन तत्त्वे कळत, न कळत पायाभूत घेऊन, गृहीत धरुनच वैज्ञानिक संशोधनाचे काम करत असतात. आपण अभ्यासत असलेली गोष्ट दैवी-शक्तीमुळे घडते आहे असे गृहीत धरून कोणीच पदार्थ-विज्ञान शास्त्रज्ञ किंवा वैद्यकीय शास्त्रज्ञ शास्त्रीय संशोधन करत नाही. मग तो भले रोज देवाची पूजा करत असला तरी. या तत्त्वाप्रमाणेच सुधीरच्या या लेखात मांडलेली पुढची तीन भौतिकवादी तत्त्वज्ञानात्मक गृहीतकृत्ये मानूनच वैज्ञानिक संशोधनाचे काम होते. मात्र समाजाचे वैज्ञानिक पद्धतीने विश्लेषण, अभ्यास करायचा असेल तर हे पुरत नाही. त्याच्या पुढे जावे लागते कारण निसर्ग आणि समाज यांच्यामध्ये काही कळीचे, गुणात्मक फरक असतात. हा मुद्दा 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या सुधीरच्या लेखात पुरेशा स्पष्टपणे आलेला नाही. पण दुसऱ्या एका लेखात सुधीरने हा मुद्दा मांडला आहे. या संदर्भात लिहताना 'मागोवा'च्या जानेवारी १९७६च्या एका लेखामध्ये (https://drive.google.com/file/d/16EqCVšYCzX6VJ4-PVM2wnpSU0lcO-gDO/view) सुधीर म्हणतो -

कार्ल मार्क्सने प्रथम समाजाचे क्षेत्र विज्ञानासाठी खुले केले. त्याने एका नव्या समाजविज्ञानाची स्थापना केली. निसर्ग विज्ञानामधील विचारांचा विषय हा जड असतो. उलट समाजविज्ञानाची परिस्थिती विचित्र असते. समाज व इतिहास यांच्यातील प्रक्रियांचा कर्ता म्हणजे सब्जेक्ट माणूस असतो व या प्रक्रियांद्वारा जी जी घडण होते ती विषय वस्तूही ऑब्जेक्ट म्हणजे माणूसच

असतो. त्यामुळे पदार्थविज्ञानाला यांत्रिक भौतिकवाद या विश्व-दृष्टिकोनाचा पाया पुरतो. पण समाजविज्ञानाला हा पाया पुरत नाही. त्याला एका अशा दृष्टिकोनाची गरज असते की, सब्जेक्ट व ऑब्जेक्ट यांची योग्य समज ज्याच्यामध्ये आहे. अस्तित्त्व व जाणीव यांच्यातल्या किंवा वास्तव व ज्ञान यांच्यातल्या संबंधाची योग्य समज ज्याच्यात आहे. तरच समाज-विज्ञानातील विचारांमध्ये अतिक्रमण करू बघणाऱ्या चिद्वादी (देवाच्या इच्छेमुळे दारिद्र्य आहे) किंवा यांत्रिक भौतिकवादी (भौगोलिक कारणामुळे दारिद्र्य आहे) अशा प्रणालींचा मुकाबला हा विश्व-दृष्टिकोन करू शकेल. प्राचीन काळी गणितशास्त्र व त्याला पूरक असा विशिष्ट स्वरूपाचा तत्त्वज्ञानात्मक विचार जन्मला. युरोपात आधुनिक काळात आधी (सर्व निसर्ग-विज्ञानांचा अंतर्भाव असणारे) पदार्थविज्ञान व यांत्रिक भौतिकवाद जन्मले. मार्क्सबरोबर समाजविज्ञान व एक नवा भौतिकवादी दृष्टिकोन जन्मला आणि अशा दृष्टिकोनाच्या पायावरचे समाज विज्ञान हे इतर कोणत्यातरी दृष्टिकोनाच्या पायावर उभारलेल्या भांडवली समाज विज्ञानापेक्षा अर्थात वेगळ्या प्रकारचे समाज विज्ञान असेल. हा मुद्दा काहीशा सविस्तरपणे, थोडासा सोपा करून या नवीन लेखात मांडायचे त्याने मान्य केले होते. पण ते राहिले!

निसर्ग-वैज्ञानिकांमध्ये मान्य पावलेला, सुधीरच्या सोबतच्या लेखातील मुद्दा क्र. १ ते ६मध्ये मांडलेला 'रेनेसाँ-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोन' व मार्क्स-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोन यातील साम्य व फरक दोन्ही लक्षात घ्यायची गरज आहे. मार्क्सने केलेल्या वैचारिक क्रांतीची थोडी फोड करून सांगायचे तर - चिद्वादी व भौतिकवादी तत्त्वज्ञान यांच्यात शेकडो वर्षे चाललेला वाद, झगडा हा मार्क्सने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्राबाहेर काढला. ही तत्त्वज्ञाने व त्यांच्यातील वाद हे सामाजिक संबंधातील अंतर्विरोधातून कसे जन्मतात, कोणाच्या हितसंबंधांचे कसे रक्षण करतात याकडे त्याने लक्ष वेधले. उदा. दैवी शक्ती, देव अस्तित्त्वात नाही याबाबतचे तत्त्वज्ञानात्मक युक्तिवाद किंवा शास्त्रीय पुरावे तो मांडत बसला नाही. तर देव, धर्म या कल्पना समाज-विकासाच्या एका टप्प्यावरील भौतिक, सामाजिक परिस्थितीमुळे निर्माण झाल्या याकडे त्याने लक्ष वेधले आणि ती परिस्थिती दूर केली तर दैवी शक्ती, देव या कल्पनांचे राज्य विलयाला जाईल हे त्याने मांडले. अशा प्रकारे विज्ञान आणि तत्त्वज्ञान या समांतर जाणाऱ्या विश्लेषण-पद्धतींमधील द्वैत ओलांडून त्याने इतिहासाची द्वंद्वात्मक भौतिकवादी चिकीत्सा पद्धती वापरुन या प्रश्नाचा उलगडा केला; तो सोडवण्याचा मार्ग मांडला. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर या वादांचे तत्त्वज्ञानात्मक चर्चा हे स्वरूप मार्क्सने बदलून सामाजिक संबंधांची चिकित्सा व हे संबंध बदलण्याचा मार्ग हा चर्चेचा आखाडा केला. ही epistemological, ontological revolution (ज्ञानशास्त्र, सतसंबंधीशास्त्र मधील क्रांती) होती. हे सर्व सुधीरच्या या वैज्ञानिक दृष्टिकोन या लेखात सुधीरने त्याच्या सुंदर, सोप्या पण अर्थवाही शैलीत मांडावे असे मी त्याला म्हणत होतो. त्याने ते मान्य केले होते. पण हा लेख पूर्ण करून प्रसिद्धीला द्यायचा त्याचा विचार हा फक्त विचार राहिला.

एक साधा मुद्दा म्हणजे मार्क्सने स्वत: आपण एक 'तत्त्वज्ञान' मांडतो आहोत असे कधीच म्हटले नाही. कारण त्याला पर्यायी तत्त्वज्ञान मांडायचे नव्हते तर त्याला विज्ञान-तत्त्वज्ञान या वैचारिक द्वैता पलिकडे जाऊन सर्व चर्चा प्रत्यक्षातील, चालत्या-बोलत्या जिवंत समाजाचे वैज्ञानिक विश्लेषण करणे व या द्वैता पलिकडे जाणारा समाज निर्माण करण्यासाठीची कृती करणे या क्षेत्राकडे वळवायची होती. त्याचे सुप्रसिद्ध वचन होते- तत्त्वज्ञानी जगाचा अर्थ लावत असतात, पण मुद्दा आहे जग बदलण्याचा! 'मागोवा' मासिकातील वर उद्धृत केलेल्या लेखात शेवटच्या भागात सुधीर म्हणतो काही मार्क्सवादी म्हणतात मार्क्सवाद म्हणजे काय? शास्त्रीय तत्त्वज्ञान! द्वंद्वात्मक भौतिकवाद हे विश्वविषयक

तत्त्वज्ञान आणि ऐतिहासिक भौतिकवाद हे सामाजिक विज्ञान! मार्क्सवादाचा मूळ आत्मा या सांगाड्यांमध्ये हरवून गेलेला आहे. मार्क्सवाद अमुक व प्रमुख तत्त्वज्ञानाच्या विरोध नाही, तो तत्त्वज्ञानाच्याच विरोधी आहे. तत्त्वज्ञानात्मक विचार ही एक विश्वविषयक खोटी जाणीव आहे व ती नष्ट (ॲबोलिश) केली पाहिजे, अशी मार्क्सची भूमिका आहे. मार्क्स तत्त्वज्ञानात्मक भौतिकवाद मानत नाही तो कुठलाच सुव्यवस्थित व्यूहबद्ध (सिस्टिमॅटिक) तत्त्वज्ञानात्मक विचार मानत नाही. उलट मार्क्सवाद म्हणजे विज्ञान व अनेक विज्ञाने सुद्धा नाहीत. द्वंद्वात्मक भौतिकवाद या तत्त्वज्ञानात्मक विचारविश्वाच्या छत्राखाली अर्थशास्त्र, (पोलिटिकल इकॉनॉमी) समाजशास्त्र इत्यादी शास्त्रांमध्ये आपले स्वतःचे सिद्धांत मार्क्स मांडत नाही. मार्क्स वेगळेच करतो. उदाहरणार्थ, अर्थशास्त्राच्या क्षेत्रात भांडवली शास्त्रज्ञांचे अर्थशास्त्रीय सिद्धांत खोडून काढायला मार्क्स स्वतःचा अर्थशास्त्रीय सिद्धांत मांडत नाही. मार्क्स अर्थशास्त्रीय विचारालाच विरोध करतो. 'भांडवल' हा ग्रंथ त्याने अर्थशास्त्राची समीक्षा (क्रिटिक)म्हणून लिहिला; अर्थशास्त्राची इमारतच उद्ध्वस्त करण्यासाठी लिहिला. -------- मार्क्सवाद म्हणजे विज्ञान व तत्त्वज्ञान व 'शास्त्रीय तत्त्वज्ञान' असे आपण मानले तर आपल्याला मार्क्स समजू शकत नाही. -----

पुढे, या लेखाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये सुधीर म्हणतो - जरा चमत्कारिक पद्धतीने मांडायचे तर मार्क्सवाद म्हणजे तत्त्वज्ञान वा कल्पना प्रणाली नाही पण मार्क्सवादामध्ये एक कल्पना प्रणाली अंतर्भूत व विश्व-दृष्टिकोन अंतर्भूत आहे. विश्व व त्यामागील मानवी जीवन यांच्याविषयी काही मूल्ये व कल्पना, परात्मभाव, संपूर्णीकरण द्वंद्वात्मक पद्धती इत्यादी त्यात अंतर्भूत आहे. तसेच मार्क्सवाद म्हणजे विज्ञान नाही पण मार्क्सवादामध्ये समाजाचे एक नव्या प्रकारचे विज्ञान अंतर्भूत आहे. ---

मार्क्सप्रणित वैज्ञानिक विश्लेषण-पद्धती व निसर्ग-विज्ञानात वापरली जाणारी विश्लेषण-पद्धती यामध्ये दुसरा एक महत्त्वाचा फरक आहे. तो म्हणजे म्हणजे निसर्गातील घडामोडी बहुतांशी मानवी समाजातील सामाजिक हितसंबंधांवर अवलंबून नसल्याने निसर्गातील घडामोडींकडे आपण निरपेक्षपणे, तटस्थपणे पाहू शकतो. उदा. चंद्रावर कोणती मूलद्रव्ये आहेत किंवा क्लोरोफिलचे कार्य कसे चालते याचा सामाजिक हितसंबंधांशी संबंध नसतो. त्यामुळे त्याबाबतची चिकित्सा शास्त्रज्ञ तटस्थपणे, निरपेक्षपणे करू शकतात. निसर्ग-वास्तव, त्याबाबतची कारण-मीमांसा याबद्दल शास्त्रज्ञांमध्ये असलेल्या मतभेदांचा समाजातील हितसंबंधांचा सहसा जैव संबंध नसतो. याला काही अपवाद आहेत. उदा. प्रतिगामी शक्ती डार्विनचा सिद्धांत नाकारतात. दुसरे उदाहरण म्हणजे पृथ्वीचे आज वाढत चाललेले तापमान हे मानवी अधिक्षेपामुळे (नफा-केंद्री तसेच अनिर्बंध औद्योगिकीकरणवादी अर्थ-व्यवस्था) नसून पृथ्वीच्या लाखो-कोटी वर्षे चाललेल्या स्वयंभू निसर्ग-चक्राचा तो भाग आहे ही मांडणी खनिज-ऊर्जा क्षेत्रातील भांडवलदारांच्या पथ्यावर पडते. मात्र सूर्य पृथ्वी भोवती नव्हे तर पृथ्वी सूर्या-भोवती फिरते हे नैसर्गिक घडामोडींबाबतचे सत्य मांडायला विरोध करणाऱ्या युरोपमधील सरंजामी हितसंबंधांचा पाडाव झाल्यानंतर नैसर्गिक घडामोडींबाबतचे सत्य मांडणे याभोवती सहसा सामाजिक वर्ग-कलह माजलेला नाही.

याउलट आर्थिक-सामाजिक प्रश्नांच्या बाबत (उदा. बेकारी, महागाई, भ्रष्टाचार इ. वर उपाय) अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांच्यातील सर्व महत्त्वाचे वाद मात्र समाजातील कोणत्या ना कोणत्या सामाजिक थरांच्या हितसंबंधांशी ठोसपणे, जैवपणे जोडलेले असतात. एवढेच नव्हे तर स्वत: त्या शास्त्रज्ञाची एकूण सामाजिक समज, किंवा वर्ग/जात/लिंग/देश याचाही या शास्त्रज्ञाच्या विश्लेषणाशी संबंध असू शकतो. उदा. दलित, आदिवासी, स्त्रिया, मुस्लिम यांच्या प्रश्नाचे

विशेषण करतांना सवर्ण, पुरुष संशोधक हे कोणताही पूर्वग्रह न ठेवता अभ्यास करण्याची शक्यता कमी असते. निसर्ग-विज्ञानाबाबत अपवाद वगळता असे नसते. निसर्ग-विज्ञानात शास्त्रज्ञाने निरपेक्ष, तटस्थ असणे ही शास्त्रीयतेची कसोटी असते. तर समाजविज्ञानात हे शक्य नसते. 'बाजू घेणे' हे रेनेसाँ-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोनमध्ये अशास्त्रीय समजले जाते. पण वैज्ञानिक विचारपद्धतीत झालेल्या मार्क्सप्रणित क्रांतीमुळे लक्षात आले की, सामाजिक संबंधांच्या वैज्ञानिक विश्लेषणात 'बाजू घेणे' आणि शास्त्रीय असणे यात अंतर्विरोध असतोच असे नाही.

निसर्गविज्ञानात असणाऱ्या मतभेदांबाबत अधिक चर्चा, अधिक पुरावा या आधारे काही काळानंतर बहुसंख्य शास्त्रज्ञांमध्ये एकमत होते. शिल्लक राहिलेले मतभेद सहसा सामाजिक हितसंबंधांमुळे नसतात. तसे समाजशास्त्र, अर्थशास्त्र याबद्दल नसते. सामाजिक प्रश्नांबाबतचे निरनिराळे सिद्धांत, विश्लेषणे ही अटळपणे कोणत्या ना कोणत्या सामाजिक गटाची, वर्गाचे हितसंबंध जोपासणारी असतात. उदा. जयती घोष व रघुराम राजन हे दोघेही अव्वल अर्थशास्त्रज्ञ आहेत. पण भारतातील दारिद्र्य हटवण्यासाठी करायचे उपाय याबाबत त्यांच्यातील मतभेद न मिटणारे आहेत. हे वैयक्तिक कारणामुळे नाही तर वेगवेगळ्या सामाजिक शक्तींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या त्यांच्या भूमिका आहेत. दुसरे उदाहरण - पर्यावरणीय प्रश्न सोडवण्यासाठी बाजारपेठी मार्ग वापरले पाहिजेत असे मानणारे अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि या उलट आपली अर्थव्यवस्था बाजारपेठी नियमांनुसार चालवण्यामुळे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत असे मानणारे समाजशास्त्रज्ञ यांच्यात कधीच एकमत होणार नाही. भांडवली अर्थविचार व मार्क्सवादी अर्थविचार हे दोन्ही शास्त्रीय विचार मानले जातात पण त्यांच्यात अनेक गोष्टींबाबत एकमत होणे शक्य नसते.

सुधीरचा हा लेख वाचताना हा मुद्दाही लक्षात ठेवायला हवा.

**पंडित नेहरु-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोन**

'रेनेसाँ-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोन' व मार्क्स-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोन यातील साम्य व फरक लक्षात घेण्याची विशेष गरज अलिकडे निर्माण झाली आहे. कारण 'वैज्ञानिक दृष्टिकोना'बद्दल बोलणाऱ्या, लिहिणाऱ्या बहुतेकांच्या मनात निसर्ग-विज्ञानाच्या कक्षेत असणाऱ्या प्रश्नांबाबत चर्चा, विश्लेषण करण्यापुरतीच आवाका असणारा 'रेनेसाँ-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोन' अभिप्रेत असतो. तो वापरुन सामाजिक प्रश्नांचीही शास्त्रीय पद्धतीने उकल करता येईल असे अनेकांना वाटते. युरोपमध्ये सरंजामी युगातील दैववादी चौकटीला आव्हान देऊन त्यातून बाहेर पडताना प्रबोधन-प्रक्रियेतून (रेनेसाँ) वैचारिक, सांस्कृतिक परिवर्तन घडले. त्या वेळी उदयाला आलेल्या, भरभराटीला येऊ पहाणाऱ्या विज्ञानाचा विकास होत असताना त्याच्याशी सुसंगत असा व्यापक भौतिकवादी दृष्टिकोन आकाराला आला, रुजू लागला. हा 'रेनेसाँ-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोन' हे फार मोठे पाऊल होते. पण त्याच्या पुढे जाऊन सामाजिक वास्तवाचे वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी आवश्यक असलेला अधिक व्यापक असा दृष्टिकोन मांडून मार्क्सने एक वैचारिक क्रांती केली हे वर थोडक्यात मांडले आहे. ते अनेकांना माहीत नसते. त्यामुळे मार्क्सने वैज्ञानिक चिकित्सा-पद्धतीचे क्षेत्र विस्तारून आर्थिक-सामाजिक वास्तव विज्ञानाच्या कक्षेत आणले, त्यासाठी नवीन, शास्त्रीय गृहीतके, शास्त्रीय संकल्पना घडवल्या हे लक्षात न घेताच आर्थिक-सामाजिक प्रश्नांचे शास्त्रीय विश्लेषण करू असे म्हणायचे; निसर्ग-विज्ञान आणि समाज-विज्ञान यातील समाइकते सोबत त्यातील मूलभूत फरक लक्षात घ्यायचे नाहीत; मार्क्सने मांडलेली विशिष्ट शास्त्रीय चिकित्सा पद्धत, त्यातील विशिष्ट वैज्ञानिक गृहीतकृत्ये, विश्लेषण पद्धती, त्यांचा झालेला विकास हे सर्व बाजूला ठेवून समाजाचे शास्त्रीय विश्लेषण करू


बघायचे - असा एक प्रकारचा भाबडा विज्ञानवाद निर्माण झाला. नेहरु-प्रणित 'वैज्ञानिक दृष्टिकोना'मध्ये तो दिसतो.

भारतापुढे असलेले प्रश्न सोडवण्यासाठी कशाची आवश्यकता आहे हे मांडताना "Discovery of India' (१९४५)मध्ये पंडित नेहरुनी 'वैज्ञानिक दृष्टिकोना'चा पुरस्कार केला होता. ते म्हणतात - What is needed is the scientific approach, the adventurous and yet critical temper of science, the search for truth and new knowledge, the refusal to accept anything without testing and trial, the capacity to change previous conclusions in the face of new evidence, the reliance on observed fact and not on pre-conceived theory, the hard discipline of the mind-all this is necessary, not merely for the application of science but for life itself and the solution of its many problems. ही भूमिका अर्थातच स्वागतार्ह होती. पण त्यात एक घोळ होता. निसर्गातील घडामोडींकडे, मानव-निसर्ग संबंधांकडे भौतिकवादी, वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघितले पाहिजे एवढाच अर्थ त्यात अभिप्रेत नाही. भारतीय समाजापुढील प्रश्न सोडवण्यासाठी वैज्ञानिक दृष्टी अंगिकारावी ही सुद्धा नेहरूंची भूमिका होती. पण असे म्हणताना मार्क्स नंतर १०० वर्षे ऊलटून गेली असताना नेहरू मार्क्सचा किंवा त्याला अभिप्रेत असलेल्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचा उल्लेखही करत नाहीत! वर्गीय अंतर्विरोध, ऐतिहासिक दृष्टिकोन हे मार्क्सच्या समाजशास्त्रीय विश्लेषण पद्धतीचा कळीचा भाग होते. पण साम्राज्यवादी, भांडवली हितसंबंध एका बाजूला तर भारतातील जनतेचा विकास दुसऱ्या बाजूला यातील अंतर्विरोध नेहरूंच्या 'आधुनिक विकासवादी, विज्ञानवादी' भूमिकेत नजरेआड झाले कारण ते पुरोगामी, भांडवली विकासाचे, प्रणेते व वैचारिक-राजकीय नेते होते.

भारताच्या राज्यघटनेत १९७६मध्ये 'वैज्ञानिक दृष्टिकोना'चा समावेश करण्यामागे ही नेहरू-प्रणित समज होती. नंतर १९८१मध्ये "Scientific Temper Statement' बनवण्यात अनेक पुरोगामी विचाराचे शास्त्रज्ञ, विचारवंत, काही मार्क्सवादीही होते. पण त्यातही ही नेहरूवादी समज वेगळ्या भाषेत मांडली होती. त्यामध्ये सामाजिक संबंधांमधील अंतर्विरोध, त्याची ऐतिहासिकता या मार्क्सवादी संकल्पनांचा समावेश न करता भारतातील प्रश्न सोडवण्याचा संकल्प मांडला होता. हा एक प्रकारचा भाबडा विज्ञानवाद होता.

२० ऑगस्ट, डॉ. दाभोळकर शहीद दिन हा वैज्ञानिक दृष्टिकोन दिन पाळायचे नवे पाऊल स्वागतार्ह, पुढे जाणारे आहे. सध्या छद्म-विज्ञानाला जी सरकार-प्रणित चलती आली आहे त्या पार्श्वभूमीवर ते विशेष स्वागतार्ह आहे. पण त्याचबरोबर रेनेसाँ प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोन कवेत घेऊन पुढे जाणारा मार्क्स-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोन आहे व तो अंगिकारण्याची गरज आहे हेही लक्षात घेतले पाहिजे. सुधीरला अर्थातच ही गरज वाटत होती म्हणून त्याने 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या त्याच्या लेखात मार्क्स-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोनाबद्दल अधिक उलगडा करुनच हा लेख प्रसिद्धीला द्यायचे ठरवले होते. ते झाले नाही तरी 'वैज्ञानिक दृष्टिकोन' या त्याच्या लेखाच्या मसुद्यात त्याने मार्क्स-प्रणित वैज्ञानिक दृष्टिकोन यातील काही कळीचे मुद्दे सोप्या व सुयोग्य पद्धतीने मांडले आहेत हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. हा प्रदीर्घ लेख पूर्ण झाल्यावर त्याची पुढे पुस्तिका काढायची असा विचार होता. कारण मार्क्सची विश्लेषण पद्धती काय होती, तिचे वैशिष्ट्य काय होते याची समर्थपणे, सुलभपणे तोंड-ओळख करून देणारी पुस्तिका मराठीत (आणि इंग्रजीमध्येही) उपलब्ध नाहीये. ती लिहायला समर्थ असलेल्या सुधीरच्या काहीसे मागे लागून ती त्याला लिहिण्याला उद्युक्त करण्याचा प्रयत्न यशस्वी होत असताना अचानक सुधीर गेला!

●



विजय
कुंजीर
vijay.kunjeer@gmail.com

# ...आणि विज्ञानाचा भारतीय व्यवहार

२०१४पासून गेल्या सात-आठ वर्षात भारतातील विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात काय काय प्रकारच्या गोष्टी घडल्या, आकाराला आल्या, त्याची परिणामकारकता काय आहे, आणि त्यातून भविष्यामध्ये आपली वाटचाल कुठल्या दिशेने होणार आहे याचा विचार प्रस्तुत लेखात केला आहे. २०१४पासून नवा भारत उदयाला आला असे म्हटले जाते. या नव्याने उदयाला आलेल्या कालखंडाकडे आणखीन चाळीस वर्षांनी पाहिले जाईल तेव्हा काय म्हणता येईल? त्यासाठी कुठल्या गोष्टी स्पष्टपणे घडलेल्या दिसतात आणि कुठल्या गोष्टींमध्ये काही घडायचं राहून गेलेलं आहे याचा विचार करावा लागेल.

एका बाजूला बऱ्याच गोष्टी अशा आहेत की, ज्या अत्यंत प्रभावी आहेत, डोळे दिपून टाकणाऱ्या आहेत. जसे की, मंगळयान आहे, चंद्रयान आहे, गगनयान आहे, असे आणि अन्य वेगवेगळ्या प्रकारचे विज्ञान-तंत्रज्ञानाशी संबंधित मोठे प्रकल्प आहेत. याच्यातल्या अनेक प्रकल्पांना केंद्र सरकारने मोठ्या प्रमाणात निधीही उपलब्ध करून दिला आहे. तसेही अनेक प्रकल्प विलक्षण मोठ्या निधीशिवाय संभवू शकत नाहीत. मोठा निधी लागणं हेच त्यांचं सगळ्यात मोठं वैशिष्ट्य असतं. या प्रकल्पांचं तात्कालिक स्वरूपात यश - अपयश हा चर्चेचा एक वेगळा मुद्दा आहे.

यातल्या अनेक प्रकल्पांबाबत विज्ञान क्षेत्रात काम करत असलेल्या लोकांचं स्पष्ट मत असं आहे की, भारतासारख्या विकसनशील देशाला अशा प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याची गरज नाही. ना त्यांच्यासाठी भलाथोरला निधी पुरवण्याची गरज आहे. या प्रकल्पांना एक सांकेतिक जरूर महत्त्व आहे, पण तेवढंच. त्यापलीकडे आशयघन असं महत्त्व अजिबात नाही. यातले अनेक प्रकल्प असे आहेत की, जे दिमाखदार दिसतात, प्रभाव टाकून जातात, डोळे दिपवतात पण भारतीय समाजाचे जे वेगवेगळे प्रश्न आहेत त्यासंदर्भात ते फारसे प्रस्तुत ठरत नाही. दारिद्र्य, विषमता, रोगराई असे जे देशासमोरचे महाकाय सामाजिक प्रश्न आहेत त्यांच्या सोडवणुकीत या प्रकल्पांचं काही योगदान असत नाही.

प्रश्न असा निर्माण होतो की, सांकेतिक, प्रतीकात्मक महत्त्व असलेल्या प्रकल्पांसाठी शासनाकडे निधी उपलब्ध आहे, पण ज्याला आपण मूलभूत विज्ञान असं म्हणतो, त्यासाठी मात्र फारसा निधी उपलब्ध नाही, नव्हे, तिथे तर टंचाई आहे. २०२२मधील भारतासमोर विज्ञानाच्या क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या निधी आणि मानवी साधनसंपत्ती या दोन्ही संदर्भात विलक्षण स्वरूपाचे

प्रश्न तयार झालेले दिसतात. भारतीय अर्थकारणाच्या तुलनेत जे मोठे विकसित देश आहेत, त्यांच्याकडे विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या संशोधन आणि विकासाकरिता खूपच मोठा निधी उपलब्ध आहे. भारताला जर आधुनिक विज्ञानातील आपल्या कामगिरीचा लौकिक टिकवायचा असेल तर तंत्र-वैज्ञानिक संशोधन आणि विकासासाठी सकल देशांतर्गत उत्पादना(जीडीपी)तील कमीतकमी २ टक्के रक्कम खर्च व्हावी, ही फार जुनी मागणी आहे. खरं तर ही मागणी जवळपास सगळ्यांना -धोरणकर्त्यांना, शासनाला, नोकरशाहीला - पटलेलीदेखील आहे, मात्र तेवढा निधी कधीही उपलब्ध झालेला नाही हेही खरंच. अजूनही भारताच्या जीडीपीच्या ०.९ टक्के एवढाच हिस्सा त्यासाठी खर्च होतो. मुळात जीडीपीचा आकारच छोटा - साधारण ३ लाख कोटी (ट्रिलियन) डॉलर्स इतका - त्यापैकी ०.९ टक्के म्हणजे फारसं काहीच उभं राहू शकत नाही. त्यामुळे मूलभूत विज्ञान विकास या क्षेत्रामध्ये विकसित देशांशी तुलना करू पाहता भारत हा खूप पिछाडीवर असणारा देश ठरतो. १९४७मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अनेक भारतीय व्यक्तींना विज्ञानाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात दिले जाणारे नोबेल पुरस्कार मिळाले आहेत. नोबेल पुरस्कार विवादास्पद तर आहेतच, कुठलं विज्ञान सन्मानित होतं आणि कुठल्या विज्ञानाकडे दुर्लक्ष केलं जातं याविषयी ही विवादास्पदता आहे. पण त्याच बरोबरीने विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये त्याचा काही प्रकारचा लौकिक, मानमरातब आहे.

तरीही ज्या भारतियांना गेल्या पन्नास वर्षात नोबेल मिळालेलं आहे त्यात फार कमी म्हणजे जवळपास ० टक्के लोकांना त्यांनी भारतात केलेल्या कार्यासाठी हे पुरस्कार मिळाले आहेत. याचा अर्थ वैज्ञानिकांकरिता आवश्यक असलेलं संस्थाकारण, मग त्यात विज्ञानसंस्था आल्या, प्रयोगशाळा आल्या, ते आपण उभं करू शकलेलो नाही. थोडक्यात हे लोक फक्त जन्माने भारतीय आहेत, पण त्यांचं कर्मक्षेत्र भारत नाही आणि भारताचं हे दुर्दैव गेल्या पंच्याहत्तर वर्षात कधीच बदललेलं नाही. अजूनही भारतात अनेक प्रकारचे तरुण संशोधक आहेत, शास्त्रज्ञ आहेत. ते वेगवेगळ्या प्रकारच्या संस्था-संशोधन केंद्र-विद्यापीठांशी संलग्न आहेत. पण ते त्यांच्या त्यांच्या कारकिर्दीच्या एका अशा टप्प्यावर देश सोडून जातात की ज्या वेळेला त्यांना मूलभूत विज्ञानात काम करायची वेळ येते. कारण या कार्यासाठी आवश्यक अशा स्वरूपाची पार्श्वभूमी - निधी, साधने, आधार - भारतात मिळत नाही. ते मग बाहेरच्या संस्थांशी संलग्न होतात. तिथं काम करतात. तिथे त्यांचं काम नावारूपाला येतं, त्यांची दखल घेतली जाते. कारण काहीही असो पण, नोबेल पुरस्कार हे मूलभूत संशोधनासाठी दिले जातात. याचा अर्थच असा आहे की, संस्थात्मक पातळीवर भारतीय विज्ञानाची एक गोची झालेली आहे.

याच बरोबरीने आणखी एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तो असा की, दर दशलक्ष भारतीयांमध्ये किती लोक आहेत, ज्यांना आपण वैज्ञानिक, विज्ञान क्षेत्राशी संबंधित आहेत असे म्हणू शकतो. या संदर्भात भारताची तूलना जगातील इतर देशांशी केली तर भारतात अशा लोकांची संख्या अत्यल्प असल्याचे दिसते. वैज्ञानिक म्हणता येईल अशा लोकांची संख्या भारतात प्रति दश लक्ष फक्त १४४ इतकी आहे. आपल्यापेक्षा खूप कमी लोकसंख्या असणारे छोटे देश जर आपण पाहू गेलो तर, उदा. व्हिएतनाम, चिली तर या देशातील आकडा आपल्या पेक्षा कितीतरी पटींनी अधिक आहे. दुसऱ्या बाजूला भारतापेक्षा विकसित असलेले चीन, अमेरिका यांच्याबाबतीत हीच आकडेवारी दर दहा लाखात सहा हजार, सात हजारपर्यंत जाते.

याचे एक कारण असे आहे की, भारताबाहेरील देशात विज्ञानविषयक जाण ही विशिष्ट संस्था, विशिष्ट लोक आणि विशिष्ट समाज वर्तुळांपर्यंत मर्यादित असत नाही, जशी ती भारतात झाल्याचे दिसते. तिथे ती

सर्वदूरपर्यंत पसरलेली, खोलवर रुजलेली आहे. साहजिकच याचे परिणाम आहेत त्या देशातील वाढ, समृद्धीमध्ये परावर्तित होताना दिसतात. उलटपक्षी भारताचं भारताच्या बाहेर जे चित्र उभं राहतं, ते म्हणजे परंपराशी एकनिष्ठ असलेला देश, कुठेही न विभाजित झालेली संस्कृती, एक अत्यंत रंगीबेरंगी असलेला देश की, ज्याची मूल्यव्यवस्था ही आधुनिकतेपेक्षा आधुनिकपूर्व अधिक आहे. या चित्राच्या तळाशी ही विज्ञानाच्या क्षेत्राबाबत अत्यंत तोकडी असलेली देशाची आकडेवारी आहे. ज्या पद्धतीने विज्ञानाची एकंदरित चर्चा इतर देशांमध्ये, अगदी चीन, व्हिएतनाम तिथल्या सर्वसामान्यांपर्यंत पोहचते, त्यांना कळते, विज्ञानाची भाषा बोजड वाटत नाही, तसे भारतात घडताना दिसत नाही. व्यापक समाजाच्या पातळीवर विज्ञानाच्या बाबतीत एक उदासीनता, एक प्रकारची निरक्षरता, अतिशय स्वयंस्पष्टपणे अधोरेखित होते. यातून एक महत्त्वाचा विरोधाभास, एक पेच समोर येतो. वैज्ञानिकांचा वर्ग-जात-लिंग या अंगाने तो आकार घेताना दिसतो.

भारतीय समाजातील जे निम्न जातवर्गीय स्तर, त्यातील स्त्री-पुरुष आहेत, त्यांच्यामध्ये एक विशेष प्रकारचं नैपुण्य निश्चित बघायला मिळतं. अगदी वेगवेगळ्या प्रकारचे पदार्थ, वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू, यंत्र याच्या कार्यकारणभावाबद्दल त्यांच्यामध्ये काही ना काही जाण-जाणीव असते. म्हणजे कुठल्या पदार्थात काय मिसळल्यानंतर काय निर्माण होतं, याची जाणीव आहे. लघुद्योग असतील, छोट्यामोठ्या वस्तू दुरुस्त करणारी लहानसहान दुकानं, व्यवसाय असतील, यांना कित्येकदा एक विलक्षण अशा प्रकारचं नैपुण्य आहे की काहीतरी त्यांना करता येतं. याला 'जुगाड' असं म्हटलं जाई. भारताला जुगाड राष्ट्र असं म्हटलं जाई. त्यात कुठंतरी एक हिणवण्याचा भागदेखील होता. त्यात मुख्य विचार होता की, काही तरी करून गोष्ट चालू करता येते, आकाराला आणता येते आणि हे करणाऱ्या भारतभरातील लोकांची संख्या कित्येक कोटींमध्ये आहे. हे लोक त्यांच्या विलक्षण बुद्धिमत्तेच्या पातळीवर, एक विलक्षण अशी कल्पनाशक्ती, निरीक्षण शक्ती आणि बौद्धिक क्षमता असल्याच्या कारणाने सजगतेने कार्य करत असतात. मात्र त्यांना त्या पाठीमागचं विज्ञान जे आहे ते नेमकं माहीत नाही. त्यांना ते कळत नाही. त्यांना कळतं इतकंच की, गोष्ट नेमकी चालते तर ती कशी चालते. विज्ञानाला अपेक्षित अशा संज्ञा, संकल्पना, संज्ञावली यांचा वापर करून त्याचं स्पष्टीकरण त्यांना देता येत नाही.

आज भारतात विज्ञान विषयांमधील ४० टक्के पीएच्.डी. स्त्रियांच्या असल्या तरी वैज्ञानिक संशोधन करणाऱ्या संस्था आहेत, केंद्र आहेत, प्रयोगशाळा आहेत, विद्यापीठं आहेत, तिथे असलेली स्त्री-वैज्ञानिकांची संख्या ही फक्त १३ टक्के आहे. म्हणजे २७ टक्के स्त्रिया या वर्जित केल्या जातात, वैज्ञानिक वर्तुळाच्या बाहेर राहतात. अनेक उत्तम प्रकारच्या संशोधिकांनी (जसे की, आभा सूर, प्रीता नायर इ.) विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये अगदी आधुनिक इतिहासकाळापासून (एकोणिसाव्या शतकापासून) आत्तापर्यंत कार्यरत असलेल्या वेगवेगळ्या स्त्री-वैज्ञानिकांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी वेगवेगळ्या स्त्री-वैज्ञानिकांची चरित्रं लिहिली, त्यांच्या संशोधनकार्यामध्ये आलेल्या व्यक्तिगतपासून ते संस्थात्मक स्वरूपापर्यंत ज्या अडचणी होत्या, त्यांचा विचक्षण असा आढावा घेतलेला आहे, जात आणि लिंगभाव विषमतेच्या दुष्परिणामांमुळे या स्त्रियांची वैज्ञानिक वाढ कशी खुंटली याबाबत त्यांनी चांगल्या प्रकारचं संशोधनकार्य केलेलं आहे. त्याद्वारे त्यांनी भारतातील वैज्ञानिक संस्थांचा मूळ ढाचा हा स्त्रीद्वेष्टा आहे हे दाखवून दिले आहे. असे अनेक समाजशास्त्रीय अभ्यास झालेले असूनही या संस्थांच्या कार्यपद्धतीत मात्र कुठलाही बदल घडलेला नाही. स्त्रियांच्या बाजूने शासन कुठल्याही प्रकारची ठोस पावलं उचलायला तयार दिसत नाही. ही गोष्ट अधोरेखित

करणे यासाठी महत्त्वाची ठरते की, जगभरातच मूलभूत विज्ञानाचं कार्य जे नावारूपाला आणि आकाराला येतं, त्यात एक सगळ्यात महत्त्वाचा भाग हा शासकीय धोरणांचा आणि सार्वजनिक निधीचा असतो. शासकीय पुढाकाराशिवाय विज्ञान संशोधनाचं क्षेत्र म्हणावं तितकं सर्वसमावेशक होत नाही. लोकांमध्ये असलेली विविधता जर विज्ञानाच्या क्षेत्रात परावर्तित झाली नाही, म्हणजेच विज्ञानाचा सामाजिक पाया जर व्यापक झाला नाही तर एकंदरित होत असलेल्या मूलभूत विज्ञानाचा विकास हा एकांगी, एकसूरी आणि एककल्ली राहतो हा जगभरचा अनुभव आहे. वैज्ञानिक संशोधन क्षेत्रात विविधता, बहुलता, सर्वसमावेशकता ही जाणीवपूर्वक आणावी आणि रुजवावी लागते. जोपर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या सामाजिक जाणीवा, विविध समूहांतले लोक त्यांच्या त्यांच्या संकल्पना, विचार घेऊन इथे येत नाहीत, तोवर या क्षेत्रात काही नवीन घडत नाही, आणि हाच विद्यमान भारताचा सार्वत्रिक अनुभव आहे. भारतीय विज्ञानाचं क्षेत्र हे खूप गरीब म्हटलं पाहिजे. भारतात विज्ञानाचं फक्त अनुकरण, उपयोजन होतं. मूलभूत संशोधन फारसं घडत नाही.

२०१४नंतरचं जे दशक आहे त्यात संशोधन कार्य प्रकाशित करण्याच्या ज्या संधी आहेत त्या संधींचा अवकाश निश्चित मोठा झालेला आहे. म्हणजे जास्त प्रबंध प्रकाशित होत आहेत, जास्त संशोधन लेख प्रसिद्ध होत आहेत, जास्त पेटंटस् दिली जात आहेत. अर्थात् दरडोई दश लक्ष लोकसंख्येमागे किती पेटंट दिली जातात याचा दर जर आपण पाहिला तर दक्षिण कोरिया, सिंगापूर यांसारखे कमी लोकसंख्येचे देश भारताच्या कितीतरी पुढे आहेत. आणि याचे कारण वस्तू घडवणारे, दुरुस्त करणारे पण वैज्ञानिक कार्यकारणभाव अभिव्यक्त न करू शकणारे निम्न वर्गजातीय स्त्री-पुरुष आहेत ते आणि निरनिराळ्या संस्थांमध्ये शासकीय निधीचा वापर करणारे, वेगवेगळे प्रकल्प राबवणारे, वैज्ञानिक भाषेची समज असणारे, पण काहीच न घडवणारे (कारण त्यांच्या कार्याचा जो एकंदरित माहौल आहे तो एकजातीय, एकसूरी, एककल्ली आहे) असे दोन वर्ग आहेत. म्हणजे संशोधन प्रकल्प संख्येने आहेत, प्रकाशनं मुबलक आहेत, पण विज्ञान संशोधन क्षेत्रामध्ये जे महत्त्वाचे मानले जाते की, तुम्ही केलेल्या संशोधनाची दखल इतरांनी किती घेतली, ज्याला अकादमिक भाषेमध्ये *सायटेशन इम्पॅक्ट* असं म्हटलं जातं, तिथे भारतीय विज्ञान क्षेत्र खूपच मर्यादित आहे. या वर्गवारीत जाणारं भारतीय लेखन जवळजवळ नगण्य आहे. याचं मुळातलं कारण म्हणजे हे बहुतेक संशोधन प्रकल्प हे मूलभूत विज्ञानाच्या बाबतीत नसून, उपयोजित विज्ञानाशी संबंधित आहेत. वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये कार्य करत असलेले भारतातले दहा किंवा पन्नास असे महत्त्वाचे वैज्ञानिक बघितले तर ते सगळे एकाच प्रकारच्या जातीय पार्श्वभूमीतून आलेले आणि बऱ्याच अंशी पुरुषच आढळतात. त्यामुळे भारतातील विज्ञान तंत्रज्ञानाचं क्षेत्र हे इंग्रजीत ज्याला *बॉईज क्लब* असं म्हटलं जातं, तशा स्वरूपाचं आहे.

जातिसमाजाचा पगडा हा ज्या समाजाच्या जाणिवांवरती, मूल्यांवरती दीर्घ काळ प्रभुत्व राखून असतो अशा समाजात मूलभूत विज्ञान किती होऊ शकतं हाच मुळातला प्रश्न आहे. जातीची जाणीव, तिच्यातील निर्णायक अशा उतरंडीची जाणीव, विषमतेची – न्यूनाची जाणीव वैज्ञानिक विकासाला कारक कशी ठरू शकेल? भारतीय विज्ञान क्षेत्र हे भारतीय जातीसमाजाच्या वास्तवापासून सुटं राहूच शकत नाही. भारतातील कुठल्याही विज्ञान अथवा उच्च शिक्षण संस्थांचे संचालक, प्रवर्तक हे कायमच वरच्या जातवर्गातून येतात. हे असं आपोआप घडत नसतं, त्यामागे एक योजना असते. रोचक बाब अशी की दुसऱ्या बाजूला उच्चजातीय (पुरुष) संशोधक मात्र असं निश्चितच दाखवू शकतात की, भारतातले निम्न जातीतले जे लोक आहेत, स्त्रिया आहेत, हे आधुनिक विज्ञानाच्या केंद्रस्थानी असलेल्या विवेक आणि तर्क

या दोन्हींचे ना विषय आहेत ना अनुयायी आहेत. भारतातला उच्चजातीय पुरुष हा स्वतःला विवेक आणि तर्क याचा एक मूर्तिमंत आविष्कार म्हणून निश्चितच सादर करू शकतो. एक जातिबद्ध समाज हा मूलभूत विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये किती लांब जाऊ शकतो आणि जात नावाचं वास्तव हे एखाद्या समाजाचं, किंवा राष्ट्राचं कसं वाटोळं करू शकतं याचं अत्यंत मूर्तिमंत उदाहरण म्हणजे गेल्या सात वर्षातला भारत आहे.

तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अत्यंत नावाजलेल्या देशातल्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटीज्) आहेत त्याच्यामध्ये दलित, आदिवासी, ओबीसी विद्यार्थी-विद्यार्थिनींची जी घुसमट होते, पदोपदी त्यांच्या वाट्याला येणारी अवहेलना, अपमान, दुर्लक्ष, जातीचा उल्लेख करून हिणवणं, हे गेल्या सात-आठ वर्षांत खूप मोठ्या प्रमाणात समोर आलेलं आहे. रोहित वेमुला आत्महत्या करतो, हे अपवादाने घडत नाही. हा इथला नियम आहे. आपल्या विज्ञानाचं जे कार्यवहन आहे, जो व्यवहार आहे त्याला जातीयतेने जो आकार प्राप्त झालेला आहे तो या मुलांच्या नुकसानीला कारणीभूत आहे.

इनोव्हेशन इंडेक्स असेल, सायटेशन इम्पॅक्ट इंडेक्स असेल, अशा वेगवेगळ्या प्रकारच्या निकषांवर भारताचं स्थान हे खूप मागे असणं हे या सगळ्यातून उद्भवतं. संस्थांच्या धोरणकर्त्यांना याची जाणीव नाही असं नक्कीच नाही. पण जाणीव असूनही बदलायचं नाहीय. कारण त्यातून आमची सत्ता राखू शकतो ही मग्रुरी आहे. दुसऱ्या बाजूला धोरण ठरवण्यात कळीची भूमिका असते ती राजकारण्यांकडे. पण भारतात विज्ञानाशी देणंघेणं असणारे फारसे राजकारणी दिसत नाहीत. ते सगळ्या प्रकारच्या अवैज्ञानिक, अशास्त्रीय गोष्टींबाबत चढाओढीनं आणि अत्यंत अरेरावीने बोलू शकतात, याचं सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे राजकारण्यांना कसल्याही प्रकारची विज्ञानाची पार्श्वभूमी नाही. जवळजवळ १५ वर्ष जर्मनीसारख्या अतिप्रगत देशाचं पंतप्रधानपद ज्या अंजेला मर्कल यांच्याकडे होतं, त्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी विज्ञानाची, तीही मूलभूत विज्ञानाची आहे. अशी व्यक्ती भारतात सर्वोच्च पदी जाऊन बसू शकते हे नजिकच्या भविष्यात तरी शक्य नाही.

गेल्या सत्तर वर्षात फक्त ७ वैज्ञानिक असे आहेत की, ज्यांना भारतीय संसदेचं सदस्य होण्याचं भाग्य लाभलं आणि त्यातही एकच वैज्ञानिक असे आहते - मेघनाद सहा, जे ब्राह्मणेतर आहेत आणि जे कोलकात्याच्या एका मतदारसंघातून लोकसभेत निवडून जाऊ शकले. ते अपक्ष म्हणून उभे राहिले होते. बंगालमधल्या डाव्या पक्ष - संघटनांनी त्यांचा प्रचार केला. उर्वरित सहाजण हे राज्यसभेचे सदस्य आहेत आणि त्यातले जवळपास सगळेचजण हे राष्ट्रपतींनी नियुक्त केलेले सदस्य आहेत.

ज्या देशाच्या राजकारणामध्ये वैज्ञानिकांना कसल्याच प्रकारची भूमिका नाही, त्या देशाचं राजकारण हे अविवेकी, असहिष्णू, पराकोटीचं हिंसक असणं हे कदाचित स्वाभाविकच आहे. भारतीय राजकारणाचा गेल्या सात वर्षांतला आविष्कार रानटी आहे, पाशवी आहे. भारतीय राजकारणी हे विज्ञानापासून कोसो दूर आहेत.

मेघनाद साहा ज्या लोकसभेत सदस्य म्हणून निवडून गेले त्या लोकसभेचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरू होते, यात काही आश्चर्य नाही. नेहरूंना विज्ञानाबद्दल एक प्रकारचं आकर्षण, जाणीव आहे, समजून घेण्याची वृत्ती आणि त्यासाठी काही भरीव करण्याची इच्छाशक्ती होती. ज्या सात वैज्ञानिक सदस्यांचा वर उल्लेख आला आहे त्यातले बहुतेक जण नेहरूंच्याच काळातच संसद सदस्य बनले हेही लक्षात घेण्यासारखे आहे. अर्थात् नेहरूंचं ब्राह्मण्य आणि नेहरूंच्या ब्राह्मण्याचा त्यांच्या शासनाच्या निर्णयांवर झालेला परिणाम याबाबत कसल्याही प्रकारची लपवाछपवी करण्याची गरज नाही. नेहरू हे निश्चितच भारतातील आंग्लविद्याविभूषित अशा उच्चजातवर्गीय पुरुषत्वाचा नमुना आहेत. त्यांच्या

बाबतीत ज्या काही टीका आहेत, विशेषतः त्यांच्या जातजाणिवेच्या अंगाने, त्यांच्या आंग्लविद्याविभूषित असल्याच्या कारणाने, त्या सगळ्या टीका गृहीत धरून हा विचार करणं गरजेचं आहे आणि तरीही त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन हा अत्यंत जागृत स्वरूपाचा दिसतो.

निश्चितच नेहरू ज्या काळात घडून गेले त्या काळाचाच काही एक महिमा आहे. दुसरं महायुद्ध संपलेलं आहे, जगामध्ये एक शस्त्रास्त्रांची, औद्योगिकरणाची चढाओढ आहे. या पार्श्वभूमीवर भारतासारख्या विलक्षण दरिद्री अशा विकसनशील देशाच्या पंतप्रधानांना मूलभूत विज्ञानाच्या क्षेत्राबाबत शासन काहीच भूमिका नसेल, ही बाबच संभवनीय नव्हती. त्यामुळे ती त्या काळाचीच गरज होती की, शासन त्यासाठी सकारात्मक हस्तक्षेपाची भूमिका घेते, निधी उपलब्ध करून देते, संस्था निर्माण करते, त्या संस्थांच्या संचलनासाठी योग्य प्रकारचं मनुष्यबळ निर्माण करण्याकडे लक्ष देते. हे सगळं नेहरूंनी केलं, प्रामाणिकपणे केलं. याबाबत कुठलंच दूमत असायचं कारण नाही. पण हे करत असताना दोन बाबी, एक प्राथमिक शिक्षणाकडे झालेलं दुर्लक्ष आहे आणि दोन, भारतातील निमशहरी किंवा ग्रामीण भागाकडे झालेलं दुर्लक्ष आहे. या कमतरतांतून जे प्रश्न निर्माण होतात, मग ते जाणिवांचे असतील, मूल्यांचे असतील, जे प्रश्न नेहरू गेल्याच्या नंतर एक अत्यंत उग्र रूप धारण करतात. १९६४मध्ये नेहरू गेले आणि १९६६मध्ये केंद्र सरकारने गोहत्याबंदीचा कायदा करावा यासाठी साधू संसदेला घेराव घालतात हा काही निव्वळ योगायोग नाही.

अखेरीस विशिष्ट प्रमाणात निधी आणि मनुष्यबळ उपलब्ध करून दिलं, विशिष्ट अशा प्रकारचं विचारांचं, अभिव्यक्तीचं स्वातंत्र्य निर्माण करून दिलं, तर विज्ञानाचा जोरकस आणि सकस असा विकास घडू शकतो असा एक भ्रम, गैरसमज भारतामध्ये अनेक वर्षांपासून रूढ झालेला आहे. चांगलं विज्ञान घडण्यासाठी जशी या गोष्टींची गरज आहे तशीच ते विज्ञान करणाऱ्या वैज्ञानिकाला एक विलक्षण अशा प्रकारची सामाजिकतेची जाणीवदेखील आवश्यक आहे. म्हणजे समाजशास्त्रं असतील, मानव्यविद्या असतील, या शिक्षण क्षेत्रांकडे दुर्लक्ष करून निव्वळ विज्ञान आणि तंत्रज्ञान या गोष्टींच्या आधारे एक चांगलं विज्ञान आकाराला येऊ शकत नाही. समाजाची सामाजिकता, ऐतिहासिकता, सांस्कृतिकता, त्या समाजाचं अर्थकारण, राजकारण यांची कसलीच जाणीव नसलेला वैज्ञानिक हा निश्चितच चांगलं विज्ञान घडवू शकत नाही. पश्चिमी देशांमध्ये चांगलं विज्ञान आकाराला येतं पण तिथे चांगली सामाजिक शास्त्रंदेखील आकाराला येतात. म्हणजे जोपर्यंत विज्ञानाचा विकास हा इतर ज्ञानशाखांशी संवादी राहून होत नाही तोवर विज्ञानाचा निकोप असा विकास घडू शकत नाही. चांगलं विज्ञान हे झाडाला लटकलेलं सफरचंद निश्चित नाही तर ते समाजाच्या पाळामुळांचे एकमेकांशी असलेले ऋणानुबंध, ताणेबाणे, आंतरसंबंध याच्यातनंच निर्माण होत असतं. जोपर्यंत ही जाणीव समाज आणि शासन या पातळीवर निर्माण होत नाही तोपर्यंत चांगलं विज्ञान भारतात घडणार नाही. त्यामुळे जेव्हा चाळीस वर्षांनंतर वर्तमान दशकाकडे पाहिलं जाईल तेव्हा काही देदीप्यमान प्रकल्प दिसतील हे खरे असले तरी मूलभूत विज्ञानाची पाटी मात्र कोरीच असल्याचे दिसणार आहे.

●

**'परिवर्तनाचा वाटसरू'ची पावशतकी वाटचाल..**
**हार्दिक सदिच्छा!**

**मैत्री**
**डॉ. राजश्री देशपांडे**
**मिनाजकुमार सय्यद**
सातारा

लोकवाङ्मय गृह


आगामी

# राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृति शताब्दीनिमित्त

## महत्त्वाच्या विषयांवरील दहा पुस्तिकांचा संच लवकरच आपल्या भेटीस

## संपादक : उत्तम कांबळे

- राजर्षी शाहू महाराज आणि महिला मुक्ती - उत्तम कांबळे
- राजर्षी शाहू आणि आधुनिक शेती - डॉ. गिरीश मोरे
- राजर्षी शाहू महाराज : सामाजिक न्यायाचे प्रणेते - उत्तम कांबळे
- राजर्षी शाहू : वसा आणि वारसा - कॉ. गोविंद पानसरे
- राजर्षी शाहू महाराज आणि वेदोक्त प्रकरण - उत्तम कांबळे
- राजर्षी शाहू महाराज आणि कामगार चळवळ - कॉ. आनंद मेणसे
- राजर्षी शाहू महाराज आणि जातीनिर्मूलन - कॉ. महादेव खुडे
- शाहू महाराजांचा समग्र परिवर्तनाचा विचार - प्रा. सुभाष वारे
- राजर्षी शाहू महाराज आणि गुन्हेगारी जाती-जमाती - प्रा. विजय कुमठेकर
- राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर - प्रा. संभाजी बिरांजे



भारतीय परिस्थितीत सामाजिक न्याय हा अत्यंत महत्त्वाचा विचार आहे. राजर्षी शाहू महाराज यांनी याचे महत्त्व ओळखून आपल्या संस्थानात समाजातील तळागाळातील घटकांसाठी नोकऱ्यांमध्ये राखीव जागा ठेवण्याचे क्रांतिकारी धोरण सर्वप्रथम राबवले. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून सामाजिक न्यायाच्या धोरणाची समग्र अंमलबजावणी सुरू केली.


लोकवाङ्मय गृहातर्फे शाहू महाराजांच्या स्मृति शताब्दीनिमित्ताने सुप्रसिद्ध लेखक व अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष उत्तम कांबळे यांनी संपादित केलेल्या दहा पुस्तिकांचा संच प्रकाशित करण्याचा संकल्प आम्ही केला आहे.

लोकवाङ्मय गृहाची ही शाहू महाराजांना खऱ्या अर्थाने महत्त्वपूर्ण आदरांजली ठरणार आहे. आमचे असंख्य वाचक या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देतील याची खात्री आहे.

- कॉ. भालचंद्र कानगो

**साधना अंकाच्या वर्गणीदारांसाठी लोकवाङ्मय गृहाच्या सर्व पुस्तकांवर २०% सवलत मिळेल. पाठवणावळ वेगळी.**
**ही सवलत ३१ मार्च २०२३ पर्यंत मिळेल.**

- E-mail : lokvangmayagriha@gmail.com
- Contact : 022-2436 2474 / 8454049036
- Website : www.lokvangmaybooks.com
- Follow us on @lokvangmaygriha



# अभिवादन

## कॉ. कुमार शिराळकर

१९४२–२०२२

*With best compliments from...*

- *A well-wisher*


टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेड.
Bharosa ka Bank Bhavishya ka Bank
50 Years of Banking Excellence
ह्या दिवाळीत करा आपल्या स्वप्नांची पूर्तता
कार लोन
ॲसेट बॅक्ड क्रेडीट
टेकओव्हर लोन
एसएमई लोन
गोल्ड लोन
ईझी क्रेडीट
होम लोन
प्रोफेशनल लोन
डिजिटल (क्यु.आर. कोड, यु.पी.आय., नेट बँकिंग, डेबिट कार्ड)
आकर्षक फेस्टीव्ह ऑफर्स* साठी
तुमच्या जवळच्या टीजेएसबी शाखेशी संपर्क साधा
www.tjsbbank.co.in | Toll Free: 1800 223 466 | 1800 266 3466

Registered
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP -37
R.N.I. No. MAHMAR/2001/09622 / Postal Regd. No. PCW/006/2021-2023
Posted at Pune PSO, GPO, Pune-411001
Published and posted on 1st and 16th of Every Month.
परिवर्तनाचा वाटसरू, जोड अंक १६ आक्टो. ते १५ नोव्हें. २०२२ Date of Publication & Posting : 19-10-2021




'परिवर्तनाचा वाटसरू' हे पाक्षिक मालक-प्रकाशक अभय कांता यांनी नर्मदा ऑफसेट, नारायण पेठ, पुणे ३० येथे छापून ५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ए, कसबा पेठ, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.